# शांतिदूत नेहरू

पां. वा. गाडगीळ

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १७००

REFBK-0015139
REFBK-0015139

૭૪૩૮૮.
નિબંધ
૨૮।૪।૬૮.
૧૮૦૦

નોં.ક્ર. ૭૧૩૮૮

# शांतिदूत नेहरू

पां. वा. गाडगीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५९३९
शाखा

REFBK-0015139
REFBK-0015139

5.41

पॉप्युलर प्रकाशन मुंबई

© पां. वा. गाडगीळ

पहिली आवृत्ती ऑगस्ट १९६६
मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा.) लिमिटेड
४०५ नारायण पेठ, पुणे २.
प्रकाशक
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५सी ताडदेव रोड, मुंबई ३४WB

# प्रस्तावना

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ४७३८८ दि:
क्रमांक १८०० नों. दि:

नेहरू हे भारताचे सुपुत्र असून भारताच्या स्वातंत्र्यासाठी व स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी त्यांनी आपला देह झिजविला. पण त्यांचे हे स्वदेशप्रेम संकुचित राष्ट्रीय भावनेचे द्योतक नसून मानवताप्रेमाचा एक भाग होते. इतिहासाच्या एका टप्प्यावर राष्ट्रे निर्माण होतात व मानवताप्रेमी माणसांनी आपापल्या राष्ट्राची सेवा केल्याने मानवतेची सेवा त्यांच्या हातून होते, पण मानवाचे जग हे एकच आहे अशी त्यांची भावना होती. विशुद्ध राष्ट्रवाद तो हाच होय. एकेका राष्ट्रातील जनतेत ही समता, स्नेह, सहिष्णुता व परस्पर सहकार्य अपेक्षित असून राष्ट्राराष्ट्रांचे संबंधही याच तत्त्वावर आधारले जाण्यासाठी झटणे हे मानवताप्रेमाचे खरे लक्षण होय.

नेहरूंनी आपले अंतर्गत धोरण व परराष्ट्रधोरण याच दृष्टीने आखले व अमलात आणले. भारताचे पंतप्रधान या नात्याने त्यांना राष्ट्रसंरक्षणाची व अंतर्गत शांततेची जबाबदारी पत्करावी लागली व त्यासाठी सशस्त्र दळे त्यांनी उभारली. पण अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय वाद व मतभेद सहिष्णुतेने, वाटाघाटींनी, विचारविनिमयाने सोडवावे असा त्यांचा आग्रह असे. पुढारलेल्या राष्ट्रांनी मागासलेल्या राष्ट्रास साहाय्य केले पाहिजे, एकेका राष्ट्रातील वरिष्ठ वर्गांनी कनिष्ठांना साहाय्य केले पाहिजे आणि हे साहाय्य समता व स्नेह यांवर आधारले पाहिजे अशी नेहरूंची एक जगताची कल्पना होती. आजचे जग अपूर्ण आहे, त्यात लाचारी, मग्रूरी, आपपरभाव, हाडवैर आक्रमकवृत्ती हे दोष आहेत, व त्यांच्याशी जरूर तेव्हा सामना केला पाहिजे हे त्यांना समजत होते. पण या दुर्वृत्तींचे शक्य तो सौजन्याने, सहनशीलतेने, समजुतदारपणाने हळूहळू शमनही केले पाहिजे असा नेहरूंचा आग्रह होता. म्हणूनच त्यांनी यूनोचे दोष व अपूर्णता लक्षात घेऊनही यूनोची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न केला व राष्ट्राराष्ट्रांचे तंटे मिटविण्याच्या यूनोच्या कार्यांत भारताची व स्वतःची प्रतिष्ठा पणास लावूनही नेहरूंनी भाग घेतला.

सर्व राष्ट्रांशी अत्यंत स्नेहाने व निर्वैराने वागावे असे त्यांचे धोरण होते. भारत अथवा स्वत: नेहरू यांच्यासंबंधाने तेढी भावनेने अथवा वैरभावनेने बोलणाऱ्या-वागणाऱ्यासंबंधानेही नेहरूंनी कधी हाडवैराची, तेढीची, चढाईची अथवा बढाईची भाषा वापरली नाही.

भांडणे व युद्धे ही आजच्या जगात अनिष्ट व अव्यवहार्य आहेत असे त्यांचे हिशेबी मत होतेच. कारण युद्ध म्हटले की आजच्या शस्त्रास्त्रांच्या सामर्थ्यामुळे सर्वनाशच ओढवणार होता. उलट भौतिक व सांस्कृतिक वैभव प्राप्त करून घेण्याचे माणसाचे सामर्थ्य आज इतके वाढले आहे की आता एकाने दुसऱ्याचे काहीही हिसकून घेण्याची जरूरी नसून परस्परसहकार्यानेच सर्वांचे वैभव वाढणार आहे. या दृष्टीने पाहता नेहरूंचे शांतताप्रेम व मानवताप्रेम आधुनिक शास्त्रांवर आधारलेले आहेच. पण शांतताप्रेम व मानवताप्रेम ही नेहरूंची सहजप्रवृत्तीच आहे. बुद्धाबद्दल नेहरूंना जे जिव्हाळ्याचे आकर्षण आहे त्याचे हे कारण होय.

बुद्धाच्या काळी आधुनिक शास्त्रे नव्हती, मानवताप्रेम व शांतताप्रेम या गोष्टी व्यवहारात आणण्यासाठी भौतिक अनुकूलता नव्हती. तरीही बुद्धाने त्या तत्त्वांच्या सेवेत आयुष्य झिजविले व आत्मार्पण केले. यामुळे बुद्धाबद्दल नेहरूंना मोठा लळा वाटत होता. गांधींच्याबद्दल नेहरूंना निष्ठा होती याचे कारणही बुद्धाचे हे श्रेष्ठ गुण त्यांना गांधींच्या स्वभावात, विचारात, व्यवहारात दिसले हे होय. हे मानवताप्रेम व शांतताप्रेम आपल्या स्वभावात, विचारात व्यवहारात आणण्याचा निकराचा प्रयत्न नेहरूंनी केला. एका मोठ्या राष्ट्राचे नेतृत्व या दृष्टीने त्यांनी चालविले. प्रस्तुत लेखसंग्रहात नेहरूंची ही कामगिरी विशद केली आहे. नेहरूंच्या या कार्याचा ठसा जगावर उमटला असून इतिहासाला त्याने निश्चित वळण लावले आहे. त्यांचे हे कार्य खंडित होणार नाही.

मुंबई, दि. १–८–६६ **पां. वा. गाडगीळ**

# अनुक्रम


भारतभाग्यविधाता पंडित जवाहरलाल नेहरू ७
माझे नेहरूविषयक नवे चिंतन २२
भारत आणि जागतिक राजकारण ३०
पं. नेहरू आणि लाल चीन ४१
जवाहरलाल नेहरू आणि त्यांची भूमिका ५३
भारत–चीन युद्ध व नेहरूंचे नेतृत्व ६१
थोर संत व यशस्वी मुत्सद्दी ६९
चीन मागे हटला तो कशामुळे? (एक तर्क) ७६
शांतिदूत नेहरू ७९
डिस्कव्हरी ऑफ इंडिया ९२

# भारतभाग्यविधाता पंडित जवाहरलाल नेहरू

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 7493
ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ८७३७० वि: निबंध
क्रमांक १६०० नों. दि: २७/४/२००

मला पं. नेहरूंच्याबद्दल जो आदर, जी आस्था व जे प्रेम आहे त्याचा नेहरूंच्या सौंदर्याशी अथवा साहित्यिक गुणांशी काहीही संबंध नाही. सूर्याचे प्रतिबिंब रत्नात पडू शकेल, पण मातीच्या ढेकळात पडणार नाही. सौंदर्य, साहित्य वगैरे गुणांची छाप पडण्यासाठी सौंदर्याभिरुची, कलासक्ती वगैरे गुणांनी युक्त असा जो टीपकागद माणसाच्या बुद्धीचा बनावा लागतो, तसा माझा बनलेला नाही. मी केव्हातरी एकदा अत्यंत भावनाप्रधान होतो अशी मला काहीशी अस्पष्ट, अगदी स्वप्नवत स्मृती आहे. पण आता गेली बरीच वर्षे, माझ्या काही व्यवसायबंधूंच्या मताप्रमाणे, माझ्या भावनांचा अगदी दगडी कोळसा झालेला आहे. त्यात प्रतिबिंब पडत नाही, तो लवकर भिजत नाही, लवकर पेटत नाही. मला नेहरूंच्याबद्दल जो आदर आहे तो त्यांच्या सौंदर्यादी गुणांमुळे नसून त्यांच्या राजकारणाबद्दलच आहे.

हे नेहरूंचे राजकारण मला त्यांच्यापासून वैयक्तिक परिचयाने समजलेले नाही. मी तसा एकदोनदा प्रयत्न केला, पण त्याचा फारच वाईट अनुभव आला. सतरा वर्षांपूर्वीची गोष्ट. गांधी-आयर्विन करार होऊन गांधी विलायतेस गोलमेज परिषदेस जावे असे ठरत होते. नेहरूंना ती गोष्ट मनापासून आवडली नव्हती. विशेषत: भगतसिंगाला या करारामुळे आपण वाचवू शकू असे नेहरूंना वाटले होते. पण आपण त्या बाबतीत फसलो व भगतसिंगाचा आपल्या धोरणामुळे विश्वासघात होत आहे अशा काहीशा दुखऱ्या मनोवृत्तीत असता नेहरू सिलोनला जायला निघाले होते. वाटेत ते पुण्यात उतरले व काका गाडगीळांच्या घरी त्यांची कार्यकर्त्यांशी एक खाजगी बैठक झाली. मी गांधी-आयर्विन कराराबद्दल नाराजच होतो व नेहरूंनी या करारास संमती कशी दिली हे समजून घेऊ पहात होतो. सदर बैठकीत 'गांधींनी समेट पत्करला, पण संरक्षणखात्याचा 'मेंबर' लोकप्रतिनिधींच्या नियंत्रणात यावा ही अट ब्रिटिश सरकारने मान्य केली काय ?' असा काहीतरी प्रश्न मी नेहरूंना विचारला. मला आता बरोबर प्रश्न आठवत नाही. पण मी 'मिनिस्टर' शब्द वापरायला हवा होता त्या ऐवजी 'मेंबर' शब्द वापरला, यावरच नेहरू चिडले व उत्तर देण्याऐवजी शाब्दिक चूक टाफरून सांगून त्यांनी माझा प्रश्नच झिडकारून लावला. पुढे १९३४ साली नेहरू लखनौ काँग्रेसला

अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्या काँग्रेसनंतर ते पुण्यात आले असता समाजवादी पक्षाची एक खाजगी बैठक घेण्यात आली, तीत नेहरूंना चर्चेसाठी बोलावण्यात आले होते. लखनौच्या अध्यक्षीय भाषणात नेहरूंनी 'सोशॅलिझमवाचून राष्ट्रीय स्वातंत्र्य शक्य नाही आणि काँग्रेसला व देशाला कालांतराने मी समाजवादी बनविण्याची आशा बाळगतो.' अशा अर्थाची वाक्ये सांगितलेली आहेत असे माझे मत झाले होते. काँग्रेस ही समाजवादी होईल अथवा स्वातंत्र्यापूर्वी सोशॅलिझम येण्याची म्हणजे स्वातंत्र्यलढ्यास सोशॅलिस्ट लढ्याचे स्वरूप देण्याची आवश्यकता आहे असे त्या वेळी कोणी मानीत नसून नेहरूंचे मत तसे नाही अशी सर्वांची खात्री असे. तेव्हा याविरुद्ध नेहरू लखनौ काँग्रेसमध्ये कसे बोलले हे मी जाणू इच्छित होतो. पण मजजवळ अथवा दुसऱ्या कोणाजवळही नेहरूंच्या भाषणाची मूळ प्रत नव्हती. आणि मी विचारलेला अगदी सरळ प्रश्न नेहरूंनी समजून घेण्याचाही प्रयत्न केला नाही. त्यानंतर नेहरूंच्याशी पत्रव्यवहार केला व त्यांचे उत्तर आले ते फारच चांगले आहे. ( परिशिष्ट पहा. ) पण वैयक्तिक संवादात आपले नेहरूंच्याशी जमणार नाही असा तेव्हापासून माझा ग्रह झाल्यामुळे त्यानंतर नेहरूंच्या बैठकीत वार्ताहरांसमवेत अगदी नेहरूंच्या जवळ बसण्याची संधी अनेक वेळा मला मिळाली तरी मी प्रश्न विचारण्याच्या मोहात पडलो नाही.

पण नेहरूंची पुस्तके, पत्रके, भाषणे, लेख, मुलाखती मी गेली वीस वर्षे अतिशय काळजीपूर्वक वाचतो आहे. मी काही नेहरूंच्यामुळे समाजवादी झालो नाही. कम्युनिस्टांच्या प्राथमिक स्फूर्तीने मी समाजवादाकडे वळलो व लिहू लागलो. तेव्हापासूनच मी मार्क्सवादी असून काँग्रेस समाजवादी पक्षातल्या अनेक अभ्यासी तरुणांच्या सहकार्याने मी समाजवादाचे अधिक अध्ययन व मनन केले. पण माझा समाजवाद नेहरूंच्यापासून मला मिळाला नसला तरी नेहरूंनी हिंदी जनतेला राष्ट्रीय स्वातंत्र्य व समाजवाद यांकडे खेचले, त्यासंबंधीची वैचारिक चळवळ नेहरूंनीच सुरू केली, आजवरही इतर कोणाहीपेक्षा मोठ्याने गर्जून व झटून हे कार्य ते करीत आहेत, यासाठी मला नेहरूंच्याबद्दल फार कृतज्ञता वाटते. नेहरूंची ही कामगिरी फार मोठी आहे. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाची छाप काही लोकांवर पडते. पण नेहरूंना जे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मोठेपण प्राप्त झाले आहे त्याला त्यांचे हे रुबाबदार व्यक्तित्व कारण नसून राष्ट्रीय स्वातंत्र्यवाद, आंतरराष्ट्रवाद व लोकशाहीयुक्त समाजवाद या तत्त्वांचा सुंदर मिलाफ त्यांनी केला आणि द्रष्टेपणाने हिंदी जनतेत या त्रिदळ तत्त्वास लोकप्रियता मिळवून दिली यात नेहरूंचे खरे मोठेपण साठविले आहे. त्यांचे सौंदर्य, त्यांची सुंदर भाषा व विपुल लेखन, विद्वत्ता, सतत व शिस्तीने काम करण्याची हौस आणि गांधींबद्दलचे त्यांचे निस्सीम

प्रेम यांनी त्यांचे व्यक्तित्व तेजस्वी व आकर्षक बनविले आणि त्यांच्या प्रभावी मतप्रणालीमुळे त्यांना मिळालेल्या थोरवीला अधिक शोभा आणली एवढेच.

पं. नेहरूंच्यापूर्वी राष्ट्रीय स्वातंत्र्यवाद, आंतरराष्ट्रवाद, लोकशाही व समाजवाद या तत्त्वांचा पुरस्कार आणि प्रसार करणारे पुढारी झालेच नाहीत असे नाही. सावरकरप्रभृती पुढारी हे आद्य राष्ट्रीय स्वातंत्र्यवादी होते. लाला लजपतराय, लो. टिळक, गोखले वगैरेंनी इंग्लंड, अमेरिका वगैरे परराष्ट्रात हिंदुस्थानच्या आकांक्षेला लोकमत अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न केला आणि अनेक दहशतवादी पुढाऱ्यांनी परराष्ट्रांच्या साहाय्याने हिंदुस्थानात सशस्त्र बंड उभारण्याचे प्रयत्न केले. आंतरराष्ट्रवादाच्या त्या वेळीच्या कल्पनेप्रमाणे ही माणसे आंतरराष्ट्रवादीच होती. लोकशाही ही टिळकप्रभृतींना मान्य असून टिळकांनी आपल्या पक्षाचे नाव ' लोकशाही पक्ष ' असेच ठेवले होते. हिंदुस्थानात समाजवादी विचार प्रथम कॉ. रॉय, कॉ. डांगे, कॉ. जोगळेकर, कॉ. निमकर इत्यादींनी आपल्या लेखांनी, भाषणांनी व चळवळींनी लोकांपुढे मांडले. याप्रमाणे नेहरूंच्यापूर्वी राष्ट्रीय स्वातंत्र्य, आंतरराष्ट्रवाद, लोकशाही व समाजवाद ही चारही तत्त्वे प्रतिपादिली गेली होती हे खरे आहे. मग नेहरूंच्या ठिकाणी या तत्त्वांचा समुच्चय होता एवढेच त्यांचे वैशिष्टय समजावयाचे काय ? हे तर नेहरूंचे वैशिष्टय होतेच, पण त्यामुळेच या चारही तत्त्वांचा जो विशिष्ट अर्थ नेहरूंच्या मनात भरला होता ते त्यांचे नावीन्य व गुणाधिक्य होते. सावरकरांच्या स्वातंत्र्यवादात दहशतवाद होता. लोकशाही अथवा समाजवाद यासंबंधाने त्यांनी कधी विचारही केला नाही. आणि जपान, जर्मनी, इटाली या राष्ट्रांच्या फॅसिस्ट राष्ट्रवादात त्यांना काही चूक दिसली नाही. परराष्ट्रांतील लोकमत हिंदुस्थानास अनुकूल करून घेण्यापासून तो परराष्ट्रांत भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी शस्त्रे जमविणाऱ्यापर्यंतच्या सर्व जुन्या पुढाऱ्यांचा आंतरराष्ट्रवाद म्हणजे परराष्ट्राची हिंदुस्थानसाठी मदत मिळविणे एवढाच होता. तसेच लोकशाहीचा अर्थ निवडणुका लढविणे याहून अधिक आहे की काय याविषयी विचार करण्याचा टिळकप्रभृतींना कधी प्रसंगच आला नाही. आणि रॉय, डांगे, जोगळेकर प्रभृतींच्या समाजवादी कल्पना सशस्त्र क्रांती, वर्गलढा, कामकरी–शेतकऱ्यांची हुकूमशाही यांशी अभेद्यपणे निगडित होत्या. म्हणजे जुन्या पुढाऱ्यांच्या ठिकाणी ही एकेकटी तत्त्वे इतर तत्त्वांशी विरोधी, विसंगत व आजच्या दृष्टीने काहीशी विकृत अथवा अगदीच अस्पष्ट अथवा तात्त्विक स्वरूपात होती. वर उल्लेखिलेल्या जुन्या पुढाऱ्यांना दोष देण्याचा हेतू नाही. त्यांच्या त्या काळी या कल्पना अजून मागासलेल्या स्वरूपातच होत्या. या कल्पनांस मूर्त व विकसित स्वरूप दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळातच प्रामुख्याने आले. आणि नेहरूंचे वैशिष्टय हे की या सर्वांचे संकलित व विकसित स्वरूप नेहरूंच्या ठिकाणी

जितके व जसे दिसले तितके व तसे हिंदुस्थानात दुसऱ्या कोणाच्याही ठिकाणी दिसून आले नाही.

पं. नेहरू १९२८ पूर्वी युरोपात प्रवास करून व रशियास भेट देऊन आले तेव्हा त्यांची ही मते परिणतस्वरूप पावली असे त्यावेळी त्यांनी सोव्हिएट रशियासंबंधीने जे एक छोटे पुस्तक लिहिले आहे त्यावरून वाटते. पुढे त्यांच्या सर्व प्रकारच्या लेखनांतून, भाषणांतून या मताचा आविष्कार त्या त्या वेळच्या परिस्थितीच्या अनुबंधात होऊ लागला. त्या वेळी वासाहतिक स्वराज्याची कल्पना, ब्रिटिश साम्राज्यातील राष्ट्रांचा, जगातील इतर राष्ट्रांपासून अलग असा, गट बनवून त्या गटात गोऱ्या राष्ट्रांचे प्रभुत्व राहावे या प्रकारची होती. म्हणून वासाहतिक स्वराज्यास नेहरूंनी विरोध केला व त्यांच्याच प्रेरणेने लाहोरला पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास झाला. पण या स्वातंत्र्यवादाचे आंतरराष्ट्रीय स्वरूप कसे होते ? या स्वातंत्र्यवादास केवळ परराष्ट्रांच्या स्वतंत्र अथवा निशस्त्र साहाय्याची गरज होती असे नव्हे. जगाची रचना कशी अपेक्षित होती ? अनेक लहानमोठी परस्परस्वतंत्र राष्ट्रे परस्परावलंबनाने व परस्पर बंधुभावाने राहात आहे अशी रचना नेहरूंना अभिप्रेत होती. राष्ट्राराष्ट्रांच्या घर्षणातून अथवा मीलनातून जे आंतरराष्ट्रीय राजकारण निर्माण होते त्याचा राष्ट्रीय राजकारणावर महत्त्वाचा परिणाम होतो. राष्ट्र हे नुसते स्वतंत्र असून भागत नाही तर परराष्ट्राशी बंधुभावाने व समानतेने वागण्याची आकांक्षा त्या राष्ट्राची असावी लागते आणि स्वतःच्या व इतरांच्या देशातही उच्चनीच वर्गभावना नष्ट करून समानतेच्या पायावर आधारलेली लोकशाही असावी लागते. ही लोकशाही केवळ निवडणुकांनी मंत्रिमंडळे व कायदेमंडळे निवडून निर्माण होत नाही तर आर्थिक समता प्रथम स्थापन व्हावी लागते, त्यासाठी धनोत्पादक साधने समाजाच्या मालकीत अथवा नियंत्रणात यावी लागतात,म्हणजेच समाजवाद यावा लागतो असे या एकूण मताचे संकलित स्वरूप असून लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात हे विचार नेहरूंनी मांडले आहेत. हिंदी तरुणांत या विचारांना मान्यता व सामर्थ्य नेहरूंनी प्राप्त करून दिले. प्रथम त्या वेळी नेहरूंच्या या विचारांचे सार्वत्रिक स्वागत मुळीच झाले नाही. जवाहरलालजींचे वडील मोतीलाल नेहरू हे कॉंग्रेसच्या राजकारणात बरेच उच्चपदस्थ होते. पण त्यांच्या वकिली मनास असल्या राजकीय तत्त्वज्ञानाचा शीण त्यांनी कधी दिला नाही. स्वतः गांधीजी पूर्ण स्वातंत्र्यास विरुद्ध होते आणि आंतरराष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद या विषयांचा आधुनिक दृष्टीने ते कधी विचार करीत नसत. कॉंग्रेसमध्ये जे आपणास गांधीवादी म्हणवीत ते कसलाच विचार करीत नसत. गांधींना जे समजते व जे योग्य वाटते त्याहून अन्य काही जगात असण्याचे कारण नाही व स्वतःस गांधीवादी म्हणवून घेतले म्हणजे गांधींना काय योग्य वाटते व त्यांची मते काय आहेत

हे समजून घेण्याची जरुरी नाही असे त्यांना प्रामाणिकपणे वाटे. केळकर-प्रभृतींना तात्त्विक विचारांच्या खोल पाण्यात जाण्याची कधी जरुरी वाटली नाही. जवाहरलाल हा एक 'इपीच्युअस' ( उल्लू ) माणूस आहे असे केळकरांनी आपल्या एका भाषणात बोलून दाखविले होते व टिळकांच्या मागून अधिक विद्वान होण्याचा अथवा नवविचार बोलण्याचा कोणासही हक्क नाही असेच या लोकांना निर्धास्तपणे वाटत होते. कम्युनिस्ट हे गांधींचे कट्टर विरोधक असून नेहरूंच्याकडे थोडयाशा ममत्वाने पण बऱ्याचशा तुच्छतेने पहात. सुभाषचंद्रांना आपण नेहरूंचे प्रतिस्पर्धी आहो असे वाटे आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य कोणत्याही उपायांनी प्रथम प्राप्त केल्यावाचून इतर विचार व तत्त्वे ही व्यर्थ आहेत, ती राष्ट्रीय स्वातंत्र्य दूर ढकलणारी मोहजाले आहेत असे ते मानीत. नेहरू हे राष्ट्रवादी म्हणजे स्वातंत्र्यवादी होते, पण लोकशाही-वाचून त्यांना स्वातंत्र्यवाद नको होता आणि स्वातंत्र्यवादास साम्राज्यवादाचा दर्प आल्यास त्यांना तो स्वातंत्र्यवाद त्याज्य वाटे. सुभाषचंद्र व जवाहरलाल हेच पुढील कालात एकमेकांचे जबर प्रतिस्पर्धी म्हणून पुढे आले. बाकीचे गट, पक्ष व व्यक्ती महत्त्वहीन झाल्या. मला वाटते, गांधीजी हे स्वातंत्र्यलढ्याचे पुढारी म्हणून पुढे फार मोठे झाले तरी राजकीय तत्त्ववेत्ते म्हणून नेहरूंना जे स्थान पुढील काळात मिळाले ते गांधींना मिळाले नाही. १९३२ नंतर गांधीजींचे वजन तरुणांत कमी कमीच होऊ लागले. जवाहरलाल व सुभाषचंद्र नसते तर तरुण पिढी काँग्रेसपासून विन्मुख होऊन कम्युनिस्ट पक्षाकडे खेचली गेली असती. जवाहरलाल व सुभाषचंद्र यांचा विरोध पुढील काळात तीव्र झाला व तात्त्विक राजकारणाचा केंद्रभूत असा हा वाद ठरला. १९२९ च्या पूर्वी संपूर्ण स्वातंत्र्याचे प्रणेते म्हणून सुभाषचंद्र व जवाहरलाल हे दोघेही तरुणवर्गास प्रिय होते. पण साधनांच्या बाबतीत सुभाषचंद्र तत्त्वनिष्ठा मानणारे नसून लोकशाहीबद्दल त्यांचा आग्रह नव्हता. समाजवादाबद्दलच्या त्यांच्या कल्पना अस्फुट होत्या. पं. जवाहरलाल यांचा सुभाषचंद्रांशी या सर्व बाबतीत स्पष्ट, तीव्र व मूलग्राही मतभेद झाला.

जवाहरलाल व सुभाषचंद्र यांमधील हा फरक गांधींना माहीत होता, व त्यांनी जाणूनबुजूनच जवाहरलालजींना हाताशी धरून सुभाषचंद्रांशी विरोध सुरू केला. सुभाषचंद्रांनी दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या काळात हिंदी सैन्यास ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंडास प्रवृत्त करून हिंदी स्वातंत्र्यलढ्यातील अखेरची निर्णायक घटना घडवून आणली, हे त्यांचे कृत्य ऐतिहासिक दृष्ट्या फार थोर आहे खरे. पण स्वातंत्र्यप्राप्तीची साधने व समाजव्यवस्थेचे उद्दिष्ट, स्वरूप या संबंधाने सुभाषचंद्रांचे ठिकाणी जी एक प्रकारची अनिश्चितता, बेपर्वाई होती तीमुळे राष्ट्राचे भवितव्य अखेर त्यांच्या नेतृत्वाचे हाती जाण्यात

धोका होता असे माझे अजूनही स्पष्ट मत आहे. गांधींचे मत असेच असल्यामुळे सुभाषचंद्रांशी गांधींचा कायम समेट कधीच झाला नाही.

जवाहरलाल व गांधीजी यांचे संबंध अतिशय निकट होते. पण ते असे का असावे यासंबंधाने अनेकांना मोठे कोडे आहे. गांधींच्या भोवतालच्या गांधीवादी मुत्सद्द्यांना ही गोष्ट कधी उमगली नाहीच, पण त्यांनी या गोष्टीचा कधी विचारही केला नाही. ती गोष्ट त्यांना पसंत नव्हती व गांधींना आपल्या नापसंतीची जाणीव त्यांनी करून दिलेली होती. सुभाषचंद्र व जवाहरलाल हे दोघेही गांधींच्यापासून सारखेच दूर राहावे असे त्यांना वाटे. पण गांधींनी या लोकांचे कधीच ऐकले नाही. जवाहरलालना गांधींनी लाडावून ठेवलेले आहे म्हणून त्यांना देशात मान आहे, त्यांना राजकारण काही कळत नाही, राजकारणाची घडी मुत्सद्द्यांनी घातली तर डाव्या गटाच्या लोकांना पाठिंबा देऊन जवाहरलाल ती घडी विस्कटून टाकतात, इत्यादी आरोप गांधीवादी मुत्सद्दी जवाहरलालवर करीत. पण गांधी या मुत्सद्द्यांना जवळ बाळगीत तरी नेहरूंबद्दल त्यांनी आपणांस वाटणारी आपुलकी जाहीरपणे व वेळीअवेळी व्यक्त करण्याचे थांबविले नाही. गांधी आणि नेहरू यांच्यांत इतकी जवळीक का असावी याचे निव्वळ व्यवहारी गांधीवादी मुत्सद्द्यांना कोडे होते, इतकेच नव्हे तर माझ्यासारख्या राजकारणाची तात्त्विक व ऐतिहासिक बाजू बारकाईने समजून घेण्याचा हव्यास असणाऱ्या अभ्यासकासही हे कोडेच होते. १९३४ साली मी माझे 'समाजवादाचा ओनामा' हे पुस्तक लिहिले, त्या वेळी रॉय व डांगे यांच्या विचारांचा माझ्या मनावर विशेष पगडा होता. डांगे यांची मिरत खटल्यातील जबानी मला केळकरांनी वाचायला दिली होती. पाचशे फुलस्केप आकाराची ही खच्चून भरलेली छापील पाने म्हणजे कम्युनिझम् आणि हिंदी कम्युनिस्टांचे धोरण यांवर तो एक उत्कृष्ट प्रबंध होता. ती जबानी मी 'ओनामा' लिहिण्यापूर्वी अनेकदा वाचली. मी सहसा कुणाच्या मताच्या आहारी जात नाही व डांगे यांच्या आहारीही मी गेलो नाही. पण गांधींचे कोडे मला त्या वेळी पूर्णपणे उलगडले नव्हते. यामुळे डांगे यांच्या विचारसरणीची छाप माझ्या मतावर पडली होती हे खरे आहे. यामुळे गांधी-नेहरूसंबंधाविषयी माझी मते त्या वेळी सदोष होती. गांधी हे एक ब्रिटिश लिबरल जातीचे असून गूढवादी सत्याग्रही आहेत आणि नेहरू हे भौतिकवादी असले तरी कृतिदुर्बल व संघटनगुणात शून्य असल्याने गांधींना शरण जातात, त्यांच्या हातून गांधींना बाजूस सारून एखादे धाडस अंगावर घेववणार नाही असे मी 'ओनामा'त लिहिले आणि गांधी व नेहरू या दोघांहीबद्दल निराशा व्यक्त केली. गांधी आणि नेहरू यांच्या संबंधाचे कोडे महाराष्ट्रातच नव्हे तर कदाचित् साऱ्या हिंदुस्थानातही जावडेकरांना प्रथम उलगडले असे, परप्रांतीय विचारांचे ज्ञान मला इंग्रजीतून जेवढे

मिळाले आहे त्यावरून, माझे मत बनले आहे. पण जावडेकरांच्या लेखनात भौतिकवाद असला तरी त्यांच्या लेखनाचे व विचारांचे वळण बरेच आध्यात्मिक असल्यामुळे त्यांच्या विचारांचे आकलन चटकन होत नाही. १९३४ पूर्वी निदान पाच वर्षे जावडेकरांचा व माझा संबंध आला. तरीपण त्यांच्या विचारांचे संपूर्ण आकलन मला त्या वेळपर्यंत झाले नव्हते. पुढे मी 'लोकशक्ती'त त्यांच्या हाताखाली काम करीत असता मला जावडेकर अधिक (अथवा पूर्णपणे) समजले व त्याबरोबर गांधी व नेहरू यांचेही मला बरेच अधिक आकलन झाले असे वाटते. पुढील काळात जावडेकरांचे व माझे मतभेद झाले तरी तत्त्वविचारांची एक विशिष्ट बाजू लक्षात येण्यास जावडेकरांच्या विचारसरणीचे मला फार साहाय्य झाले आहे.

जवाहरलाल व गांधी यांच्या विचारांमध्ये वास्तविक जमीन-अस्मानाचे अंतर आहे. जवाहरलाल तर्कवादी व भौतिकवादी आहेत. गांधी गूढवादी व अध्यात्मवादी आहेत. आधुनिक यंत्रे व शास्त्र यांचे नेहरू स्वागत करतात, गांधीजी त्यांकडे उपहासबुद्धीने, निदान उपेक्षाबुद्धीने पहातात. परचक्र आले तरी सशस्त्र प्रतिकार करू नये असे गांधी म्हणत, पण आत्मरक्षणासाठी युद्ध करावे असे नेहरूंचे मत असून हैदराबादप्रकरणी आत्मरक्षणाचे तत्त्व त्यांनी रबराप्रमाणे बरेच ताणलेही. अशा या विभिन्न व विरोधी दृष्टीच्या दोन पुरुषांची पंचवीस वर्षे युती सतत टिकून राहिली हा या काळातील एक चमत्कार आहे. हा चमत्कार कसा घडला? या दोघांना एकमेकांच्या भूमिका व प्रवृत्ती समजून घेऊन सहकार्य करण्याची ओढ होती. आपले विचार या जगाच्या व्यवहारात आणण्यासाठी काहीसे जगाच्या व्यवहारात गुरफटून घेऊन जगासारखे वागले पाहिजे हे गांधींनी ओळखले होते. ख्रिस्त, बुद्ध, टॉलस्टॉय हे अहिंसावादी तत्त्वज्ञ व महात्मा गांधींचा अहिंसावाद यात फरक आहे तो हाच होय. असे व्यवहारात गुरफटताना आपल्या तत्त्वघरटचापासून फार दूर न जाता जगाशी संबंध ठेवण्याला गांधींना नेहरू हे वाहन म्हणून योग्य वाटले. याचे कारण, सत्य, सौजन्य, निर्लोभ व अहिंसा या प्रवृत्ती सार्वजनिक व्यवहारात असाव्यात याकडे नेहरूंची ठाम प्रवृत्ती आहे अशी गांधींची खात्री झाली. नेहरूंनी या तत्त्वांचा शाब्दिक जप अथवा निदिध्यास कधी घेतला नव्हता. ते मुख्यतः लोकशाहीवादी, आंतरराष्ट्रीयवादी, समाजवादी, स्वातंत्र्यवादी होते. पण ही तत्त्वे मांडणारे पाश्चात्य मुत्सद्दी हुकुमशाही प्रवृत्तीचे व आक्रमणशील आहेत असा अनुभव त्यांना येत होता. लोकशाही, राष्ट्रीय स्वातंत्र्य व आंतरराष्ट्रीय समता या आजच्या कल्पना म्हणजे फक्त सामाजिक रचना आहेत. या रचनांचे देखावे मांडून त्यांत विरोधी तत्त्वांचे आत्मे भरण्यात येतात असा नेहरूंना जगाचा अनुभव दिसला असावा. मग या रचनांचा आत्मा असावा तरी कसा? त्याचे स्वरूप गांधींच्या प्रति-

पादनात त्यांना सत्य, सौजन्य, निर्लोभ व अहिंसा या स्वरूपांत प्रतीत झाले असले पाहिजे. ही तत्त्वे कोणत्या समाजरचनेत प्रतीत होतील यासंबंधाने गांधींच्या कल्पना अस्पष्ट होत्या. ती तत्त्वे प्रचलित समाजातच वावरून सत्य सृष्टीत आणणे भाग आहे हे गांधींना पटले होते. प्रचलित समाजरचनेच्या कोणत्या पुढल्या पायरीवर चढले असता या तत्त्वांची अधिक चांगली प्रचीती येईल याबद्दल गांधींचा निश्चय कधीच झाला नव्हता. पण नेहरूंचे मत याबावत गृहीत धरण्यास ते तयार असावे असे त्यांचे धोरण दिसते. नेहरूंनी आपली समाजरचनाविषयक तत्त्वे सत्यसृष्टीत आणताना गांधींची भावनात्मक तत्त्वे त्यात प्राणभूत राहिली पाहिजेत असा आग्रह मनाशी ठेवला, व आपल्या हातून याबाबतीत राजकारणाच्या मोहात व रामरगाडयात वावरत असता-नाही चूक होऊ नये म्हणून, मनाने गांधींच्या दावणीत राहण्याचे ठरविले असले पाहिजे, असा गांधी-नेहरू संबंधाचा माझ्यापुरता उलगडा मी गेली काही वर्षे केला आहे. या उपपत्तीवाचून गेल्या वीस वर्षांचे हिंदुस्थानचे राज-कारण मला कळूच शकत नाही.

नेहरूंची तत्त्वे म्हणून जी वर सांगितली त्यासंबंधींची त्यांची निष्ठा हिटलर व फ्रँको यांच्या उदयानंतर प्रगट झाली. त्यापूर्वी हिंदुस्थानातील जहाल मताचे लोक मोघमपणे स्वातंत्र्यवादी होते. याचा अर्थ असा होता की इंग्लंड हे राष्ट्र हिंदुस्थानचे शत्रू मानावे व इंग्लंडचे शत्रू ते आपले मित्र आहेत असे मानावे. या दृष्टीने स्टॅलिन व हिटलर हे दोघेही हिंदुस्थानचे सारखेच मित्र आहेत आणि जपान हे राष्ट्र चीनवर आक्रमण करणारे असले तरी ज्या अर्थी त्यामुळे इंग्लंडच्या अडचणी वाढत आहेत त्या अर्थी जपानही हिंदुस्थानचा मित्र आहे असे मानण्यात येई. सुभाषचंद्रांची हीच भूमिका होती. अनेक काँग्रेस वरिष्ठांची व सोशालिस्टांचीही ही भूमिका होती. नेहरूंनी या विचार-सरणीस प्रथम धक्का दिला. त्याबद्दल काँग्रेस वरिष्ठांची नेहरूंवर नाराजी झाली व आंतरराष्ट्रीय गुंताडयात हिंदुस्थानला अडकवून ते स्वतःला आंतर-राष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवू पहात आहेत असे आरोप त्यांच्यावर करण्यात आले. १९३७ साली काँग्रेस मंत्रिमंडळे अधिकारावर आल्यानंतर नेहरू युरोपला गेले तेव्हा इकडील राजकारणातील पेच उलगडत नाहीत म्हणून नेहरूंनी युरोपला पळ काढला असे मीही म्हटले होते. ते सर्वथा खोटे नव्हते. त्यावेळी गांधीवादी मुत्सद्द्यांच्या पकडीत सापडलेल्या राजकारणात नेहरूंना बोट शिरकवण्यासही वाव मिळेना, चाललेले प्रकारही त्यांस पाहवेनात आणि युरोपात फॅसिझमचे भडकत चाललेले स्वरूप प्रत्यक्षपणे समजून घेण्याची उत्सुकता त्यांना लागली होती, म्हणून ते युरोपात गेले. फॅसिझम् व लोकशाही समाजवाद यांच्या लढ्याचा निर्णय नजिक येत असलेल्या युद्धात लागणार असे नेहरूंना वाटत होते. ते युरोपातून परत आले त्या वेळी तत्कालीन हिंदी

राजकारणापेक्षा आंतरराष्ट्रीय विचारांनीच त्यांचे मन भरले होते. महायुद्ध भडकणार असे सर्वांनाच वाटे. पण हा राष्ट्राराष्ट्रांचा साम्राज्यवादी सत्ता-लोभांचा झगडा आहे इतकेच इतरांना वाटे. नेहरूंना युद्धाच्या भवितव्यात लोकशाही व हुकुमशाही या तत्त्वांचा झगडा दिसत होता. खुद्द महायुद्ध सुरू झाल्यानंतरही इतर सर्व विचारवंत हे साम्राज्यशाही युद्ध आहे असे म्हणत असता व नेहरूंनाही ते मान्य असता या युद्धाचे स्वरूप ते चालू असतानाच पालटणे शक्य आहे, संभवनीय आहे असे नेहरूंना वाटत होते. म्हणून काँग्रेसच्या युद्धविषयक धोरणाचा जाहीरनामा जो त्यांनी लिहिला त्यात महायुद्धापासून अलग रहाण्याचा अथवा ब्रिटिशांशी लढण्याचा मुद्दा त्यांनी न मांडता हिंदी लोकांना सत्ता मिळाल्यास फॅसिस्ट जर्मनीशी लढण्याची त्यांनी तयारी दर्शविली. १९४१ च्या डिसेंबरात नेहरू तुरुंगातून सुटले त्या वेळी रशिया इंग्लंडच्या बाजूने युद्धात सामील झाला असल्याने अशा वेळी आपण ब्रिटन विरुद्ध सत्याग्रह करणे योग्य नाही असे मत त्यांनी बार्डोलीत स्पष्टपणे दिले आणि १९४५ मध्ये तुरुंगातून सुटल्यावर परिस्थिती क्षणाक्षणाला पालटते आहे हे पाहून नेहरूंनी परकी मध्यसरकारचे गुलाम असलेल्या कार्यकारी मंडळासाठी सिमला परिषदेचे हेलपाटे घातले. ‘इंग्रजांच्या व इतर साम्राज्यवाद्यांच्या अडचणी ती आपली संधी’ असले निवळ म्हणीसारखे जुन्या आंतरराष्ट्रवादाचे ठोकताळी स्वरूप असून सुभाषचंद्रांसुद्धा सगळे आधुनिक विचारवंत या मताचे होते. नेहरूंचा आंतरराष्ट्रवाद असला ठोकताळी नव्हता. आंतरराष्ट्रीय विचार-प्रवाह बदलत असतात. राष्ट्राराष्ट्रांचे बलाबल कमी अधिक होत असते, धनसाधने व युद्धसाधने बदलत असतात. दिवसानुदिवस आंतरराष्ट्रीय राज-कारणाचा वेग व सामर्थ्य वाढत आहे. आपणांस लोकशाही, राष्ट्रीय स्वातंत्र्य व समाजवाद या दिशेने जायचे आहे. त्यासाठी वेगवान अशा इतिहास-चक्रापासून अलग राहण्याचा अट्टाहास न धरता अथवा सामाजिक धोरणा-वाचून नुसत्याच अमूर्त राष्ट्रीय स्वातंत्र्याचा ध्यास न धरता धावत्या परि-स्थितीत आपल्या ध्येयाच्या दृष्टीने योग्य तेथे सामील होऊन परिस्थितीत हस्तक्षेप करावा असे नेहरूंचे धोरण दिसते. इतिहासाच्या अमुक एका परि-स्थितीपेक्षा त्या परिस्थितीतील गतिमानता आणि त्या परिस्थितीत हस्तक्षेप करून ती परिस्थिती आपणांस अनुकूल करून घेण्याची शक्यता याकडे नेहरूंचे लक्ष विशेष असते. जनतेची शिस्तबद्ध पक्षात संघटना करून त्या संघटनेच्या बलावर परिस्थिती गुडघ्यावर घालून वाकविण्याचे लेनिन अथवा स्टॅलिनचे सामर्थ्य नेहरूत नाही. ही त्यांची उणीव राष्ट्रास फार अपायकारक ठरलीही आहे. पण इतिहासाच्या क्षितिजाखाली त्यांची नजर नक्की पोचते. हिटलरचा, त्याच्या आकांक्षांचा, तत्त्वांचा आणि साम्राज्याचा नाश त्यांनी फार आगाऊ पाहिला होता. सिमला परिषदेतून स्वातंत्र्याच्या राजकारणाची

वाट फुटावी इतकी जगाची परिस्थिती आपणांस अनुकूल आहे असे त्यांना दिसले होते. बेचाळीस-चव्वेचाळीसच्या बंडवाल्यांनी अखेर स्वातंत्र्याची कोंडी फोडली ही गोष्ट कोणाहीपेक्षा आधी नेहरूंनी ओळखली. क्रिप्स-वाटाघाटी कोणाकोणामुळे फसल्या हा शिळा वाद आज मला उकरून काढायचा नाही. पण त्या वेळी येथे नेहरू व विलायतेत ॲटली यांना यश आले असते तर देशातील सिव्हिल सर्व्हिस, पोलिस सर्व्हिस व मिलिटरी सर्व्हिस यांवर काँग्रेसचा ताबा येऊन पुढे फाळणी टळली नसती तरी कत्तली टळल्या असत्या. अखेरीस फाळणी व तज्जन्य अनर्थ यांची सर्व जबाबदारी तडकाफडकी पत्करताना नेहरूंच्या नीतिधैर्याची कसोटी लागली. गांधींचाही सल्ला झुगारून त्यांनी हे निकराचे धोरण पत्करले. पण त्याने स्वातंत्र्याचा प्रश्न ताडकन कायमचा सुटला. इंडोचायना, इंडोनेशिया, ब्रह्मदेश, चीन इत्यादींच्या स्वातंत्र्याचे जे धिंडवडे चालले आहेत ते पहाता नेहरूंनी तडकाफडकी फाळणी स्वीकारून परिस्थिती अत्यंत अवघड व अनिश्चित असतानाही हातात घेतली व ती आवरून धरली यात नेहरूंची दूरदृष्टी यशस्वी झाली आहे. हे सर्व राजकारण एकटया नेहरूंनीच यशस्वी केले असे मी म्हणत नाही. गांधी व सरदार यांचा त्यात पुष्कळ हात आहे. पण नेहरूंनी बदललेल्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अनुबंधात हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न सुटत आला आहे हे बरेच आधी हेरले होते, हे त्यांचे वैशिष्टय आहे. त्यांच्या राजकीय धोरणात प्रतिपक्षाशी सौजन्याने, सत्याने व सरळपणाने वागण्याचा जो गुण आहे व जो गांधींच्या प्रेरणेने आला आहे तो आजच्या सार्वत्रिक काँग्रेस राजवटीत फक्त नेहरूंच्याच अंगी आहे. काँग्रेस चोहोकडून अप्रिय झाली असता तिचे नैतिक वजन अजूनही शिल्लक आहे हेही नेहरूंमुळेच. एखाद्या तत्त्वनिष्ठ व शिस्तबद्ध पक्षाच्या अभावी केवळ वैयक्तिक सौजन्यावर राष्ट्राचे तारू आजच्या बिकट परिस्थितीतून नेहरू कसे नेणार ही आज चिंता आहेच. पण जे दुसरे कोणी अशी पक्षसंघटना करतील त्यांना गांधी आणि नेहरू यांनी घालून दिलेला सौजन्य, सरळपणा व सात्त्विक मार्ग यांचा पायंडा सोडता येणार नाही आणि नेहरूंनी एकटयाच्या बळावर वीस वर्षेपर्यंत प्रतिपादिलेल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही समाजवाद व आंतरराष्ट्रवाद याबद्दलचा नेहरूंचा दृष्टीकोनही त्यांना स्वीकारावा लागेल.

हिंदी जनतेने केलेल्या स्वातंत्र्यलढयाच्या प्रत्यक्ष कृतीइतकाच वरील तत्त्वांचा हिंदुस्थानात झालेला प्रचार व प्रसार मला महत्त्वाचा वाटे. ही तत्त्वे लोकांना कळली नसती व तरुणांत लोकप्रिय व मान्य झाली नसती तर गांधींचे नेतृत्व राहिले असते तरी राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयाला इतके उदात्त, व्यापक व आधुनिक स्वरूप आले नसते. एकटया नेहरूंनी ही तत्त्वे तरुणांत

लोकप्रिय व लोकमान्य करण्याचे प्रयत्न सतत वीस वर्षे केले व यश मिळविले हे त्यांचे वैशिष्टच होय.

## परिशिष्ट

जुने व प्रचलित कागदपत्र जपून ठेवण्याच्या कामी मी फारसा कार्यक्षम नाही. यामुळे माझी कित्येक चांगली पत्रे, लेखनाची व व्याख्यानांची टाचणे गहाळ झाली आहेत. त्यातून नेहरूंना मी लिहिलेली दोन पत्रे व त्यांची त्या पत्रांना आलेली उत्तरे मी आजवर मोठ्या दक्षतेने जपून ठेवू शकलो. पुण्यास राजकीय तत्त्वचर्चांचे प्रसंग अनेक येत व त्यांतून निघालेल्या तात्त्विक मुद्द्यांचे खुलासे पत्रव्यवहाराने करून घेण्याची मला सवय होती. मुद्दे निवळ तात्त्विक असत. त्यामुळे अशा पत्रव्यवहारापासून मला तत्त्वविचाराचे कामी फार फायदा झाला आहे. अशा चर्चांतूनच नेहरूंना दोनदा पत्रे पाठविण्याची कल्पना निघाली होती. माझी सदर पत्रे व त्यांस नेहरूंची उत्तरे खाली देत आहे. नेहरूंची उत्तरे छोटीच असली तरी त्यांच्या एकंदर विचारांचे अत्युत्कृष्ट संकलित प्रतिबिंब त्यात पडलेले आढळते.

P. V. Gadgil, Esq.,
687, Sadashiv,
Poona City, 23rd may, 1936.

To

Pandit Jawaharlal Nehru
President, Indian National Congress,
Anand Bhawan, ALLAHABAD (U. P.)

Sir,

In the course of the conversation that took place on Thursday afternoon (21-5-36), between you and the members of the Congress Socialist Party at Mr. Achut Patwardhan's house, I asked you "Do you believe that it is legitimate and proper for the Congress Socialist Party to desire the Indian National Congress to develop socialist ideology and declare one day Indian Socialist Republic as India's goal ? "

शां. २

"In other words "you inquired me in trying to understand my point " Do you want to say whether the Indian National Congress can be a socialist organisation ?"

I agreed with the interpretation. You thereupon denied that the Indian National Congress could ever be turned into a Socialist Organistion in time to come.

" Do you conceive of the possiblitity of India's attaining Independence without Socialism ? " I wanted to know.

You in reply said that you thought it perfectly possible.

Explaining my reason for my querry I said, " I had formed an impression from your Lucknow Presidential address that you did not conceive of India attaining Independence without Socialism and that you wanted to convert the Congress to Socialist Ideology. "

You thereupon said something to the effect that my impression was absolutely wrong. No member in the meeting supported me in my reading of your speech and all seemed to concur with you. As I had not then with me the Text of your speech I had to keep mum.

Coming home I referred to my copy of your address from which I beg to submit to you a portion which I believe supports my impression and contradicts your's. I earnestly hope you will favour me with an explanation in an early reply.

The whole issue to my mind is vital to a certain controvarsy that has long been gnawing at the root of the Party of which we have always regarded you as a staunch sympathiser. A considerably large majority amongst us look upon you as our leader. By your explanation, whatever that may be, you will be helping us on our path.

The portion referred to above from your Lucknow Address runs as below :—

" Much as I wish for the advancement of Socialism in this country I have no desire to force the issue in the Congress

and thereby create difficulties in the way of our struggle for Independence. I shall co-operate gladly and with all strength in me with all those who work for Independence even though they do agree with the Socialist solution. But I shall do so stating my position frankly and hoping in course of time to convert the Congress and the country to it, for only thus can I see it achieving Independence."

Page 17 (lines 10 to 19) English Version printed by Allahabad Law Journal Press.

Hoping again that you will find the matter urgent enough to send me an early reply.

Yours sincerely
P. V. GADGIL

Allahabad
May 26, 1936.

P. V. Gadgil, Esq.
687, Sadashiv,
Poona City.
Dear Comrade,

Your letter of the 23rd May. The National Congress as such can hardly become a completely socialist organisation. It is conceivable of course that it may give place to socialist organisation or, becoming socialist itself cease to be nationalist. What is much more likely is that it will continue to be influenced by both the urges—nationalist and socialist—the latter increasing in strength. I do not think anything in my address creates the difficulty which you have experienced. I think, as I stated, that it is perfectly possible for political independence to come to India without socialism but, in the attainment of the political independence, socialist ideology will play an ever growing part. The political independence that comes in this way may soon be followed, or might almost be accompained by

social freedom. But it is always a possibility that it may come by itself if internal and external events force the political pace. Such political freedom cannot be really suitable and lasting unless it solves the principal economic problems of the country, hence the inevitability of socialism.

Yours sincerely,

*Sd.*—J. NEHRU

Poona, dated 21st February, 1938.

Dear Pt. Jawaharlal,

You have often expressed your view that Landlordism in India and Feudalism in Indian States must be liquidated before we achieve economic emancipation for the masses. This is not so much a Socialist but a National democratic slogan and as such may be adopted by all progressive political groups and parties. A question arose, however, during one of our discussions whether you would have National democracy (abolition of landlordism and feudalism) along with the achievement of independence or only after independence is achieved. Fear was expressed during the discussion that landlords and princes would oppose tooth and nail India's fight for independence and nothing short of forcibly expropriating them of their political and economic power through the process of the struggle would help us to achieve our goal—Independence. For a proper and efficient conduct of the struggle, therefore, comrades, here, think it expedient to make the masses aware that the process of the struggle for Indepedence may take an expropriatory form (not in a Socialistic but in a National democratic way). The struggles in Russia, Spain and China did take such a form, and the masses were aware of that since the start. If the people here also are sufficiently kept warned of the extent, limitation and form of

the struggle it will be easier to lead them, to control them and to invoke, and rely on their initiative.

We should like to know your view on the above.

Yours sincerely

687, Sadashiv Peth. P. V. GADGIL

Sjt. P. V. Gadgil,
687, Sadashiv Peth,
POONA.

Khali Estate,
Via Almora,
March 11, 1938

Dear Gadgil,

Your letter of 21st. I cannot conceive of independence without democracy in India. The two hang together. Therefore we have stated that we want the democratic State in India. The question of expropriation may or may not arise. The proper way to put it is full responsible grovernment in the States and a new land system which ultimately must involve the ending of landlordism. How landlordism will end will depend a great deal on the circumstances existing at the time. Many expediences have been adopted in the democratic countries in the West. Some of these involve partial compensation, some inflation so as to reduce the burden of debt on the State.

Yours sincerely,
J. NEHRU.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 74930
नौपाडा शाखा (स्थळ प्रत)

धनुर्धारी : दिवाळी १९४८

# माझे नेहरूविषयक नवे चिंतन

पं. नेहरूंबद्दल वाचणे, विचार करणे, लिहिणे, बोलणे, आशा वाळगणे, अंदाज करणे, हुरूप मानणे, निराश होणे हा माझा गेल्या वीस वर्षांचा छंद आहे. मला नेहरू या व्यक्तीबद्दल फारसे प्रेम नाही. आदर बेताचाच आहे. मला त्यांचे व्यक्तित्व आवडत नाही. नेहरूंची माझी ओळख असावी अशी तीव्र इच्छा मला असती तर ती गोष्ट मी थोडचाफार परिश्रमाने व युक्तीने घडवून आणली असती. पण व्यक्तिशः नेहरूंशी माझे एकही दिवस पटले नसते हे मला फार ठाऊक आहे. नेहरूंचे लेखन, त्यांचे धोरण, त्यांचे राजकारण, त्यांची भारताच्या भवितव्याबद्दलची तळमळ यांनी मात्र माझे मन मोहून टाकले आहे. आणि सारे जग नेहरूंबद्दल निराश झाले असता मला नेहरूंबद्दल आशा वाटते आहे. यात भक्तिभावाचा अथवा श्रद्धेचा संबंध नाही. मला नेहरूचरित्राकडे पाहून सयुक्तिकपणेच अशी आशा वाटते, भरवसा वाटतो.

मी स्वतः नेहरूंवर अनेकवेळा टीका केली आहे, की त्यांना संघटित कार्य करता येत नाही. कारण त्यांच्या ठिकाणी संघटनाशक्ती नाही. जो कोणी संघटित असेल व नेहरूंना भुरळ घालू शकेल तो नेहरूंना उत्सवमूर्ती करून लोकांना फसवील व नेहरू नेहमीच 'वापरले' जातील असे मी व अनेकांनी अनेकदा म्हटले आहे. आजही माझी ही भीती नष्ट झालेली नाही. आजकालच्या जगात अँग्लो-फ्रेंच-अमेरिकन क्रांत्या आणि रशिया, चीन वगैरे कम्युनिस्ट क्रांत्या हे दोनच क्रांतीचे आदर्श लोकांपुढे आहेत. पैकी अँग्लो-फ्रेंच-अमेरिकन क्रांतीचा कालखंड संपून फार दूर गेला. अँग्लो-फ्रेंच-अमेरिकनांनी सरंजामी अशा मागासलेल्या, दुर्बल व विस्कळित समाजांचा पराभव केला व व्यक्तिस्वातंत्र्य मिळविले. त्यातून लोकशाही नावाची व्यक्तिनिष्ठ भांडवलशाही जन्मास आली. तिने राजकीय व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली अखेर आर्थिक स्वातंत्र्य नष्ट केले. व्यक्तिमात्राच्या कपाळी भांडवलशाहीची गुलामगिरीच आली. ज्यांनी व्यक्तिस्वातंत्र्यासाठी क्रांती केली त्यांचे पुढारी हे भांडवलदार झाले व अखेर भांडवलदारांनी व्यक्तिस्वातंत्र्य बुडविले. आता जगात कोठेही क्रांती करून मुद्दाम भांडवलशाही निर्माण करावी अशी गुणवत्ता भांडवलशाहीत राहिलेली नाही. शिवाय भांडवलदारी क्रांतीच्या आरंभीच्या जगात दळणवळणाची साधने फारशी वाढली नव्हती, त्या त्या देशातील राज्य-

सत्ता या नवीन उदयिष्णू अशा भांडवलदार वर्गापुढे दुबळ्या होत्या आणि ती राष्ट्रे म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इत्यादी त्या त्या वेळी जगात पहिल्या दर्जाची बलाढ्य असल्याने बाहेरच्या हस्तक्षेपावाचून आपापल्या देशातील राज्यसत्तांना उलथून पाडणे त्यांना शक्य झाले. रशियात अथवा चीनमध्ये जी कम्युनिस्ट क्रांती झाली तिला, अनेक कारणांनी बाहेरचा हस्तक्षेप न होण्याने, यशास वाव मिळाला. तशी क्रांती आज जगात कोणत्याच देशात होऊ शकणार नाही. राज्यसत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न आज कोठेही झाला तर रशिया, अमेरिका यांसारखी राष्ट्रे हस्तक्षेप करतात व राष्ट्रीय प्रश्न राष्ट्रीय मार्गाने सुटू देत नाहीत.

रशियन अथवा चिनी क्रांतीत बाहेरचा हस्तक्षेप टळला हे जसे क्रांतीस अनुकूल कारण घडले तसेच त्या दोन्ही देशांत संघटित, शिस्तबद्ध, क्रांतितज्ज्ञ पक्ष होते म्हणून त्या त्या क्रांतीत यश आले. आज नेहरूंच्याजवळ संघटित, शिस्तबद्ध, क्रांतितज्ज्ञ पक्ष नाही; म्हणूनच नेहरूंना क्रांती करण्यात यश येणार नाही व अखेर हा बोलघेवडा, शब्दवेल्हाळ पंडित पराभव खाऊन इतिहासात विराम पावेल, असे अनेक टीकाकार म्हणतात व मीही म्हणतो. पण मी जेव्हा असे म्हणतो व लिहितो तेव्हा मात्र मीच पुन्हा इतिहासाकडे, नेहरूचरित्राकडे, माझ्या मनाकडे वळून पहातो आणि मग मला असे वाटते की माझा मुद्दा हा अखेरचाच कशावरून ? रशियात, चीनमध्ये संघटित पक्ष आहेत, ते शिस्तबद्ध आहेत, पण त्यामुळेच त्यांच्यात कठोरता आली आहे, शक्ती फार संघटित झाली आहे ; अर्थात् त्यामुळेच व्यक्तिस्वातंत्र्य नाहीसेच झाले आहे. अतिसंघटित व अतिसामर्थ्यवान् अशा शक्तीस ज्यांना विरोध, कोणत्याही कारणाने, करावासा वाटतो, त्यांना गुप्त कट, खून, याखेरीज मार्ग उरलेला नाही. लोकमत बदलून काहीच करता येत नाही, कारण लोकमत बदलायला अवश्य असणारे स्वातंत्र्याचे वातावरण तेथे रहातच नाही. मग खून, गुप्त कट, परक्यांची मदत हे मार्ग उरतात. यामुळेच मग राज्यकर्तापक्ष संशयचित्त होतो, दडपशाही करतो, खून करतो, अत्याचार करतो, क्रूरपणे बोलतो, वागतो. संघटित, शिस्तबद्ध, क्रांतितज्ज्ञ असा एखादा पक्ष सत्ता जिंकताना व नंतर सत्ता गाजविताना असा उग्र, क्रूर होतो हा रशियन व चिनी क्रांतीचा अनुभव आहे. रशियात व चीनमध्ये अशी पक्षसंघटना अपरिहार्य-पणे घडली याबद्दल वाद नाही. मी त्यांच्यापुरते त्यांचे समर्थन करतो. पण भारतात ही संघटित, शिस्तबद्ध आणि क्रांतितज्ज्ञ संघटना व्यवहार्य आहे का ? तिचे उद्दिष्ट समाजवादी क्रांती हेच असणार. अर्थात् धनिक वर्गा-भोवती तिची पकड बसणार, पक्षाची कठोर शिस्तबद्धता जितकी अधिक तितकी ही पकड जाम बसणार, आणि मग तेवढाच निकराचा प्रतिकार करण्यासाठी धनिकवर्ग अमेरिकेची मदत मागणार आणि मग आपणाला

रशियाची मदत मागावी लागणार. संघटित, शिस्तबद्ध व क्रांतितज्ज्ञ पक्ष-संघटनेतून प्रचंड हिंसा निघणे टाळता येईल काय ? हे प्रश्नचिन्ह समोर आले की धसका बसतो आणि मग नेहरू असा पक्ष बांधीत नाहीत हेच बरे असे वाटू लागते.

पण हा सारा विचार करून नेहरू पक्षसंघटना करण्याचे टाळतात, की त्यांच्यात तो वकूबच नाही ? त्यांच्यात तो वकूब नाही हे म्हणणे सोपे आहे, कारण ते खरेही आहे. पण नेहरूंच्या आयुष्याकडे पाहिले तर समाजवादाचे ध्येय सतत समोर ठेवूनसुद्धा त्यांनी, अगदी अलीकडील एका प्रसंगाखेरीज केव्हाही कम्युनिस्ट संघटनेचे कौतुक केले नाही, कम्युनिस्टांना जवळ केले नाही. कम्युनिस्टांनी काँग्रेस झेंडयाचा अपमान केला असता कम्युनिस्ट झेंडा नेहरूंनी मागे एकदा पायदळी तुडविला, त्यांच्या हिंसक मार्गाचा नेहरूंनी धिक्कार केला. ज्या ज्या वेळी नेहरूंनी रशियाचा अथवा लाल चीनचा गौरव केला, त्या त्या वेळी त्या त्या राष्ट्रांनी आर्थिक पुनर्घटनेत जे यश मिळविले त्याचे नेहरूंनी कौतुक केले. अगदी अलीकडे काँग्रेसजनांनी कम्युनिस्ट शिस्त अंगी बाणवून घ्यावी असे नेहरू म्हणाले त्याचाही हेतू आपल्या उद्दिष्ट कार्यास सर्वथैव वाहून घेणे, पराभवाने अथवा पिछेहाटीने आपला रस्ता न सोडणे या गोष्टी कम्युनिस्टांपासून आपण शिकल्या पाहिजेत, एवढेच सुचविणे हा आहे. याहून अधिक जवळीक कम्युनिस्टांची नेहरूंना नको आहे. कम्युनिस्टांचा धिक्कार नेहरू फारसा करीत नाहीत, त्यांचेवर दडपशाही फारशी करू नये असे त्यांना वाटते आणि हिंदुसभा, रा. स्व. संघ यांचेपेक्षा अधिक सौम्यपणे नेहरू कम्युनिस्टांबद्दल बोलतात याचे कारण हिंदुसभा व रा. स्व. संघ यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात ज्या प्रतिगामी कल्पना आहेत त्यांची नेहरूंना चीड असून, कम्युनिस्टांचे जे सामाजिक व आर्थिक उद्दिष्ट आहे ते शांतता, सलोखा आणि लोकशाही यांच्या चौकटीत खरोखर शांत व लोक-हितकारी होईल अशी त्यांना आशा असली पाहिजे. खुद्द रशिया व चीन ही राष्ट्रेही आंतरराष्ट्रीय शांतता वाढू लागल्यास शांत व लोकशाहीप्रधान होतील अशी नेहरूंची अटकळ असावी. फ्रान्स व इंग्लंड येथील लोकशाही क्रांती हिंसेतून जन्म पावली, आंतरराष्ट्रीय अशांततेमुळे ती हिंसा भडकत गेली व पुढे ती राष्ट्रे विजयी होऊन भरभराटू लागली तशी ती अंतर्गतत: शांत होत गेली हा इतिहास प्रसिद्ध आहे. याच क्रमाने आजच्या आंतरराष्ट्रीय जगात शांतता नांदेल तर कम्युनिस्ट राष्ट्रातही अंतर्गत शांतता व लोकशाही नांदेल असे नेहरूंना वाटत असावे.

लाल चीन व रशिया यांची पुनर्घटना नेहरू वाखाणतात, पण त्यांची हिंसा त्यांना नको वाटते, आणि अँग्लो-अमेरिकनांची सहिष्णू लोकशाही त्यांना पसंत वाटते, पण त्यांची व्यक्तिनिष्ठ भांडवलशाही, नफेबाजी, बेकारी

नेहरूंना नको वाटते. " हे नेहरूंचे धोरण अंतर्विरोधी असून नेहरूंच्या डोक्यात गोंधळ आहे, ते रशियाचे छुपे गुलाम आहेत, ते छुपे कम्युनिस्ट आहेत. " अशा प्रकारचे निर्बुद्ध अथवा द्वेषभावनाप्रेरित आरोप नेहरूंवर नेहमी केले जातात. पण या आरोप करणारांना इतिहास कळत नाही. आज आपण जिला सहिष्णू लोकशाही म्हणतो ती फ्रेंच राज्यक्रांतीच्या हिंसेतच जन्म पावली व तिच्या विकासात हिंसा विराम पावत गेली. उलट सहिष्णू लोकशाहीच्या संगतीत भांडवलशाही, साम्राज्यशाही यांचा विकास झाला व अखेर त्यांनी सहिष्णू लोकशाहीचा अंत करून फॅसिस्ट हुकूमशाही सुरू केली. इतिहासक्रमात अनेक जोड्या निर्माण होतात व तशाच त्या बदलतात. निरनिराळ्या तत्त्वांचा प्रथम पृथक्पृथक्पणे आणि नंतर इतिहासक्रमात विचार केल्यास, इतिहासात हस्तक्षेप करून त्यात थोडाफार आपणांस हवा तसा बदल करणे माणसाचे हाती असते. म्हणून कम्युनिस्टांची हिंसा टाकून समाजसंघटना स्वीकारावी आणि अँग्लो-अमेरिकनांची भांडवलशाही व बेकारी न घेता त्यांची सहिष्णू लोकशाही घ्यावी असे नेहरूंनी म्हटले तर त्याचा अर्थ, अनेक यंत्रांचे अवयव काढून घेता येतात व नवे यंत्र बनविता येते, तसे ही तत्त्वे त्यांच्या त्यांच्या संचातून अथवा जोडीतून वेगळी काढता येतात व त्यांचा नवा सिद्धांत बनविता यतो. इतिहासघटना या यांत्रिक असतात असे नेहरूंचे मत आहे असे नव्हे. तर माणूस इतिहासाकडे मागे वळून पहातो, त्यातले क्रम, कार्यकारणभाव तपासतो व माणसांच्या विद्या, कला, संघटना, मनोवृत्ती समजून घेऊन आपणाला हवे असे संच, संघ चालू इतिहासातून निर्माण होण्यास कोणत्या प्रेरणा हव्या याचे चिंतन करतो व तशा नव्या प्रेरणा निर्मिण्यासाठी झटतो, असा काहीतरी विकाससिद्धान्त नेहरूंच्या मनापुढे तयार होत आहे व त्या–प्रमाणे ते कार्यप्रवृत्त होत आहेत असे मला वाटते. यात कम्युनिस्टांची हिंसा अथवा कठोर शिस्त नाही, पण त्यांचा सर्व समाजजीवनाची सुसंगत रचना करण्याचा स्पष्ट पण सौम्य प्रमाणातला व व्यक्तिमात्राच्या स्वातंत्र्यावर फारसे आक्रमण न करणारा असा अभिनिवेश खास आहे. तसेच भांडवल-शाही समाजातील सहिष्णुता व समता ही वृत्ती नेहरूत आहे, पण ज्याने त्याने आपल्यापुरते पहावे म्हणजे समाजाचे हित आपोआप होते, ही कल्पना नेहरू मान्य करीत नाहीत व सर्व समाजहित हे व्यक्तिमात्राचे उद्दिष्ट आहे असे मानतात हे काही अगदी नवे असे तंत्र नव्हे. आज ब्रिटनमध्ये सहिष्णू लोकशाही आणि समाजवाद यांची सांगड घातली जात आहे. सहिष्णू लोकशाहीशी पूर्वी चिकटलेली व्यक्तिस्वार्थबाजी आणि समाजवादाशी चिकटलेली हिंसा यांचा त्याग केला जात आहे. नेहरू हे ब्रिटनमधील या घटनेचे भारतात स्वागत करीत असावेत असे मला वाटते.

माझे हे मत हा केवळ माझ्या इच्छेचा खेळ आहे असे कोणीही म्हणू शकेल. नेहरूंनी इतिहासावर ढीगभर वाङ्मय लिहिले असूनही वर लिहिल्या प्रकारचे विचार त्यांनी कोठे मांडलेले नाहीत, हे अगदी खरे आहे. एक तर स्वत: नेहरूच चाचपडत असावेत आणि दुसरे असे की वरील विचारसरणी-प्रमाणे पाहता स्वत: पुढाऱ्याने छापील, कातीव, ठाशीव विचार अनुयायां-पुढे घोकण्यासाठी ठेवण्याची येथे गरज नसते व ते इष्टही नसते. नेहरूंच्या-सारखा पुढारी एखादी नवी कल्पना बौद्धिक दृष्टचा सोपपत्तिक दृष्टीने व व्यवहार्यतेने मांडतो, पण तिच्या प्रचारासाठी व व्यवहारासाठी सर्वव्यापी, बांधीव, घट्ट अशी संघटना उभारीत नाही. ती कल्पना प्रसार पावते, हजारो लाखो लोकांच्या, कार्यकर्त्यांच्या, संघटकांच्या बुद्धीचा, अंत:करणाचा ठाव घेते, अनेक कार्यकर्ते व संघटक आपापल्या कार्यपरिघात त्या कल्पनेचा प्रसार करून संघटना करतात व कार्यान्वित होतात. यामुळे सार्वदेशीय एककेंद्र संघटनेतील हुकूमशाही, जडत्व, अवजडपणा, कठोरता अशा विस्कळित अथवा विकेंद्रित संघटनात येत नाही. अर्थात एककेंद्र संघटनेतील कार्यक्षमता या अनेक विकेंद्रित संघटनांत नसते व कार्य सावकाशीने होते. पण उलट व्यक्तित्व चिरडले जात नाही, हिंसा असलीच तरी कमी संघटित व कमी कठोर असते. सामुदायिक कार्यपद्धतीतील दोन्ही टोकांचे दोष यात टाळले जातात. एककेंद्र संघटनेतील हुकूमशाही व कठोरपणा यात नसतो. उलट व्यक्ति-वादी विचारसरणीत सार्वदेशीय अशा कल्पनेचा एक अभाव असल्याने सार्व-देशीय जीवनात जे अंतर्विरोध निर्माण होतात ते यात टाळले जातात. आणि एका सार्वदेशीय कल्पनेभोवती सर्व विकेंद्रित संघटनांचे सहकार्य व संयोजन घडवून आणण्याचा प्रयत्न होत असतो. व्यक्तिवादी तत्त्वज्ञानातून विस्कळित संघटना निर्माण होऊन लोकशाहीऐवजी अराजक माजते, उलट कम्युनिस्ट तत्त्वज्ञानापासून केंद्रित संघटना निर्माण होते, पण हुकूमशाही माजते आणि एका सार्वदेशीय अशा निवळ कल्पनेभोवती विकेंद्रित पण परस्पर साहाय्यक व परस्परसंयोगी अशा संघटना वाढून त्यातून सार्वत्रिक, सौम्य, पण बऱ्याच व्यक्तिस्वातंत्र्यावर व स्वतंत्र जागृतीवर आधारलेले कार्य भरभराटू लागते. हे सर्व लक्षात घेतल्यास नेहरू कल्पना मांडतात, पण स्वत: संघटना करीत नाहीत हा त्यांचा दोष नव्हे तर गुण ठरतो. याबाबत त्यांचे वर्तन सहेतुक असावे असे मला वाटते.

या दृष्टीने नेहरूंच्या चरित्राकडे पाहाण्यासारखे आहे. त्यांनी स्वातंत्र्याची व समाजवादाची कल्पना जोराने मांडली, ती देशभर पसरली, तीसाठी व तीतून अनेक संघटना निर्माण झाल्या अथवा जुन्या जुन्या संघटनांनी या कल्पना स्वीकारल्या, आत्मसात केल्या व नेहरूंनी या कल्पना नवीन काढल्या नाहीत तरी त्यांना नेहरूंनीच बळ प्राप्त करून दिले, ही गोष्ट इतिहासात

मान्य झाली आहे. फॅसिझम्‌विरोधी लढ्याची कल्पना नेहरूंनीच प्रथम या देशात सोपपत्तिकपणे प्रसृत केली व समाजवाद, फॅसिझम्, कम्युनिझम् या विषयांच्या अभ्यासाला विशेष चालना मिळाली. काँग्रेस विरुद्ध मुस्लिम लीग या वादात नेहरूंनी मन घातले तेव्हापासून त्यात काँग्रेसच्या बाजूने अधिक विवेचकता आली, वादाचे मुद्दे स्पष्ट झाले. फाळणीचा स्वीकार विवेचक भूमिकेवरून नेहरूंनीच प्रथम केला व निर्णय घेतला. सर्व देशभर स्वतंत्रपणे वरील सर्व कल्पनांचा विचार सुरू झाला, जागोजाग संघटितपणे विचार झाला, या कल्पनांना विरोधही झाला. पण व्यवहारात नेहरूंना जो पाठिंबा मिळाला तो लोकांनी हुकूमशाहीने दिला नाही तर स्वतंत्रपणे दिला आणि कालान्तराने नेहरूंच्या कल्पनेची सुफळे दिसू लागली व विरोध मावळला. फाळणी व स्वातंत्र्यप्राप्ती यामुळे दुःखे खूप आली तरी इतिहासात त्या घटना अपरिहार्य होत्या आणि नेहरूंनी निर्धाराने ते निर्णय ठरविले व अमलात आणले हे एकंदरीने बरे झाले असे विचारी लोक मानू लागले आहेत.

परराष्ट्रधोरणातील स्वतंत्रता, आशियावादीपणा, पूर्ण आर्थिक स्वावलंबनाचा आग्रह, सर्व पक्षांचा सलोख्याचा व सहकार्याचा आग्रह, निधर्मीपणाचा अट्टाहास या सर्व कल्पना नेहरूंनी प्रसृत केल्या, त्यावर जोर दिला, आपल्या सरकारी धोरणात त्या अमलात आणल्या, पण आपली म्हणून संघटना त्यासाठी केली नाही. त्या कल्पनांनी एकंदर जनतेच्या मनात व विविध संघटनांच्या कार्यात आणि प्रचारात स्थान मिळविले, त्यांना विरोधही झाला, पण अखेरीस एकंदरीने नेहरूंना पाठिंबाच मिळाला. काँग्रेसमध्ये बरेच मोठे वादळ उठून ते शमले, ते नेहरूंच्या हाती सत्ता देऊन शमले. यामुळे देशात लोकांना एकंदरीने बरे वाटले आहे असे दिसून येते व नेहरूंना मिळालेला पाठिंबा सर्वदेशीय, जाणीवयुक्त व स्थिर आहे असे मत परदेशातही आता व्यक्त होत आहे.

म्हणून नेहरू संघटना करीत नाहीत यावर मी आजवर असंतुष्ट असे, तो माझा असंतोष हल्ली काहीसा कमी होऊ लागला असून यापुढे जनतेच्या कार्यकर्त्यांच्या, पुढाऱ्यांच्या मनाची पकड घेणारी कोणती झंझावाती कल्पना नेहरू मांडणार एवढाच विचार मी गेले काही महिने करतो आहे. आणि पंचवार्षिक योजना ही कल्पना नेहरू देशभर पसरविणार असे मला वाटत आहे. यापुढे ज्या वेळी नेहरू पंचवार्षिक योजनेचा जोरदारपणे पुकारा करतील, प्रचंड बहुसंख्य जनतेला त्या योजनेतील मुख्य बाब जी सहकारी ग्रामीण जीवन ती समजून सांगतील, त्या वेळी देशातील कार्यकर्ते व संघटना आपापल्यापरी स्वतंत्रपणे त्या कल्पनेने भारल्या जाऊन सर्व देशभर कमीअधिक प्रमाणात सहकारी जीवन थरारू लागेल. त्यात सर्वत्र एक सूर येणार नाही, विरोधकांचे आवाजच मोठे ठरतील, पण या खळखळाटाखाली संथ दिसणारा पण वेगवान

होत चाललेला प्रवाह खास उंचावत जाईल. आणि त्यात व्यक्ती व संघटना स्वतंत्र विचाराने सामील होऊन जातील. त्या यशाचे श्रेय नेहरूंना कोणी देणार नसून अपयश, दिरंगाई, यातना, असंतोष याबद्दल नेहरूंच्या संघटना न करण्याच्या दोषाला जबाबदार धरले जाईल. पण अखेर नेहरूंनी पंचवार्षिक योजनेचा फक्त झंझावाती प्रचार केला म्हणूनच व केला तरच ती कल्पना व्यवहारात उतरेल. संघटना हव्यातच. पण जागोजाग लहान लोक त्या संघटना करतील. त्यांचे सहकार्य, संयोजन केले जाईल. पण देशव्यापी एककेंद्र बलवान संघटना नेहरूंना करता येणार नाही, ते करणार नाहीत, ती नकोच आहे.

"मी मुत्सद्दी नव्हे. लहानशा गटात मी कार्य करू शकत नाही. पण पन्नास हजार, एक लाख लोकात मी कार्यक्षम होऊ शकतो." असे नेहरू नुकतेच बोलले. त्याचा अर्थबोध मला आता फार चांगल्या प्रकारे झाला आहे. नेहरूंच्या विधानाचा अगदी उथळ अर्थ फारसा चांगला नाही. "बरोबरीच्या दहावीस कार्यकर्त्यांना आपण बिनतोड युक्तिवादाने व उदाहरणाने आपले म्हणणे पटवू शकत नाही, पण लक्षावधी लोकांच्या जाहीर सभेत लोकांच्या भावना भरमसाट वक्तृत्वाने भडकवून मी टाळचा व मते मिळवू शकतो." असा उथळ अर्थ नेहरूंच्या वरील विधानाचा होऊ शकेल. पण स्वतःच्या मुखाने स्वतःची अशी निंदा नेहरू करणार नाहीत व नेहरूंच्या चरित्रात या अर्थाला आधार नाही. मला नेहरूंच्या वरील विधानात अर्थ दिसतो तो असा की, "सत्ता जिंकण्यासाठी पाचपन्नास माणसात जी गटबाजी करावी लागते ती आपणांस करता येत नाही, तीवर आपला विश्वास नाही, पण लक्षावधी लोकांपुढे आपणा नव्या कल्पना मांडून लोकांना कार्यान्वित करू शकतो, आणि लोक आपापल्यापरी कामाला लागतात." असे नेहरूंचे म्हणणे दिसते. त्यांच्या चरित्राचे सूक्ष्म अवलोकन केल्यास ते खरे वाटते.

सूर्यासारखे हे कार्य आहे. सूर्य हा आपले किरण पृथ्वीवर सोडतो, त्याने वस्तुमात्र प्रकाशित होतात व उष्णता उत्पन्न होते, त्यामुळे वायू उत्पन्न होतो, त्यामुळे जीवनशक्ती निर्माण होते व जल आणि इतर जीवनद्रव्ये निर्माण होतात. जीवनात व सृष्टीत उत्पत्ती, स्थिती, विलय, पुनरुद्भव हा अनुक्रम सुरू होतो. कल्पना अथवा 'आयडिया' यांचा प्रभाव इतिहासात सूर्यप्रकाशा-सारखाच कार्यक्षम ठरला आहे. पण या कल्पना पूर्ण स्वतंत्र नसतात. भौतिक जीवनातून त्या उद्भवतात, भौतिक जीवनात त्यांना अनुकूलता मिळते त्याच यशस्वी होतात. भौतिक जीवनाशी आपल्या कल्पना संवादी आहेत की नाही हे काळजीपूर्वक पहाणे यात सदर कल्पना मांडणाऱ्यांचे कौशल्य असते. नेहरू या कामी कुशल ठरले व कोरिया प्रकरणी व स्वातंत्र्यप्राप्ती-प्रकरणी सिद्ध झाले आहे असे मला वाटते.

नेहरूसंबंधाने मी वर मांडलेले विचार हे माझे नेहरूसंबंधाने थोडेसे बदललेले, सुधारलेले मत आहे. ते अजून निरीक्षणावस्थेत, चिंतनावस्थेत आहे. ते खरे खोटे कसेही असो. मला त्या चिंतनात एक मधुर आनंद वाटत आला आहे, त्याने मतप्रचारात मला नवा हुरूप वाटत आहे.

हंस : दिवाळी १९५१

# भारत आणि जागतिक राजकारण

भारताच्या परराष्ट्र धोरणाला जगातल्या सर्व बड्या राष्ट्रांनी इतके महत्त्व दिले आहे की जागतिक राजकारणाचा मध्य भारतच आहे असा गेल्या चौदा वर्षांत अनेकदा भास होत आला आहे.

याची जी अनेक कारणे आहेत ती समजून घेतली पाहिजेत. भारताच्या भौगोलिक स्थानाला या कारणात पहिला मान मिळतो. आशिया खंडाचा नकाशा डोळ्यांसमोर धरला तर एक गोष्ट स्पष्ट होते की काश्मीरच्या वायव्येपासून ईशान्येपर्यंत पसरलेल्या काश्मीरच्या म्हणजेच भारताच्या लडाख प्रदेशात ११ हजार फुटांपासून २५ हजार फुटांपर्यंत पर्वतशिखरे आहेत. पण या पर्वतशिखरांपलीकडे पुन्हा खाली भारताच्याच प्रदेशात ११ ते १६ हजार फूट उंचीवर विस्तीर्ण पठारे असून त्यामागे चीनच्या बाजूने तीच पठारे हजारो चौरसमैल विस्तारलेली आहेत. साऱ्या जगात सर्वांत अधिक उंचीवरील तिबेट हे भारताच्या जवळजवळ निम्म्या क्षेत्राएवढे जे विस्तीर्ण पठार त्याला आशियाच्या कोणत्याही बाजूने पोहोचण्याचा लडाख हा एकच मार्ग असून लडाख व तिबेट येथे ॲटॉमिक व हैड्रोजन बाँबचे विमानतळ बांधता आल्यास आशिया खंडाच्या सर्व सीमारेषांपर्यंतचा टापू त्या विमानांच्या माऱ्यात येऊ शकतो.

भारताचा विस्तार खूप मोठा असून येथे ४४ कोटी लोकसंख्या व सर्व प्रकारची म्हणजे शेती, खाणी, कारखाने वगैरे प्रकारची धनसाधने कोणत्याही मागासलेल्या राष्ट्रांपेक्षा अधिक प्रगत म्हणून पुढारलेल्या राष्ट्राच्या कह्यात आल्यास त्याला अधिक धनदायी व सामर्थ्यदायी ठरणारी अशी आहेत. म्हणून रशिया व अमेरिका या दोन्ही गटातील राष्ट्रांना भारत आपल्या लगामी यावा, निदान आपल्या गटात असावा अशी उत्कंठा असते.

भारतात मोठ्या निष्ठेने बरीचशी दृढमूल करण्यात आलेली जी लोकशाही ती तर साऱ्या जगाला मोठे आकर्षण झाले आहे. रशियामागून चीनमध्ये कम्युनिझम येईल व येथून तो भारतात येईल असे लेनिन म्हणाला होता. पण गांधी व नेहरू यांच्या दूरदृष्टीने व निर्धाराने तो संभव टळला, एवढेच नव्हे तर, भारत सरकार इंग्लंड-अमेरिकनांच्या वर्चस्वाखाली जात नाही

अशी ज्याप्रमाणे रशियाची खात्री झाली आहे त्याचप्रमाणे भारत सरकार रशियाच्या वर्चस्वाखाली जात नाही अशी इंग्लंड-अमेरिका यांचीही खात्री झाली आहे. इतकेच नव्हे तर अमेरिकेला कम्युनिस्ट चीनबद्दल वैरभाव वाटतो व रशियाला कम्युनिस्ट चीनबद्दल स्पर्धाही वाटते आणि भीतीही वाटते. यामुळे भारत कम्युनिस्ट चीनच्या वर्चस्वाखाली जाणार नाही याबद्दल अँग्लो-अमेरिकन्स व रशिया या दोघांनाही आनंद वाटतो. ( व याचाच चीनला राग येतो. )

म्हणून भारत दुबळा न व्हावा यासाठी अँग्लो-अमेरिकन्स व रशिया या दोन्ही गटांतील राष्ट्रे भारताला विविध साहाय्य करण्याला आतुर आहेत. तसेच आशिया खंडावर चीनचे वर्चस्व स्थापन होऊ नये यासाठी भारतातली दुबळी लोकशाही ही चीनच्या कम्युनिझमपेक्षा अर्थसंघटनेत व रणसंघटनेत अधिक यशस्वी ठरावी अशी रशियाची व अमेरिकेची इच्छा असून त्यासाठी ही राष्ट्रे भारताला साहाय्य करू चाहतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पंधरा वर्षांच्या इतिहासावर नजर टाकली असता भारताला जागतिक राजकारणात आलेले महत्त्व व तसे महत्त्व येण्याची वर दिलेली कारणे याचा उमज सहज पडतो. भारताचे पंतप्रधान व परराष्ट्रमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी भारतास येणारे हे महत्त्व आगाऊ हेरून भारताच्या परराष्ट्र धोरणाची रूपरेषा आरंभापासून आखली. पण आज ते सारे राजकारण फसले आहे, असे टीकाकार म्हणतात. त्याचीच तपासणी मी येथे करणार आहे.

काश्मीरचा एका बाजूने पाकिस्तानने व दुसऱ्या बाजूने चीनने लचका तोडला असून पाकिस्तानने आरंभापासून वैर ठेवले व तेच पुढे चालविले आहे. पण चीनशी भारताने स्नेहभाव ठेवला, चीनला यूनोत घेण्यासाठी फुकट वकिली केली, आम्ही चीनचे खास मित्र असा जगात भारताने डांगोरा पिटला आणि चीनने या सर्व कालात स्नेहभावाचे सोंग करून अखेर विश्वासघाताने भारताचा बारा हजार चौरस मैल एवढा लडाखचा मुलूख गिळला आहे. स्वतःचे मूल अजगराने गिळलेले पहाण्याचे नशिबी यावे तसे आपला मुलूख शत्रू गिळीत असता हताशपणे पहाण्याचे दुर्भाग्य भारताच्या नशिबी आले अशी टीका आज सर्वत्र होत आहे. आणि बुद्धिमान लोक नेहरूंना नालायक ठरवून मोकळे होत आहेत.

मला नेहरूंचे खास समर्थन असे काहीही करावयाचे नाही. अपरिहार्य अशी जी वस्तुस्थिती भारताभोवती आहे तिचे संक्षेपाने मी दिग्दर्शन करतो.

पाकिस्तानने काश्मीरवर स्वारी कशी केली व पुढे यूनोमार्फत शस्त्रविराम कसा झाला हा इतिहास आता सर्वश्रुत आहे. पण एकतृतीयांश काश्मीर प्रदेश पाकिस्तानने गिळला असता भारत सरकार तो परत जिंकून का घेत

नाही आणि उलट आम्ही हा मुलुख परत मिळवण्यासाठी शस्त्र वापरणार नाही अशी हमी भारत सरकार पुन:पुन्हा जी देते ती कशासाठी असा प्रश्न लोक विचारतात. या प्रश्नाचे उत्तर या प्रदेशाच्या स्वरूपात आहे. येथे एक जुनी दंतकथा सांगतो. काश्मीरमधून पाकिस्तानचे सैन्य मागे हटविल्यानंतर ते जेव्हा हल्लीच्या युद्धविराम रेषेच्या आसपास आले तेव्हा तेथपासून फार अवघड मुलुखात लढावे लागणार असे भारतीय सैन्याला आढळले. पुढील मुलूख अतिशय डोंगराळ, नापीक, विरळ वस्तीचा, रानटी टोळ्यांनाच लढण्याला अनुकूल व भारतीय लष्कराला लढण्याला प्रतिकूल ठरून त्यातले युद्ध कदाचित् वर्षानुवर्षे चालेल व नुकत्याच स्वतंत्र झालेल्या व म्हणून दुबळ्या असलेल्या भारताचे रक्तशोषण होऊन पुढील विकासप्रयत्नाला खीळ बसेल अशी भारत सरकारला भीती वाटली. म्हणून पुढले युद्ध टाळण्यासाठी भारत सरकारने अवघड प्रदेशातल्या त्या एकतृतीयांश काश्मीरवर उदक सोडले आणि यूनोकडून युद्धविराम मिळविला अशी युद्धविराम उपपत्ती आहे.

त्यानंतरच्या काळात पाकिस्तानचा विविध उपद्रव भारताला सोसावा लागतोच आहे. पण स्वतंत्र राष्ट्राच्या बाल्यावस्थेत युद्ध टाळता आल्यामुळे गेल्या पंधरा वर्षांत लोकशाही कायम ठेवून देशाचा विकास आपल्याला पुष्कळ करता आला आहे.

चीनने गिळलेल्या लडाखचाही असाच भूप्रदेशाच्या दृष्टीने विचार करावा लागतो. भारत आणि चीन यांची सरहद्द पंचवीसशे मैल लांब आहे हे सर्वांना माहीत आहे. पण ती शंभर मैल रुंद आहे ही गोष्ट कोणाच्या लक्षात येत नाही. व ती कोणी समजून घेण्याचा प्रयत्नही करीत नाही. वास्तविक दोन देशांची सरहद्द म्हणजे ती रेषाच असणार. पण या सरहद्दरेषेला 'रुंदी'-सुद्धा आहे याचा अर्थ असा की या सरहद्दरेषेशी या साऱ्या पंचवीसशे मैल लांबीवर शंभर मैल रुंद असा दुर्लंघ्य हिमालय असून या हिमालयापलीकडेही अनेक ठिकाणी चिनी सरहद्दीस लागून आमचा सपाट प्रदेश आहे व तो तसाच पुढे चीनच्या हद्दीत हजारो मैल सपाटच आहे.

म्हणजे आम्हांला आमच्या सरहद्दीला पोचण्यासाठी १० हजार मैलां-पासून २५ हजार मैल उंचीचे शेकडो पहाड, त्यातील सोसाटचाने वहाणाऱ्या दुर्लंघ्य नद्या, निबिड अरण्ये, हे सर्व शंभर मैल रुंदीत ओलांडून जावे लागते आणि चीनला मात्र सपाट प्रदेशात सैन्याचा तळ ठोकून आमच्या सरहद्दीवर आक्रमण करता येते.

सारी भारत-चीन सरहद्द व त्यातल्या त्यात लडाख, आम्हांला तेथवर जाण्याला हजारो वर्षांपासून अवघड आहे. या पृथ्वीतलावर कोणत्याही राष्ट्राला अशी विचित्र सरहद्द नाही. चीन दुबळा होता व त्याची वाहतुकीची साधने इतिहासकाळात जुनी होती म्हणून लडाखचा प्रश्न आजवरच्या राजवटींना

कधी अवघड गेला नाही. पण भारत स्वतंत्र झाला त्याच्या मागोमाग चीन कम्युनिस्ट झाला आणि तेव्हापासून या सरहद्द प्रदेशात धोका निर्माण झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे चीनबाबतचे नेहरूंचे जे धोरण आहे ते त्यांनी स्पष्ट शब्दात नेहमीच मांडलेले नाही. पण ते सरहद्दीचे हे स्वरूप लक्षात घेऊनच अवलंबलेले आहे. भारत-चीन सरहद्दीचे रक्षण जर नेहमी लढाऊ दळे सरहद्दीवर सज्ज ठेवून करावयाचे म्हटले तर ती गोष्ट कधीच परवडणार नाही, इतकी ती खर्चाची होईल.

सरहद्दीच्या दोन बाजूंस मित्र म्हणूनच दोन राष्ट्रे नांदू शकतात म्हणून नेहरूंनी चीनशी मित्रभाव ठेवला. चीनला यूनोत घेतले तर चीनला जरूर तेव्हा जाबही विचारता येईल ही नेहरूंची दृष्टी होती. चीनच्या कम्युनिझमला पाश्चात्य राष्ट्रांनी जर वेढले नाही व अंतर्गत विकास शांततेने करण्याची संधी दिली तर चीनचा कम्युनिझम सौम्य होईल अशी नेहरूंची अपेक्षा होती.

चीनने तिबेटवर आक्रमण केले तेव्हा नेहरूंनी त्याला विरोध दर्शविला नाही अशी टीका केली जाते. पण एकतर भारत येथे काहीही इलाज करू शकत नव्हता. पण माझ्या दृष्टीने यात आणखी एक मुद्दा आहे. काश्मीर स्वतंत्र झाले अथवा पाकिस्तानात गेले तर येथे अमेरिकेचे लढाऊ विमानतळ येतील व आशियात महायुद्धाचा धोका वाढून भारताच्या स्वातंत्र्यावर संकट येईल, हे जे नेहरूंच्या काश्मीर धोरणाचे रहस्य आहे तेच ( माझ्या मते ) नेहरूंच्या तिबेटविषयक धोरणाचे रहस्य आहे.

तिबेटवर इंग्रजांचा कितीतरी दिवस डोळा होता आणि दुसऱ्या महायुद्धानंतर काश्मीरमध्ये जर अमेरिकेला ॲटॉमिक बाँबस्चा तळ बांधता आला असता तर अमेरिकेने तिबेटमध्ये जाण्याचा चीनचा रस्ता अडवून आशियात युद्धाचा धोका निर्माण केला असता.

आशियात आणि त्यातल्या त्यात भारताच्या आसपास युद्ध होऊ द्यावयाचे नाही आणि आशियातील व आफ्रिकेतील राष्ट्रे पश्चिमी व कम्युनिस्ट राष्ट्रांपासून स्वतंत्र करून आणि स्वतंत्र राखून आशियाची प्रगती शांततेने होऊ द्यायची, जगातल्या शस्त्रास्त्रांचा खर्च कमी करून पुढारलेल्या राष्ट्रांची आर्थिक मदत भारताला व इतर मागासलेल्या राष्ट्रांना मिळविण्याला जग अनुकूल करायचे हा नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचा मुख्य दृष्टिकोन आहे. ही दृष्टी ठेवून ते चीनसंबंधाने वागले. रशिया व लाल चीन यांच्यामध्ये स्नेह व परस्परावलंबन रहाणार पण हळूहळू स्पर्धाही माजणार, हे हेरून नेहरूंनी आग्नेय आशियाचे राजकारण चालविले होते. चीनची महत्त्वाकांक्षा आग्नेय आशिया गिळण्याची असणार, पण रशियाला ही गोष्ट आवडणार नाही. याला कारणे दोन. एकतर त्यामुळे अमेरिकेचे चीनशी युद्ध माजून रशियाला त्यात पडावे लागेल. हे रशियाला टाळावयाचे आहे. शिवाय जगातला जास्तीत-

शां. ३

जास्त कच्चा माल असलेला आग्नेय आशिया चीनच्या पोटात गेल्यास चीनच्या बलाढ्यतेस सीमा न राहून रशियाला चीनचा मांडलिक होण्याचा प्रसंग येईल ही रशियाला भीती आहे.

म्हणून अमेरिकेने आग्नेय आशियात आक्रमण, अथवा कम्युनिझम्-विरोध यासाठी बल न वापरता आग्नेय आशियाचे क्षेत्र दोन्ही गटांपासून तटस्थ राखण्यास साहाय्य करावे असे नेहरू अमेरिकेला सांगत आले. कोरियात उत्तर कोरियाचे आक्रमण हटवून ३८ अक्षांशावर समेट करा, इंडोचीनची फाळणी करून व फ्रेंच सत्ता काढून घेऊन दक्षिण व्हिएतनाम, लाओस, व कंबोडिया हे प्रदेश तटस्थ ठेवा असे नेहरू अमेरिकेला सांगत आले व त्यांनी या धोरणास रशियाचाही पाठिंबा मिळविला.

यात नेहरूंची व रशियाच्या क्रुश्चेवचीही युक्ती ही की नेहरूंनी अमेरिकेला तटस्थतेला अनुकूल करताच चीनचा लगाम खेचण्याला क्रुश्चेवला संधी मिळावी. नेहरू व क्रुश्चेव या गोष्टी इतक्या प्रांजलपणे बोलू शकणार नाहीत. पण केनेडी लाओस तटस्थ ठेवण्याला राजी झाले व त्या बाबतीत क्रुश्चेवचा त्यांना पाठिंबा मिळाला या गोष्टीचा उलगडा वरील उपपत्तीवाचून होऊच शकत नाही. आता चीनबद्दलचे व रशियाबद्दलचे नेहरूंचे धोरण काय आहे याचे आणखी थोडेसे दिग्दर्शन करतो.

चीन कम्युनिस्ट होऊन बलवान झाला आणि भौगोलिक कारणामुळे भारत-चीन सरहद्द अवघड झाली तेव्हा ‘ सुसरबाई तुझी पाठ मऊ ’ या न्यायाने नेहरू चीनशी जास्तीतजास्त काळ स्नेह ठेवून वागू लागले, व अजूनही युद्ध टाळू पहात आहेत. पण त्याचबरोबर आग्नेय आशियात हातपाय पसरण्याच्या कामी चीनला भारताच्या नेहरूंचाच अडथळा होत आहे. आणि रशिया व अमेरिका या दोघांचेही वजन त्या कामी नेहरू वापरत आहेत ही गोष्ट लाल चीनच्या नजरेतून सुटलेली नाही. चीनने भारताशी वैर सुरू करण्याचे हे एक कारण आहे.

उलट चीनचे आक्रमक धोरण आज ना उद्या रशियाला धोक्याचे वाटेल अशी अटकळ नेहरूंनी बांधली असावी, असा माझा तर्क आहे. याला इतिहासाचा व भूगोलाचा आधार आहे. कम्युनिझम आक्रमक होऊ शकतो ही गोष्ट बर्ट्रांड रसेलने तीस वर्षांपूर्वी स्पष्ट केली असून स्टालिनने पूर्व युरोपात जे वर्तन केले ते लाल चीन आग्नेय आशियात करील ही भीती स्टालिनलाही वाटली होती. म्हणून चीनमध्ये कम्युनिस्ट पक्ष विजयी झाल्यास चीनचा बिस्तार , चीनची लोकसंख्या व आशियातील चीनचे स्थान या गोष्टी विचारात घेता स्टालिन चिनी कम्युनिझमला लगाम घालू शकणार नाही व विरोधही करू शकणार नाही, उलट कम्युनिस्ट चीनला साहाय्य करावे लागेल हे स्टालिनला कळले होते. म्हणून स्टालिनने चीनमध्ये कम्युनिझम विजयी

होऊ नये यासाठी खूप प्रयत्न केले. ते सारे फसले आणि शेवटी चीनमध्ये कम्युनिझम विजयी होऊन त्याला सर्वप्रकारची मदत करणे स्टालिनला भाग पडले.

तेच धोरण आता क्रुश्चेवने पुढे चालविले आहे. पण आग्नेय आशिया कम्युनिझमपासून व पश्चिमी राष्ट्रांपासून अलिप्त व तटस्थ रहावा या धोरणास क्रुश्चेव यांनी सतत पाठिंबा दिला असून या धोरणास अमेरिकेला अनुकूल करून घेण्याच्या नेहरूंच्या प्रयत्नास क्रुश्चेव प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने साथ देतात. क्रुश्चेवच्या पाठिंब्यावाचून नेहरूंना या धोरणात यश आले नसते. क्रुश्चेवची अनुकूलता नेहरूंनी हेरली ही गोष्ट त्यांच्या सूक्ष्म दूरदर्शित्वाची द्योतक होय.

चीनला पायबंद घालता यावा यासाठी नेहरूंनी रशियाला नेहमी आपल्या बाजूस ठेवले त्याप्रमाणे अँग्लो-अमेरिकनांची काश्मीरमधील कारस्थाने यशस्वी होऊ नयेत म्हणूनही नेहरूंनी रशियाला आपल्या बाजूस सांभाळले.

नेहरू कम्युनिस्ट रशियाच्या बाजूने थोडा अथवा बराच पक्षपात दाखवितात हा अमेरिका व भारत या दोन्ही देशांतल्या नेहरूविरोधकांकडून केला जाणारा आरोप अंशतः खरा आहे हे माझे वैयक्तिक मत येथे मी प्रांजलपणे सांगून ठेवतो. पण त्याची उपपत्ती अधिक व्यापक व उद्बोधक आहे.

अनेक कारणांनी रशिया व भारत यांचे हितसंबंध समान व परस्परपोषक होत आहेत. काश्मीर अँग्लो-अमेरिकनांच्या वर्चस्वाखाली जाण्यास रशिया व भारत या दोघांनाही धोका आहे. कम्युनिस्ट चीन व कम्युनिस्ट रशिया यांची सरहद्द हजारो मैल भिडलेली असून चीनच्या दुपटीहून रशिया अधिक विस्तीर्ण आहे. रशियाची लोकसंख्या अवघी वीस कोटी तर चीनची पासष्ट कोटींवर गेली असून चीनला लगत असलेल्या लक्षावधी चौरस मैल रशियन सैबेरियात राहायला माणसे नाहीत. यामुळे चीनच्या आक्रमणाची भीती रशियाला मोठी आहे. आणि भारत व आग्नेय आशिया चीनच्या वर्चस्वाखाली जाईल तर चीन अजिंक्य होईल अशी रशियाला खात्री आहे.

उलट भारत स्वतंत्र, बलवान् व लोकशाहीप्रधान राहिला तर आक्रमण न होता चीनला प्रतिस्पर्धी असे सामर्थ्य भारतात निर्माण होईल व आशियात सत्ता समतोल राहून रशियाला धोका कमी राहील अशी रशियाला आशा वाटते. म्हणून भारताचे स्वातंत्र्य व भारताची लोकशाही या दोन्हीबद्दल रशियाला आस्था वाटते. यामुळे अँग्लो-अमेरिकन्स भारताबद्दल जो स्नेह दाखवितात त्यापेक्षा रशियाचा भारताबद्दलचा स्नेह अधिक प्रामाणिक, अधिक निर्भेळ , अधिक चिकाटीचा व अधिक विश्वासार्ह आहे असे मला तरी नेहमी वाटत आले असून नेहरू व मेनन यांचे हेच मत असावे असा माझा तर्क आहे.

भारत व रशिया यांचा स्नेह असण्याचे आणखी एक फार बलवान कारण आहे. जगात युद्ध होऊ नये असे भारताच्या हिताच्या दृष्टीने जसे नेहरूंचे प्रामाणिक मत आहे तसेच क्रुश्चेवचेही रशियाच्या हिताच्या दृष्टीने प्रामाणिक मत आहे. चीनचा कम्युनिझम नवीन असून जनता मागासलेली आहे व ती कठोर हुकूमशाहीखाली असून तिला नेहमी युद्धाच्या मनस्थितीत ठेवणे लाल चीनच्या पुढाऱ्यांना आवश्यक वाटते व शक्यही होते. पण रशियाचा कम्युनिझम परिपक्व होत आला आहे. तेथे शिक्षणप्रसार खूप होऊन लोक विचार करू लागले आहेत. दुसऱ्या महायुद्धाची कठोर स्मृती त्यांच्या डोळ्यापुढे ताजी असून चाळीस वर्षे त्याग, कष्ट, आपत्ती सोसून निर्माण केलेली भौतिक सुखसंधी त्यांना भोगावयाची आहे. आणि त्यासाठी आवश्यक असणारी जागतिक शांतता टिकविण्यासाठी नेहरू नावाचा भारताचा पुढारी झटतो आहे, तो यशस्वी झाला व त्याचा स्नेह टिकविला तर तो अँग्लो-अमेरिकनांना रशियाशी लढण्यापासून परावृत्त करील असा जागृत रशियन जनतेलाही विश्वास वाटत आहे.

अर्थात क्रुश्चेव आज रशियन जनतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब असल्यामुळे नेहरूंशी दृढ स्नेह ठेवतो व हा स्नेह नेहरूंना वरील उपपत्तीमुळे भरवशाचा वाटत असून रशिया भारतीय लोकशाहीला विरोध करणार नाही, येथल्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाही व भारताला अँग्लो-अमेरिकनांशी जसा स्नेह ठेवायचा असेल तसा ठेवण्याला रशिया विघ्न आणणार नाही याबद्दलही नेहरूंना भरवसा वाटतो.

म्हणून स्टालिनवर रशियात व इतरत्र केवढीही कठोर टीका झाली तरी नेहरू व मेनन त्याबाबत मौन पाळतात. हंगेरीतील रशियन अत्याचारांबद्दल नेहरू व मेनन यांनी अमेरिकेला व येथल्या प्रजासमाजवाद्यांना हवा तेवढा रशियाचा तीव्र निषेध केला नाही हे खरे आहे व त्याचे समर्थन वरील प्रकारे करता येते.

हंगेरीत व पूर्व जर्मनीत सार्वमत मागण्याच्या अमेरिकेच्या धोरणास नेहरू व मेनन पाठिंबा देत नाहीत याचे कारण काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याची जरुरी नाही या भारताच्या धोरणास रशियाचा पाठिंबा त्यांना कायम टिकवायचा आहे. आणि रशियन जनतेला भारताची मैत्री ही निष्ठेची आहे हे नेहरू पटवू इच्छितात.

पश्चिमी राष्ट्रांशी भारताचे पहिले भांडण काश्मीरबद्दल आहे. आरंभी म्हटल्याप्रमाणे काश्मीरवर अँग्लो-अमेरिकनांना ताबा हवा असून त्यासाठी काश्मीर पाकिस्तानात जावे असा चिकाटीचा प्रयत्न अँग्लो-अमेरिकनांनी सतत गेली चौदाही वर्षे केला. पाकिस्तानला शस्त्रास्त्र साहाय्य देऊन व पाकिस्तानशी संरक्षणाचा करार करून पाकिस्तानव्याप्त काश्मीरात

अमेरिकेने आपला रणसाहित्य संसार थाटलाही आहे. तोच बाकीच्या काश्मीरातही पसरावा अशी अमेरिकेची इच्छा व आकांक्षा आहे.

पाकिस्तानात शस्त्रास्त्रे वाढल्याने भारताला धोका वाटून भारतही शस्त्रास्त्रे वाढविते. पण भारत कम्युनिझमच्या नियंत्रणाखाली जाणार नाही अशी अमेरिकेला खात्री असल्याने भारत व चीन यांचे वैर राहण्यात अमेरिकेला कुत्सित आनंद होतो. भारताचे रणसामर्थ्य प्रचंड झाल्याने पाकिस्तानला त्याची भीती वाटून पाकिस्तान अमेरिकेच्या कह्यात रहाते व भारत रोखीने शस्त्रास्त्रे घेत असल्याने अँग्लो-फ्रेंच-अमेरिकनांच्या शस्त्रास्त्र कारखान्यांना नेहमी चांगले गिऱ्हाईक रहाते हा अँग्लो-फ्रेंच-अमेरिकनांचा यात स्वार्थ आहे.

भारताला आर्थिक विकासासाठी रशियापेक्षाही अधिक मदत अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी इत्यादींनी दिली आहे. तिचे मुख्य कारण चीन आशियात प्रबळ होण्यापूर्वीच भारताची लोकशाही आर्थिक क्षेत्रात यशस्वी होऊन आग्नेय आशियात चीनला पायबंद बसावा अशी अमेरिकेची इच्छा आहे हे होय.

कोरिया, इंडोचीन, लाओस, या आग्नेय आशियातील प्रदेशांबाबत अमेरिका व भारत यांचा जवळ जवळ दहा वर्षे मतभेद झाला व आता मात्र एकमत होऊ लागले आहे ही सबंध घटना पारखण्याजोगी आहे.

अॅटम बाँब व शस्त्रबळे यांच्या धाकाने व युद्धाचा धोका पत्करून कम्युनिस्ट चीनच्या आक्रमणास आपण पायबंद घालू व आग्नेय आशियात अमेरिकन वर्चस्व स्थापू अशी आकांक्षा व आत्मविश्वास आयसेनॉरच्या अमदानीत अमेरिकेने बाळगला होता. पण इंग्लंड व फ्रान्स यांनी युद्धाचा धोका असलेले धोरण अमेरिकेला पत्करू देण्याचे साफ नाकारले. हळूहळू रशियाची क्षेपणास्त्रेही अधिकाधिक बलवान झाली. फ्रान्स, ब्रिटन वगैरे राष्ट्रे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाशी सर्वथैव मिळते घेईनात. आणि या सर्वांत अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आग्नेय आशियात अमेरिका तटस्थ राहील तर रशिया त्या तटस्थतेला पाठिंबा देऊन चीनच्या आक्रमणास पायबंद घालण्याला साहाय्य देईल असे अमेरिकेचे राष्ट्रपती केनेडी यांना पटू लागले व लाओसबाबतीत आज भारत व अमेरिका यांचे एकमत झाले आहे.

पण काश्मीरबाबत अमेरिकेचा लोभ संपत नाही तोवर भारत-अमेरिका खटके उडणार, भारत-पाकिस्तान तेढ राहणार आणि चीनशी भारताची तेढ वाढावी अशी इच्छा अमेरिका बाळगणारच.

शस्त्रास्त्र-साहाय्य कराराबाबतही भारत व अमेरिका यांचे खटके नेहमी उडत आले. नेहरू रशियापक्षपाती ठरले आहेत. त्यातही रशियाने इतर कम्युनिस्ट राष्ट्रांशी केलेल्या शस्त्रास्त्र-साहाय्य कराराचा निषेध नेहरूंनी प्रत्यक्षपणे कधी केला नाही. इतकेच नव्हे तर भारतावर आक्रमण करणाऱ्या

चीनशी रशियाने शस्त्रास्त्र-साहाय्याचा करार केलेला असतानाही व लाडाख-मध्ये रशियाची काही शस्त्रास्त्रे आलेली असणे शक्य असतानाही नेहरूंनी रशियाला कधी धिक्काराने व टीकेने दुखविले नाही. याचे कारण रशियाचा भारतविषयक स्नेह, वर दाखविल्याप्रमाणे, संपूर्णपणे समान हेतूचा असून आशियात, विशेषत: चीनशी वागताना रशियाचा तो स्नेहच अधिक उपयोगी पडतो. तो उठल्या-सुटल्या टीका करीत बसून गमविण्याला नेहरू तयार नाहीत.

उलट पाकिस्तानशी अमेरिकेने शस्त्रास्त्र-साहाय्याचा करार करून पाकिस्तानच्या काश्मीरविषयक आकांक्षांना अमेरिका उघड पाठिंबा देत असल्या-मुळे भारताला जाहीरपणे अमेरिकेच्या शस्त्रास्त्रकरारविषयक धोरणास विरोध नोंदविणे अपरिहार्य ठरते.

कोणाशीही शस्त्रास्त्र-साहाय्याचे करार न करणे व कम्युनिस्ट अथवा पश्चिमी राष्ट्रांच्या गटात सामील न होणे या नेहरूंनी स्वातंत्र्यानंतर जाहीर केलेल्या धोरणामुळे अमेरिका प्रथम चकित झाली. नंतर चिडली. पुढे नेहरूंच्या धोरणाची साथच पसरली. ब्रह्मदेश, सिलोन, इंडोनेशिया, इजिप्त, इराक आणि आफ्रिकेतील सर्व नवीन स्वतंत्र राष्ट्रे यांनी हे असंलग्नतेचे धोरण स्वीकारले. नेहरूंनी हे धोरण प्रथम अवलंबून प्रतिष्ठा मिळविली. यामुळे या सर्व स्वतंत्र राष्ट्रांना नेहरूंच्या उदाहरणावरून चिथावणी मिळाली याबद्दल सर्व अमेरिकन वृत्तपत्रे चरफडतात. ती पत्रे व अमेरिकन मुत्सद्दी त्याबद्दल नेहरूंना कधीच क्षमा करणार नाहीत.

उलट क्रुश्चेवला नेहरूंचे हेच धोरण फार आवडले. कारण त्यामुळे नवीन स्वतंत्र झालेली, मागासलेली राष्ट्रे अमेरिकन वर्चस्वापासून अलिप्त रहातात. स्वत: क्रुश्चेव्हला आपल्या सरहद्दीपासून दूर असणाऱ्या प्रदेशात आपले वर्चस्व स्थापण्याची मुळीच इच्छा नाही. तेथे अमेरिकन वर्चस्व अथवा चीनचे वर्चस्व होऊ नये एवढेच त्यास हवे आहे. नेमके हेच कार्य भारत करीत आहे याचा क्रुश्चेवला आनंद वाटत असून भारत स्वत: दुर्बल असल्याने कोणत्याही परराष्ट्रात भारत वर्चस्व स्थापील अशी भीती रशियाला वाटत नाही.

सुएझ प्रकरणी भारताने ब्रिटनला विरोध केला व रशियाच्या हाताला हात भारत लावत आहे असा देखावा दिसला. यामुळे ब्रिटनने भारतावर कायमचा डूक धरला असणे स्वाभाविक आहे. अरब राष्ट्रांत अमेरिकेला पाय रोवता यावा म्हणून जे 'आयसेनॉर डॉक्ट्रिन' आयसेनॉरने जाहीर केले ते नास्सेरने हाणून पाडले व त्याला नेहरूंची उघड फूस होती. क्यूबा प्रकरणी नेहरूंनी अमेरिकेला दोष दिला. यामुळे रशियाला बरे वाटले व अमेरिका चिडली. पण रशियाने अण्वस्त्रप्रयोग सुरू केला तेव्हा त्याचा निषेध नेहरूंनी केला नाही आणि अमेरिकेच्या अण्वस्त्रप्रयोगावर मात्र मेनननी उपरोधिक बोलून अनेकदा टीका केली.

यांतले काही प्रकार टाळता आले असते. पण काश्मीर-प्रकरणी अमेरिका खुनशीपणाने वागत आहे आणि पाकिस्तानच्या भारतविरोधी धोरणाला जाणूनबुजून फूस देत आहे. उलट रशिया भारताविरुद्ध वर्तन अथवा भारत-विरोधी टीका काहीही करीत नाही. कम्युनिस्टांविरुद्ध भारत सरकारने कोणतेही धोरण आखले तरी रशिया चकार शब्द बोलत नाही. उलट येथल्या कम्युनिस्टांना रशिया जर काही सांगत असेल तर नेहरू सरकारला हाणून पाडू नका असेच सांगत असावा असे दिसते. कांगोत भारताचे सैन्य गेले यामुळे रशियाचा हस्तक्षेप थांबला आणि कटांगा स्वतंत्र ठेवण्याची पश्चिमी राष्ट्रांची कारस्थाने भारताला थांबविता आली नाहीत. पण रशियाने भारतावर थोडीही टीका केलेली नाही आणि काश्मीर प्रकरणी भारताला संपूर्ण, बिनशर्त, भरवशाचा पाठिंबा रशियाकडून मिळत असतो.

क्रुश्चेवचे वागणे काहीसे रासवट शेतकऱ्यासारखे आहे. यूनोच्या टेबला-समोर बोलताना त्याने जोडा उगारला ते याचेच लक्षण आहे. पण पश्चिमी राष्ट्रांशी तो कसाही वागो, नेहरूंना एकदा जे त्याने मित्र म्हटले आहे ती मैत्री त्याने शब्दाने, भावनेने, कृतीने कधी थोडीही कमी केली नाही. निव्वळ राष्ट्रीय स्वार्थाच्या दृष्टीने क्रुश्चेवची ही मैत्री भारताने गमवता कामा नये, मग अमेरिका काहीही म्हणो, असे माझे विचारपूर्वक मत बनलेले असून नेहरू व मेनन यांचे असेच मत असावे असे मला वाटते.

हल्ली चीन आर्थिक संकटात सापडला असून तो भावी काळात फार बलाढ्य होईल असा संभव दिसेनासा झाला आहे. त्याबरोबर अमेरिका-प्रभृती पश्चिमी राष्ट्रांची भारतास मदत करण्याची आस्था आटू लागली आहे. 'लंडन टाइम्स'ने नुकतेच लिहिले आहे की, "भारतास कम्युनिझमची भीती मुळीच उरलेली नाही. आता तिसरी पंचवार्षिक योजना मोडून गेली तरी त्यात फारसा धोका नाही." युरोपीय समाईक बाजारातून भारताला बाहेर ठेवण्याचा डाव खेळला जात आहे. पण चीनची आर्थिक पीछेहाट झाली तरी भारताची पीछेहाट व्हावी असे रशियाला वाटेल असे मला दिसत नाही. कारण पश्चिमी राष्ट्रांचे आशियात वर्चस्व वाढू नये याला भारताची भरभराट होणे हा महत्त्वाचा उपाय आहे असे रशियाला वाटते.

युरोपीय बाजारपेठेपासून भारत जितका दूर तितका तो रशियाला जवळ. यांत्रिक व शास्त्रीय साहाय्य रशियापासून भारताला जास्तीतजास्त मिळेल आणि पश्चिमी राष्ट्रांपासून भारत जितका दूर जाईल तितके या देशातील व्यापारी व कारखानदार यांचे वर्चस्व कमी होणार असून येथल्या लोक-शाहीला रशिया अपाय करू शकणार नाही व तसे तो इच्छित नाही. यामुळे रशियाचा स्नेह भारताला अधिकाधिक भरवशाचा व उपयुक्त ठरेल असे माझे मत आहे.

यावरून मी छुपा अथवा खुला कम्युनिस्ट आहे असे कोणी म्हणतील. पण मी निर्भेळ लोकशाहीवादी असून भारताचे परराष्ट्र धोरण केवढ्या तरी क्षेत्रात अगदी स्वतंत्र आहे, तसेच ते चालावे, अमेरिकेतील केनेडी, गॅलब्रेथ यांच्यासारखा ध्येयनिष्ठ व समंजस पुढाऱ्यांच्या मतांची आम्ही कदर करावी, कोणत्याही गटाला बांधून न घेता आपले व्यवहार–स्वातंत्र्य भारताने कायम ठेवावे असे माझे आग्रहाचे सांगणे आहे.

केनेडी, गॅलब्रेथ यासारख्यांना हे धोरण आवडते हे, रशियाची एम्. आय्. जी. विमाने खरेदी करण्याच्या प्रकरणी भारताच्या स्वतंत्र राष्ट्र या नात्याने निर्णय ठरविण्याच्या हक्कास विरोध करण्याचे त्यांनी नाकारले यावरून उघड होते. माझी ही भूमिका नेहरू व मेनन यांचीच आहे. नेहरू व मेनन हे निस्संशय लोकशाहीवादी असल्याने त्यांना कम्युनिस्ट म्हणणे जितके चूक होईल तितकेच मला कम्युनिस्ट म्हणणे चूक होईल.

काश्मीर व लडाखपासून सुरवात करून जागतिक राजकारणाचा असा फेरफटका केल्यानंतर समारोपावेळी पुन्हा त्या मूळ पदावर मी येतो. पैकी भारत-पाकिस्तान वाद अमेरिकेला हवा तोवर, हवा तितका रहाणारच.

उलट लडाखबाबत रशियाची मदत काही होईल का ? रशियाची प्रत्यक्ष मदत अशी होणार नाही. पण उलट रशिया चीनला चिथावणारही नाही. कारण चीन बलवान होण्यात रशियाला धोका आहे. चीन लडाख प्रदेश सोडणार नाही. कारण तिबेटात जायला त्याला दुसरा रस्ताच नाही.

आणि आपली सरहद्द आपणाला संरक्षिण्याला शक्य असू नये व आक्रमकाला मात्र ती सोपी असावी अशी जगात अद्वितीय परिस्थिती येथे आहे.

त्यात सोय एवढीच आहे की काश्मीरच्या अंतर्भागावर चाल करण्याचे सामर्थ्य चीनलाही नाही. आता श्रीनगरपासून अक्साई चीनपर्यंत मोटार सडक करून त्यावरून शस्त्रास्त्र न्या असे काही अतिशहाणे सुचवितात. हा रस्ता अव्यवहार्यच आहे. पण हिमालयाची काही शिखरे त्याखालच्या दऱ्याखोऱ्यात आडवी घालून अब्ज कोटीच्या खर्चाने तो रस्ता केलाच तर तोवर त्या रस्त्यात भारताची शक्ती इतकी गाडली जाईल की त्या रस्त्याने आम्ही जाण्यापूर्वी चीनच येथे येईल.

आजच्या कटकटी अशाच चालल्या तरी पश्चिमी राष्ट्रांपेक्षा रशियाचा स्नेह उत्तरोत्तर भारताला फायदेशीर होईल व स्वातंत्र्य आणि लोकशाही टिकून आपणास प्रगती करता येईल असा मला भरवसा वाटतो.

गावकरी : दिवाळी १९६२

# पं. नेहरू आणि लाल चीन

मी हा लेख उद्विग्न मनाने लिहित आहे. गेल्या पंचवीस वर्षात मी जे काही लिखाण केले असेल त्यात एकाच थोर व्यक्तीविषयी मी जास्तीतजास्त लिहिले आहे, ते जवाहरलाल नेहरू यांच्या संबंधाने. भारतातील आजवरच्या सर्व थोर पुरुषांचा हिशेब मनाशी ठेवून मी म्हणू शकतो की, नेहरूंच्याएवढा थोर पुरुष आजवर या देशात झाला नाही. आज जगात जे लोकोत्तर राजकारणी पुरुष आहेत त्यांत नेहरूंची गणना बऱ्याच वरच्या क्रमांकात केली जाईल. मला नेहरूंच्याइतका आदरणीय राजकारणी मुत्सद्दी आजवर कोणी आढळला नाही.

पण हे स्तुतिपुराण अधिक वाढवीत नाही. मला त्याचा कंटाळा आला आहे आणि लोकही त्याला कंटाळलेले आहेत. नेहरू आज सत्तापदावरून खाली येतील तर बरे असे मला आज प्रामाणिकपणे वाटू लागले आहे. स्वतः नेहरू आपणहून सत्ता सोडतील असा संभव नाही. कोणीतरी लोकसभेच्या निवडणुकीत अथवा पार्लमेंटरी काँग्रेस पक्षातील पुढाऱ्याच्या निवडणुकीत त्यांचा पराभव करून त्यांना सत्तापदावरून खाली उतरवावे हेच हितकर होईल.

याचा अर्थ नेहरूंचे राजकारण मला नापसंत झाले आहे असा नव्हे. पण बरेच जाणते म्हणणारे पुढारी त्यांच्या नेतृत्वाला कंटाळलेले आहेत. ज्यांना नेहरूंचे नेतृत्व हवे आहे त्यांना नेहरूंच्यापासून काही फायदा मिळवावयाचा असल्याने ते हवे आहेत. सामान्य जनतेला नेहरू हवेसे वाटतात ते केवळ नेहरूंच्याबद्दल जनतेला प्रेम वाटते म्हणून. त्यांच्या राजकारणाचे रहस्य समजून जनता त्यांना पाठिंबा देते असे नाही. अशा परिस्थितीत नेहरूंनी सत्तापदावर रहाणे यात दिवसानुदिवस त्यांची विशोभा होऊ लागली आहे.

आज नेहरू सत्तापदावरून खाली आले तर त्यांच्या जागी जे दुसरे कोणी येतील ते अधिक काही पराक्रम करतील असे नव्हे. पुढारीपदावरचा ‘ माल ’ आज जो देशभर पसरलेला आहे, तो नेहरूंच्या मानाने एकदम बराच उणारव आहे. आणि परिस्थिती—या देशातील व जगातील—इतकी फसवी आहे की, जगातले थोर थोर मुत्सद्दी त्या परिस्थितीपुढे फसत आहेत. या परिस्थितीत नेहरू टिकले आहेत इतके दुसरे कोणी टिकलेले नाही.

पण या साऱ्या बोलण्याचा उपयोग काय ? भारतात हे कोणीही ओळखत नाही. नेहरूंच्या जागी जे दुसरे कोणी मुत्सद्दी येतील त्यांच्या हातून आजच्या परिस्थितीत जर काही बदल झाला तर परिस्थिती बिघडण्याच्याच स्वरूपाचा तो बदल होईल. त्या वेळी मात्र लोकांना ती परिस्थिती बिघडल्याचाही बोध होईल आणि मग नेहरू सत्तापदावरून गेल्यामुळे आपण काय कमावले याचाही लोकांना बोध होईल. आज नेहरू सत्तापदावर असता त्यांना जो निर्बुद्ध पाठिंबा मिळत आहे व निर्बुद्ध विरोध होत आहे त्याऐवजी नेहरू सत्तापदा-वरून खाली उतरल्यानंतर आजच्या नेहरूंच्या विरोधकांना आणि आजच्या त्यांच्या पाठीराख्यांना नेहरू नेमके काय करीत होते हे स्पष्टपणे कळेल आणि मग नव्या पुढाऱ्याला जनतेतून दोन्ही बाजूंनी विचक्षण असे मार्गदर्शन मिळू लागेल.

आजचा नेहरूंना असलेला निर्बुद्ध पाठिंबा आणि निर्बुद्ध विरोध या दोन्ही गोष्टी लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहेत. नेहरू हुकुमशाही स्थापू इच्छिणारे असते आणि तशी कुवत व संघटना त्यांच्या ठिकाणी असती तर ही परिस्थिती हुकुमशाही स्थापण्याला अनुकूल होती. पण नेहरूंच्या बाबतीत ही गोष्ट अशक्य आहे, म्हणून नेहरूंची थोरवी जनतेला विचक्षणतेने कळून जनता सावध आणि कर्तुत्वशील होण्यासाठी नेहरू सत्तापदावरून खाली येण्याची गरज निर्माण झाली आहे.

नेहरूंच्या सर्व उज्ज्वल चरित्रावर आज कलंकशी भासणारी परिस्थिती म्हणजे पाकिस्तान आणि त्याहीपेक्षा चीन ह्यांनी भारतावर केलेली आक्रमणे ही होय. या आक्रमणासंबंधीचे माझे मत मी या लेखाच्या शेवटी शेवटी सांगणार आहे. पण सामान्य जनसमाजाला अगदी लाजिरवाणी वाटणारी अशी ही परिस्थिती आहे. दोन बाजूंनी दोन शत्रूंनी हजारो चौरस मैल मुलूख शस्त्रबलाने जिंकून घेतला, वर्षानुवर्षे आपल्या ताब्यात ठेवला, त्यातला एक तसूभरही आपण परत घेऊ शकत नाही आणि तरीही शत्रूशी शांततेच्या व गोडीच्या गोष्टी बोलण्याला आमचे पंतप्रधान नेहमी उत्सुक असतात, ही परिस्थिती लोकांना लाजिरवाणी वाटतेच.

नेहरूंच्या प्रेमामुळे कोणी ती बोलून दाखवीत नाही. दुसरा अधिक लायक माणूस नेहरूंची जागा घेऊन ही परिस्थिती चांगल्या बाजूने पालटू शकेल अशी लोकांना खात्री वाटत नाही अथवा जो तो आपल्या संसारात, धनलोभात, सत्तालोभात गुंतलेला आहे आणि देशावर परचक्र येऊन त्याचा पाणउतारा झाला याची खंत वाटून घेण्याला कुणाला वेळच नाही. यामुळे नेहरूंचा व्हावा तितका धिःकार होत नाही.

आजच्या परचक्राच्या परिस्थितीचे स्वरूप नेमके काय आहे हे समजून घेऊन लोकांनी व पुढाऱ्यांनी नेहरूंना पाठिंबा दिला असता तर मला त्यात

आनंद वाटला असता. पण बहुतेकांना हे कळतच नाही आणि ज्यांना याविषयी काही कळते, त्यांना ही परिस्थिती लाजिरवाणी आहे एवढेच कळते. आणि तरीही बेफिकीरपणे ते नेहरूंचा धिःकार करीत नाहीत. अशा मूढ अथवा बेफिकीर पाठिंब्याने नेहरूंनी सत्तापदावर रहावे हे लोकशाहीच्या दृष्टीने मुळीच इष्ट नाही.

पण नेहरूंची थोरवी जाणून घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी त्यांचें राजकारण कसे समजून घ्यावे हे मी या लेखात सांगतो. भारत स्वतंत्र झाला त्या गोष्टीला पंधरा वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी केव्हातरी नजीकच्या काळात 'मी आता नुसत्या लढ्याला कंटाळलो आहे. भारताचे काहीतरी विधायक हित करावे अशी तृष्णा मला लागली आहे' अशा अर्थाचे उद्‌गार नेहरूंनी काढले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर ती परिस्थिती आली आणि भारत स्वतंत्र होऊन नेहरू स्वतःच पंतप्रधान झाल्यामुळे जे विधायक हित भारताचे करावे अशी नेहरूंना इच्छा होती, ते हित करण्याची संधी त्यांना मिळाली.

पण परिस्थिती किती कठीण आहे याची कल्पना त्या वेळी भारतात जवळजवळ कोणालाही नव्हती. आणि नंतरच्या काळात नेहरूंनी अतिशय अवघड परिस्थितीतून, त्या परिस्थितीचा अवघडपणा एरव्ही जितका जाणवला असता तितका जाणवू न देता, बऱ्याच संथपणे वाट काढली. यामुळे अतिशय अवघड दिवसांतून आपण गेलो याची कोणासच जाणीव नसून महागाई, टंचाई यांसारख्या दुःखांच्या नावाने आपण सर्वजण आक्रोश करीत आहोत व अर्थातच नेहरूंना त्याबद्दल जबाबदार धरीत आहोत.

नेहरूंनी आंतरराष्ट्रीय राजकारण जे केले तेच गेल्या पंधरा वर्षांत विशेष चमकदार दिसले आहे, हे अगदी खरे. आणि आपण जगासमोर चमकावे म्हणूनच नेहरूंनी परराष्ट्र धोरणात विशेष लक्ष घातले आणि स्वदेशाची उपेक्षा केली असे आरोप त्यांच्यावर उघड उघड करण्यात आले आहेत. अशा प्रकारचे आरोप कितपत खोडता येतील हे मला येथे पहावयाचे आहे.

पहिली एक गोष्ट सांगितली पाहिजे की, भारतापेक्षा पश्चिम यूरोप, अमेरिका, रशिया यातील लोक नेहरूंना अधिक मानतात. या तीनही प्रदेशांतील कोटयवधी जनता नेहरूंच्या हालचालींकडे जितके लक्ष लावून पहाते इतके जगातल्या दुसऱ्या कोणत्याही एक महापुरुषावर प्रेम करीत नाहीत, अथवा नेहरूंच्या हालचालींकडे लक्ष देत नाही. अरब राष्ट्रांतील जनतेचे लक्ष नेहरूंनी असेच वेधून घेतले आहे. याचे कारण गेल्या पंधरा वर्षांत तिसरे महायुद्ध होण्याचा अनेकदा अगदी नजीक आलेला संभव नेहरूंनी अनेकदा टाळला याबद्दल रशिया, पश्चिम यूरोप, अमेरिका, अरब राष्ट्रे यांतील जनतेची विवेचक खात्री पटली आहे हे होय.

त्या जनतेने दुसरे महायुद्ध पाहिले, दीर्घकाल अनुभवले, त्याचा धसका घेतला आणि तिसरे महायुद्ध टाळणारा जो कोणी असेल तो जगाचा उपकारकर्ता होय असे ते मानू लागले. भारताला दुसऱ्या महायुद्धाचा तडाखा फारसा जाणावला नाही. जे उपासमारीने मेले ते मरूनच गेले. पण जे जगले त्यांतील अनेकांचे नफे वाढले, त्याहून अधिकांना नोकऱ्या मिळाल्या आणि बहुसंख्य लोकांना युद्धकाळात खुमासदार बातम्या वाचावयास मिळाल्या. युद्धामुळे स्वातंत्र्यही जवळ आले व ते नंतर पदरीही पडले. पश्चिमी राष्ट्रांना अथवा रशियाला, अथवा अरब राष्ट्रांना युद्ध म्हटले की जो थरकाप होतो तो भारतियांना वरील कारणामुळे होत नाही. म्हणून नेहरूंनी तिसऱ्या महायुद्धाचा संभव अनेकदा टाळला असे कोणी सांगितले तर सामान्य जनतेला त्याचे महत्त्व वाटत नाही आणि नेहरूंचे विरोधक तर फिदीफिदी हसतात.

युद्ध टाळण्याइतकीच, किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्वाची अशी गोष्ट नेहरूंनी जागतिक राजकारणामध्ये जी केली ती आशिया व आफ्रिका या खंडांतील मागासलेल्या राष्ट्रांचे महत्त्व वाढविणे ही होय. पण त्याबाबतही भारतीय जनतेला जाणीव थोडीच आहे. स्वातंत्र्यलढा संपेपर्यंतही आपल्याला यूरोपची जेवढी माहिती होती तेवढी आशियाची माहिती नव्हती. मग गेल्या पंधरा वर्षांत आशिया व आफ्रिका यांची प्रतिष्ठा नेहरूंनी वाढविली असली तर त्याचे कौतुक आणि महत्त्व आम्हाला कसे वाटावे ? आणि आता तर आशियातले मोठ्यात मोठे असे जे लाल चीन हे राष्ट्र, त्याने भारतावरच आक्रमण केले असल्यामुळे आणि चिनची प्रतिष्ठा वाढविण्याला नेहरूच कारण झाले असे वरवर पहाता दिसत असल्यामुळे , नेहरूंनी आशियाची व त्यातल्यात्यात चीनची प्रतिष्ठा वाढविण्याच्या नादात आपण होऊन भारताची मान वाघाच्या दाढेत दिली नाही ना, अशी शंका काही जाणते म्हणविणारे लोकही उघडपणे विचारू लागले आहेत.

अशा परिस्थितीत नेहरूंची बाजू समजून सांगणे हे काम सोपे नाही. पण मला येथे एक गोष्ट सांगून टाकली पाहिजे. नेहरूंना निर्बुद्धपणे असलेला पाठिंबा हा निरुपयोगी आहे. त्यापेक्षा त्यांना झालेला विरोध हा अधिक बरा. पण ज्यांना नेहरूंना खरोखर पाठिंबा देण्याची इच्छा आहे, त्यांनी बुद्धीला समजून घेण्याला अतिशय अवघड अशी जी नेहरूंची चीनविषयक बाजू आहे, ती नीट समजून घेतली पाहिजे.

चीनने भारतावर केलेल्या आक्रमणासंबंधाने एक गोष्ट जी नेहमी सांगण्यात येते ती ही की, ' नेहरूंनी चीनला फाजील लाडावून ठेवले. चीनच्या कम्युनिझमने नेहरू हुरळून गेले. त्यांनी जगापुढे चीनची फाजील वकिली केली. चीन विश्वासघाताने पाठीत सुरी मारील असा इशारा दिला असताही नेहरूंनी ऐकले नाही. आणि आज भारताच्या पाठीत सुरी रुतवून चीन बसलेला

असताही त्या सुरीला नेहरू नेहमी लोणीच लावीत आहेत–' इत्यादी प्रकारचा हा आरोप आहे.

माझ्या मते हा आरोप अगदीच असमंजसपणाचा आहे. आपल्या देशात इतिहासाकडे सूक्ष्मपणे पाहण्याची आणि इतिहास हाताळण्याची शक्ती नेहरूंच्याहून इतर सर्वांच्या ठिकाणी एकदम फार कमी आहे एवढाच ' अपराध ' असून त्यामुळेच वरील आरोप केला जातो. मी गेल्या पंधरा वर्षांत नेहरूंच्या परराष्ट्रधोरणाचे जे अवलोकन करीत आलो आहे, त्यावरून चीनपासून भारताला व जगाला असणारी भीती निवारावी कशी या एकाच विचाराने नेहरूंनी आपली सर्व धोरणे चालवली आहेत, असे मी माझे मत नम्रपणे पण स्पष्टपणे सांगून ठेवतो. हे एवढेच वाक्य सिद्ध करण्यात हा छोटासा लेख खर्ची पडणार आहे.

चीन काय आहे याची नेहरूंना युद्धापूर्वीही जाणीव होती. चीनचा प्रचंड विस्तार, त्यातील कर्तबगार व प्रचंड लोकसंख्या, तेथे कम्युनिझमचे माजत असलेले चाळे यासंबंधाने नेहरूंना पूर्ण जाणीव असून डोळयात तेल घालून ते ही परिस्थिती पाहात होते. चीनपासून भारताला असलेला धोका नेहरूंनी कधीही दुर्लक्षिलेला नाही असे मायकेल ब्रीचर यानेही नमूद करून ठेवले आहे.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर चीनमध्ये कम्युनिझम् भराभर बळावत गेला व कम्युनिस्ट चीनसंबंधाने नेहरूंनी प्रेमदर्शनास सुरुवात केली ही गोष्ट निश्चित खरी आहे. असे करण्यात त्यांचा विशिष्ट हेतू होता. कम्युनिस्ट चीनला अंतर्गत पुनर्घटनेचे काम केवढेतरी मोठे होते. हजारो वर्षांच्या उध्वस्त परिस्थितीतून चिनी कम्युनिस्टांना पुनर्रचना करावयाची होती. कम्युनिस्टांची राजवट ही अतिशय कठोर व क्रूर असते हे नेहरू जाणून होते. पण ती रचनानिष्ठ असते हेही त्यांना माहीत होते. रशियातली कम्युनिस्ट राजवट कठोर, क्रूर व आक्रमणशील का झाली याचे कारण रशियन राज्यक्रांती झाली त्यावेळी जपान, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका वगैरे राष्ट्रांनी चोहो बाजूंनी रशियावर हल्ला करून तेथे यादवी भडकविली आणि आधीच हिंस्र असलेला वाघ शिकाऱ्यांनी कोंडल्यावर क्रूर व आक्रमणशील होतो त्याप्रमाणे रशियातील कम्युनिझम् यादवी आणि परचक्र यामुळे अंतर्गत दारिद्र्याची आग अधिकच भडकून क्रूर व आक्रमणशील झाला.

चीनमध्ये या इतिहासाची पुनरावृत्ती होऊ नये आणि चीनमधील कम्युनिझम् शक्य तितका सौम्य राहील असा प्रयत्न करावा हे नेहरूंच्या प्रेमदर्शनाचे उद्दिष्ट होते. स्वातंत्र्य प्राप्त होताच नेहरूंनी इंडोनेशियाच्या स्वातंत्र्यासाठी दिल्लीत आशियाई परिषद भरविली. तिने आशियात व आफ्रिकेत केवढी मोठी जागृती झाली. त्या परिषदेचा हेतूही आशियात कम्युनिझमला

वाव मिळण्यापूर्वी आशियातील राष्ट्रात स्वातंत्र्याची व स्वदेशाभिमानाची आच वाटावी हा होता.

आशिया खंडाचा नकाशा डोळ्यासमोर धरा. चीनमध्ये ६० कोटी लोकसंख्या आहे. ती मागासलेली असली तरी इतिहासकाळात अतिशय कार्यक्षमतेने व कष्टाने यशस्वी शेती करणारी ठरली आहे हे लक्षात घ्या. लोकसंख्येच्या मानाने प्रदेशविस्तार खूप असला तरी दरडोई शेतजमीन अतिशय कमी आहे हेही लक्षात घ्या. अशा चीनमध्ये आधीच क्रूर असणारा कम्युनिझम् निर्माण झाला, त्याला शत्रूंनी धाक घालून चिडविले अशी कल्पना करा. तर मग तो प्रचंड सैन्य उभारील, रशियाची त्याला मदत मिळेल आणि मग तो चीन आत्मरक्षणाच्या सबबीवर तिसरे महायुद्ध माजवून इंडो-चीन, ब्रह्मदेश, सयाम, मलाया, इंडोनेशिया वगैरे साऱ्या जगातील अतिशय धनसंपन्न मुलूख खाल्ल्याशिवाय राहणार नाही, ही भीती नेहरूंना भारत स्वतंत्र झाल्यापासून वाटत असली पाहिजे हे सामान्य वाचकाच्याही, नेहरूंची बुद्धिमत्ता त्याला ठाऊक असेल तर, लक्षात आले पाहिजे.

नेहरूंच्याच एखाद्या विधानाचा पुरावा मी येथे देऊ शकणार नाही. पण नेहरूंचे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळातले सर्व धोरण हा एकच अनर्थ टाळण्यासाठी आखले गेले आहे असे मी सांगू शकतो. आग विझवावयाची असली तर प्रथम ती पसरू नये यासाठी आग लागलेल्या घराच्या भोवतालची घरे प्रथम थोडी थोडी पाडून आगीच्या धगीपासून दूर करतात. त्याचबरोबर आगीवर पाणी शिंपतात. असे धोरण १९४९ च्या सप्टेंबर–आक्टोबरमध्ये अमेरिकेत नेहरूंनी केलेल्या भाषणावरून त्यांनी आखले असल्याचे दिसून येते.

अमेरिकेतील त्या वेळच्या बहुतेक भाषणांत अमेरिकेला एक गोष्ट त्यांनी पुन:पुन्हा सांगितली ती ही की, ' आशियात कोणताही उठाव झाला तर तो कम्युनिस्ट उठाव आहे असे समजून तो धोपटून काढण्याचा प्रयत्न करू नका ! ' त्या वेळची अमेरिकेची मन:स्थिती येथे ध्यानात ठेवली पाहिजे. चीनमध्ये चँग-कै-शेकचे सरकार स्थिर व्हावे यासाठी प्रयत्नांची शिकस्त करून आणि आपले काही चालणार नाही असे शेवटी ठरवून अमेरिकन मुत्सद्दी जॉर्ज मार्शल चीनमधून अमेरिकेत परत गेला. आणि त्यानंतर यांगत्से नदीला अथवा पीत नदीला अचानक महापूर येऊन हजारों मैलांचा प्रदेश त्या महापुराने व्यापून उध्वस्त करून टाकावा, त्याप्रमाणे चीनमध्ये कम्युनिझमचा महापूर उसळला व त्याने अवघा चीन व्यापून टाकला.

ही गोष्ट अमेरिकेला दिसली आणि चीनमधील कम्युनिझम्, जपान आणि आग्नेय आशिया खाऊन टाकून भारतासारखी राष्ट्रे तोंडी लावणार ही भीती त्या वेळी अमेरिकेला ग्रासू लागली होती. चालू शतकाच्या इतिहासात यूरोपपेक्षाही चीनबद्दल अमेरिकेने आपुलकी दाखविली असून आपल्या व्यापार-

विस्ताराचे क्षेत्र चीन, भारत व आग्नेय आशिया हे आहे, असे अमेरिका दुसऱ्या महायुद्धापूर्वीपासून मानत आली आहे, हे ज्यांच्या लक्षात आले असेल त्यांना दुसऱ्या महायुद्धानंतर चीनमध्ये कम्युनिझम् बळावलेला पाहून अमेरिकेत केवढी घबराट माजली असेल व चीनमधील कम्युनिझम दडपून टाकण्यासाठी अमेरिकेत केवढी ईर्षा उत्पन्न झाली असेल हे सहज लक्षात येईल.

अमेरिकेत अशी ईर्षा उत्पन्न झाल्यास चीनच्या निमित्ताने आशियात महायुद्ध भडकेल व नुकताच स्वतंत्र होऊन दुबळा असलेला भारत सबंधच उध्वस्त होईल ही भीती नेहरूंना वाटली. आणि अमेरिकेला शांत रहाण्याला, आशियातील उठावाबद्दल सहानुभूतिपूर्ण धोरण ठेवण्याचा प्रयत्न नेहरूंनी केला. अमेरिकेतील व्याख्यानात त्यांनी चीनचे स्पष्ट नाव घेतले नाही. पण आशियातील राष्ट्रे हा शब्द उच्चारताच चीनच त्यांच्या डोळ्यांपुढे आहे हे अमेरिकन लोकांना सहज समजले.

त्यानंतर १९५० च्या जानेवारीत सीलोनमध्ये कॉमनवेल्थ परिषद भरली असता लाल चीनला यूनोत घ्यावे अशी नेहरूंनी जाहीर मागणी केली. ही लाल चीनची फुकट वकिली आहे असा आरोप भारतात व साऱ्या जगभर अनेकांनी नेहरूंवर केला. नेहरू स्नेहभावानेच बोलत असल्यामुळे ही चीनची खुशामत ते करीत आहेत असा आरोप स्वाभाविकपणेच लोक करीत होते. आता गेल्या तीन वर्षांपासून अमेरिकेत अॅडलाय स्टीव्हन्सनसारखे मुत्सद्दी चीनला यूनोत घेणे भाग पडेल असे बोलू लागले आहेत. त्याचे कारण ते असे सांगतात की, 'आंतरराष्ट्रीय आगळीक करणाऱ्या राष्ट्राला आंतरराष्ट्रीय न्यायासनासमोर जाब विचारण्याची संधी, आंतरराष्ट्रीय लोकमत त्याच्या विरुद्ध करण्याची संधी यूनोमध्ये मिळते म्हणून यूनोत लाल चीनला घ्या.' ब्रिटनमध्ये व इतर अनेक देशांत आता या युक्तिवादासह ही मागणी केली जात आहे. यात शत्रुत्वाची भावना आहे ती नेहरूंना त्यावेळी दाखविणे योग्य वाटले नसेल. कारण त्यांचा दृष्टिकोण स्नेहभावाने होईल तितके साधण्याचा होता.

कोरियन युद्ध सुरू झाल्यानंतर '३८ अक्षांश ओलांडून पुढे जाऊ नका, चीनला यूनोत घ्या आणि चीनच्या मार्फत उत्तर कोरियावर दडपण आणून युद्ध आटोपते घ्या. कोरिया हे चीनचे वर्चस्वक्षेत्र राहणे भौगोलिक दृष्टीने अपरिहार्य आहे, म्हणून कोरियात चीनला भीतीदायक होईल असे वागू नका' असे नेहरू सांगत होते. यातही चीनने कोरियन युद्धात जर उडी टाकली आणि उलट अमेरिकेने जर अटीतटीचा सामना देण्याचे ठरविले, तर तिसरे महायुद्ध भडकून आग्नेय आशिया खलास होईल अशी भीती नेहरूंना त्या वेळी वाटली असली, तर ती खोटी नव्हती मॅक्ऑर्थरने नेहरूंचा सल्ला अमेरिकेला स्वीकारू दिला नाही, उत्तर कोरियात घुसून मांचुरियातील यालू नदीपर्यंत चढाई केली, लाल चीनचे सैन्य रणात आले, मॅकऑर्थर मागे हटला, पुन्हा

मांचुरियापर्यंत गेला आणि मग मांचुरियात ॲटमबॉम्ब टाका अशी मागणी जेव्हा अमेरिकेत मोठमोठ्याने होऊ लागली तेव्हा प्रथम इंग्लंड घाबरले. इंग्लंडचा त्यावेळचा पंतप्रधान क्लेमन्ट ॲटली अमेरिकेत जाऊन ट्रुमनच्या पाया पडला. ' कृपाकरून ॲटम बॉम्ब टाकून तिसरे जागतिक महायुद्ध माजवू नका 'अशी त्याने ट्रुमनला विनंती केली.

चीन लाल झाला होता तो विध्वंसातून लाल झाला होता. कोरियन युद्धात चिनी सैनिक इतक्या पिसाटपणे लढले की, तिसरे महायुद्ध होऊन जगभर भडकले तरी आणि चीनमधील कोटयवधी माणसे मेली तरी हे पिसाट कम्युनिस्ट माघार घेणार नाहीत अशी पश्चिमी मुत्सद्द्यांची खात्री झाली. आशियात युद्ध सुरू झाले असते तर रशियाने यूरोप एकच आठवडयात खाल्ला असता, हे त्या वेळी सर्व युरोपियांना स्पष्ट दिसत होते. हे सर्व लक्षात येण्याला नेहरूंच्यापेक्षा पश्चिमी मुत्सद्द्यांना सहा महिने अधिक वेळ लागला आणि आमच्याकडील नेहरूविरोधी मुत्सद्दीबुवांना अजूनही यातले काही कळले नाही, ही नेहरूंची चूक नव्हे.

उशिरा का होईना, इंग्लंड आणि अमेरिका यांना कोरियात आपल्या हातून होत असलेली चूक कळली आणि जगापुढे बढाई मारणाऱ्या अमेरिकेने खरोखरी माघार घेऊन कोरियन युद्ध थांबविले. चीनला तिसरे महायुद्ध करण्याची खुमखुम आहे असा आरोप आज रशियाही चीनवर करतो आहे. मग भयानक क्रांतीतून चवताळून यशस्वी झालेल्या लाल चीनला तिसऱ्या महायुद्धाची भीती वाटणार नाही असा कयास नेहरूंनी जर त्या वेळी बांधला असला आणि म्हणून तिसऱ्या महायुद्धाचा धोका टाळण्यासाठी, चवताळलेल्या वाघाचा उपशम होऊ द्या असे धोरण त्यांनी जगासमोर मांडले असले तर ती लाल चीनची खुशामत नव्हती, ते हुरळून गेल्याचे लक्षण नव्हते. इतिहासाच्या खोल अभ्यासातून, सद्य:परिस्थितीच्या सूक्ष्म अवलोकनातून स्वदेशाच्या व मानवजातीच्या, नजीकच्या व दूरच्या हितासाठी एका महान मुत्सद्द्याने दिलेला तो निर्णय होता.

इंडोचीन युद्धाची कथा बरोबर अशीच आहे. इंडोचीनमध्ये फ्रान्सचा अंमल होता. तेथे कम्युनिस्ट बंड झाले. हे बंड नेहरूंनी माजवले नव्हते, त्याला चिथावणीही नेहरूंनी दिली नव्हती ! आणि फ्रान्सचा कम्युनिस्ट बंडवाल्यांनी सपशेल पराभव चालवला होता. त्यालाही नेहरू कारण नव्हते. शेवटी डीन-बिन-फू येथे फ्रेंच सैन्याचा पराभव होऊन युद्धाचा निकाल लागला. फ्रान्सला त्यापुढे युद्ध चालवणे अशक्य झाले होते. अमेरिकेचा परराष्ट्रमंत्री डल्लेस हा अमेरिकेतर्फे हस्तक्षेप करून युद्ध पुढे चालवू पहात होता. अशा स्थितीत इंग्लंड आणि फ्रान्स या दोघांनीही अमेरिकेचे धोरण स्वीकारण्याचे नाकारले. कानडाने अमेरिकेला पाठिंबा देण्याच्याऐवजी ब्रिटन आणि फ्रान्स यांना

पाठिंबा दिला. त्याच सुमारास भरलेल्या कोलंबो परिषदेत कृष्ण मेननंनी तडजोडीचा मसुद तयार केला. आणि तो मसुदा जवळ जवळ जसाच्या तसा जिनीव्हास मंजूर होऊन इंडोचीनची उत्तर व्हिएटनाम व दक्षिण व्हिएटनाम अशी फाळणी झाली. आणि लाल चीन व अमेरिका यांमध्ये युद्ध सुरू होऊन सारे जग तिसऱ्या महायुद्धात खेचले जाण्याचे टळले.

आशियात जर युद्ध झाले नाही, चीनच्या कम्युनिझमची जर कोंडी झाली नाही तर चीनच्या कम्युनिझममधील क्रूरता कमी होऊन कम्युनिझमची रचनात्मक बाजू अधिक प्रभावी होईल. त्यामुळे जगात शांततेचे वातावरण निर्माण होईल. त्यामुळे शस्त्रकपातीची इच्छा बळावेल, पुढारलेल्या राष्ट्रांचे भांडवल मागासलेल्या राष्ट्रांना मिळेल, भारताला विकासाची संधी व सहाय्य मिळेल, अशी नेहरूंची इच्छा व अपेक्षा होती. नंतर सुचलेले हे विचार मी वकिली थाटाने मांडीत आहे असे नव्हे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी आणि युद्धकाळात नेहरूंनी आपली ही मते कमी-अधिक स्पष्ट शब्दांत मांडलेली आहेत. आणि वरील घटना घडत असताना नेहरूंच्या धोरणाचे असे स्पष्टीकरण त्यांच्याच विचारांच्या आधारे मी करीत आलो आहे.

आणखीही एक मुद्दा मला येथे स्पष्ट करावयाचा आहे. रशियाला तिसरे महायुद्ध—निदान दुसऱ्या महायुद्धाच्या नजीकच्या काळात—नको आहे. ( मग कदाचित् युद्धावाचून स्टॅलिनला आपण युरोप कम्युनिस्ट करू असे वाटले असेलही. ) अशी नेहरूंची तेव्हापासून अटकळ असावी. काश्मीर प्रश्नाबाबत नेहरूंवर ज्या काही टीका झाल्या त्यासंबंधाने काहीही न बोलता मी एवढेच सांगतो की, अँग्लो-अमेरिकनांचे वर्चस्वक्षेत्र काश्मीर झाल्यास आजच्या अॅटमबॉम्बच्या काळात चीन व रशिया या दोघांनाही त्यामुळे धोका येऊन तिसरे महायुद्ध भारताच्या सरहद्दीवर येईल ही भीती नेहरूंना वाटली. आणि त्यांनी काश्मीरचा महत्त्वाचा भाग भारतात ठेवण्याचा आग्रह धरला.

या बाबतीत अँग्लो-अमेरिकन्स आपल्या विरुद्ध जातील आणि रशिया मात्र कायमचाच व स्वहितासाठीच आपल्या बाजूस राहील, हेही नेहरूंनी हेरले असले पाहिजे, हे आज मागे वळून पहाता उघड दिसते. चीन आणि रशिया या दोन्ही ठिकाणी कम्युनिझम माजल्यास त्या दोन राष्ट्रांचे सख्य राहाणार नाही, हे मत त्यावेळी नेहरूंचे असेल वा नसेल, पण माझे तसे मत होते हे मी सांगून ठेवतो. त्याला सबळ पुरावा आहे. चीनमधील कम्युनिस्ट क्रांतीला विरोध करून चँग-कै-शेकच्या हाती चीनची सूत्रे ठेवण्याचा प्रयत्न स्टॅलिन त्यावेळी करीत होता हे माझ्यासारख्या तत्कालिन विद्यार्थ्याला दिसत होते.

आपला कम्युनिझम् आक्रमक आहे याची स्टॅलिनला जाणीव होती. आणि तसाच अपुरी शेती असलेला चीनचा कम्युनिझमही आक्रमणशील होणार हे स्टॅलिनने तर्किले होते. स्टॅलिनची लोकसंख्या वीस कोटी आणि मावत्से

शां. ४

तुंग-ची लोकसंख्या साठ कोटी हे स्टॅलिन विसरू शकत नव्हता. आणि मध्य आशियात व सैबेरियात चीनला रशियाची तीन हजाराहून अधिक मैल सरहद्द आहे आणि मध्य आशियातला व सैबेरियातला निर्जन पण विकासक्षम असा लक्षावधी चौरसमैल प्रदेश चिनी कम्युनिस्टांना आज ना उद्या आक्रमणाचा मोह घालणार आहे हे स्टॅलिन विसरू शकत नव्हता.

स्टॅलिनला वाटणारी ही भीती नेहरूंच्या लक्षात आली नसेल असे नाही. आणि स्टॅलिन मेला व क्रुश्चेव आला म्हणून ही परिस्थिती बदललेली नाही. शिवाय आज क्रुश्चेवच्या जनतेला बऱ्या प्रकारचे जे आर्थिक वैभव आले आहे त्याचा विध्वंस करणारे युद्ध नको आहे. म्हणून क्रुश्चेवला जमल्यास जागतिक शांती पाहिजे आहे. पश्चिमी राष्ट्रांशी—निदान मागासलेल्या राष्ट्रांशी तरी—क्रुश्चेवला स्नेहभाव हवा आहे. रशियातील जनता शांततेच्या वातावरणाची, लोकशाही हक्कांची मागणी करू लागली आहे.

पण रशिया असा शांततावादी व परराष्ट्रांशी स्नेह ठेवणारा झाल्यास, चीनच्या कम्युनिस्टांबद्दल त्याची आस्था कमी होऊन, चीनला बलाढ्य होण्यास रशियाची मदत कमी मिळेल, या भीतीने लाल चीनला ग्रासले असल्याने सहजीवनाच्या मुद्यावर लाल चीन आणि रशिया यांच्यामध्ये आज द्वंद्व माजले आहे.

चालू विषयाशी संबद्ध असे आणखी कितीतरी मुद्दे मी या लहानशा लेखात बसवू शकलो नाही. पण वरील संक्षिप्त विवेचन वाचकांनी समजून घेतले असता, जरूर तर अँग्लो-अमेरिकनांच्या विरुद्ध, जरूर तर चीनच्याही विरुद्ध वागण्याची पाळी आल्यास रशिया स्वार्थबुद्धीनेच भारताला सखा राहील अशी अटकळ नेहरूंनी बांधली व उलट स्वतःही नेहरूंनी रशियाला अनुकूल असा पक्षपातही दाखविला आहे, असे निदान मला प्रांजळपणे वाटते. नेहरू असे बोलून दाखवतील अशी अपेक्षा कोणी करू नये.

आता लडाखचा प्रश्न. त्याच्याशी संबद्ध असा आधीचा प्रश्न तिबेटचा. तिबेटमध्ये चीन गेला तेव्हा नेहरूंनी जाहीर विरोध का केला नाही हा एक त्रिकालाबाधित प्रश्न होऊन बसलेला आहे. जे खरे आहे, पण नेहरू बोलणार नाहीत, ते मी येथे सांगतो. स्वतंत्र काश्मीर आणि स्वतंत्र तिबेट या भूमिका स्वीकारल्या तर अँग्लो-अमेरिकनांचे अॅटम बॉम्बस्चे तळ या दोन्ही ठिकाणी दृढतेने संभवतात. त्यातून तिसरे महायुद्ध अपरिहार्यपणे संभवते. म्हणून जशी स्वतंत्र काश्मीरची भूमिका नेहरूंनी नेहमी अमान्य केली तशीच स्वतंत्र तिबेटचीही अमान्य केली असावी.

तिबेट स्वतंत्र रहायचा नाही तर तो चीनच्या अंमलातच जायचा, हे इतिहासच बोलून चुकला आहे. अर्थात त्यामुळे नेपाळ व आसपासचा प्रदेश यांना येणारा धोका नेहरूंनी हेरला होता. नेपाळच्या उत्तरेचा हिमालय प्रदेश

९५९३९

आमचा संरक्षक आहे, त्याचे आम्ही संरक्षण करणारच, असे नेहरुंचे वचन ब्रीचरने उद्धृत केले आहे.

तिबेटसंबंधाने मुख्य भूमिका ही अशी मांडल्यानंतर जागेच्या अभावी अधिक तपशीलात न शिरता मी लडाखकडे वळतो. लडाखचा विचार करताना सबंध भारत-चीन सरहद्दीच्या प्रश्नाचा विचार ते प्रश्न समजून घेणाऱ्यांनी केला पाहिजे. ही सरहद्द २५०० मैल लांब आहे. आणि सर्व ठिकाणी १०० मैल रुंद असा दुर्गम हिमालय भारताच्या बाजूस आहे. उत्तर प्रदेश आणि हिमालय प्रदेश येथे चीनची हद्द हिमालय ओलांडून आमच्याकडे आली आहे असे नकाशात दिसते. तर बाकी सर्वत्र हिमालयाच्या पलीकडेही आमची सरहद्द पुढे गेली आहे. चीनच्या बाजूला चार लक्ष चौरस मैलांचे तिबेटचे हे विस्तीर्ण पठार आहे. त्यावरून त्या बाजूच्या आमच्या सरहद्दीवर चीन सहज आक्रमण करू शकतो. उलट आम्हांला मात्र शंभर मैल अंतरात हिमालयातील दहा हजार फुटांपासून वीस हजार फुटांपर्यंत उंच असलेली पर्वतशिखरे, प्रचंड सरोवरे, नद्या, जंगले ओलांडून आमच्या प्रदेशाच्या रक्षणासाठी- जावे लागते. ते अशक्य असल्याने ३० हजार फुटांवरून विमानाने आम्हाला सैन्य व रसद न्यावी लागते.

लडाख हा असा प्रदेश आहे. तेथे माणूस रहात नाही. गवताची काडीही उगवत नाही. त्या प्रदेशातील हिमालयाची शिखरे मोडून आडवी घातली तरच रस्ता होऊ शकेल आणि हा रस्ता चांगला तयार झाल्यास त्यावेळपर्यंत आमची इतकी शक्ती खर्च होईल की, चीनचे रणगाडे त्या रस्त्याने आरामात श्रीनगरला येतील. श्रीनगरपासून चीनच्या लडाखपलीकडील हद्दीपर्यंत सलग रस्ता बांधणे बहुधा अशक्य आहे. आणि त्यात धोका आहे, असे माझे मत मी येथे मांडून ठेवतो.

चीनहून तिबेटला जायला लडाखमधील अक्षय चीनमधील रस्ता हा एकच रस्ता आहे. म्हणून तो चीनने व्यापला, हे लडाख प्रकरणाचे मूळ कारण. भारताने चीनच्या आग्नेय आशियातील महत्त्वाकांक्षेला कोरिया व इंडोचीन या दोनही ठिकाणी स्नेहभावाच्या देखाव्याने पायबंद घालून रशियाला सहजीवनाच्या धोरणाबाबतीत पाठबळ दिले याबद्दल चीनला आलेली चीड हे लडाख प्रकरण चीनने भडकविण्याचे चीनचे दुसरे कारण. गेल्या चार वर्षांत चीनची शेती खचली व फसली असून सारा कम्युनिझम संकटात आला आहे. अशावेळी युद्ध करून जुगार अथवा जोहार करता आल्यास पाहावा हे चीनच्या आजच्या मनोवृत्तीचे तिसरे कारण आहे.

उलट चीन लडाखमध्ये केवढेही आक्रमण करू शकला तरी ते आक्रमण निर्जन प्रदेशातच राहील. हिमालय ओलांडून तो भारताला धाक देऊ शकणार नाही. याचाच अर्थ लडाखमध्ये चीन दीर्घकाळ राहिला तरी भारताला धोका

नाही, म्हणून जागतिक परिस्थिती अनुकूल राहावी व आपलेही बळ वाढण्याला संधी मिळावी यासाठी नेहरू हे चीनच्या आक्रमणाचे स्वरूप सौम्य करतात, लोकमत भडकावण्याचे टाळतात आणि जगातील व रशियातील लोकमत हळुहळू अनुकूल करून घेऊन चीनला स्नेहभावाच्या सक्तीत आणणे आज ना उद्या शक्य होईल काय हे स्वाभिमान सांभाळून शोधत आहेत असे मला वाटते.

लडाखमधील लढत दीर्घकाल चालत राहणे अपरिहार्य आहे असे नेहरू का म्हणतात हे वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षात येईल. चीनबद्दलचे नेहरूंचे धोरण खुशामतीचे व बेसावधपणाचे आहे असे जे म्हणतात, त्यांना गेल्या पंधरा वर्षांतले काहीही कळले नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

बहुश्रुत : नोव्हेंबर १९६२

# जवाहरलाल नेहरू आणि त्यांची भूमिका

भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने औपचारिक रित्या चार गौरवपर शब्द लिहिण्यासाठी मी हा लेख लिहीत नाही. गेल्या वर्षी हिमालयावर लाल चीनचे आक्रमण झाल्यानंतर पं. नेहरुंच्या सर्व धोरणावर प्रखर अशी प्रतिकूल टीका सतत होत आली आहे. 'लोक-राज्याचे 'चे वाचक शहरापेक्षा खेड्यातच अधिक आहेत. पण ही नेहरूविरोधी टीका खेड्यापाड्यापर्यंतही पोचली आहे. त्या टीकेमुळे लोकांच्या नेहरूंवरील श्रद्धेला थोडा धक्काही बसलेला आहे. पण मला ही टीका चुकीची वाटलेली आहे. नेहरूंचे परराष्ट्रधोरण व अंतर्गत धोरण हे गेल्या पंधरा वर्षांत योग्य दिशेने चालत आले आहे अशी माझी खात्री झालेली असून चीनच्या हिमालया-वरीक आक्रमणानंतर माझे हे मत न बदलता अधिकच दृढ झाले आहे. नेहरूंच्या वयाला आता ७४ वर्षे पूर्ण झाली असली तरी त्यांची प्रकृती अजून चांगली असून भारताला त्यांचे नेतृत्व आणखी काही वर्षे हवे आहे. त्याच-बरोबर नेहरूंच्या या नेतृत्वावर लोकांची विवेचक श्रद्धाही असणे अवश्य आहे, तरच नेहरूंचे नेतृत्व राष्ट्रास फलदायी होईल, हे लक्षात घेऊन नेहरूंच्या परराष्ट्रधोरणाचे व अंतर्गतधोरणाचे विवेचक समर्थन मला करावयाचे आहे. त्यासाठी नेहरूंवर घेण्यात आलेल्या आक्षेपांना मला उत्तरे द्यायची आहेत. नेहरूविरोधी टीका या देशात झाली हे चूक झाले नाही. लोकशाहीत अशी टीका होणारच. लोकांनी नेहरूंवर जी श्रद्धा ठेवायची ती विवेचक श्रद्धा असली पाहिजे. म्हणून नेहरूंच्या भूमिकेचे विवेचक समर्थन मला येथे करा-वयाचे आहे.

कम्युनिस्ट चीन हा आक्रमणशील ठरेल व त्याचेपासून भारताला धोका आहे ही गोष्ट नेहरुंच्या लक्षात आली नाही काय? संभाव्य आक्रमणापासून स्वदेशाचे रक्षण करण्यासाठी राष्ट्र बलवान् करण्याचे सोडून आंतरराष्ट्रीय शांततेचा व जागतिक शस्त्रकपातीचा प्रचार नेहरूंनी का सुरू केला? कम्युनिझम व लोकशाही यांचे शत्रुत्व असून भारताने निर्धाराने लोकशाही पत्करली असता लोकशाहीप्रधान अशा मित्रराष्ट्रांची इतराजी पत्करूनही कम्युनिस्ट राष्ट्रांशी नेहरूंनी स्नेहच का चालू ठेवला? आणि हिमालयावर कम्युनिस्ट चीनचे आक्रमण झाल्यानंतर नेहरूंनी आपल्या धोरणात मूलग्राही असे फरक

का केले नाहीत ? हे व अशा स्वरूपाचे प्रश्न नेहरूविरोधी टीकाकारांनी उपस्थित केले आहेत. हे प्रश्न अलग अलग नव्हेत. नेहरूंच्या संपूर्ण धोरणाचे आकलन झाले म्हणजे त्यांची उत्तरे त्यात मिळतात.

कोणत्याही नाण्याला जशा दोन बाजू असतात व एक बाजू दुसऱ्या बाजूपासून जशी छेदून काढता येत नाही त्याप्रमाणे नेहरूंचे पराराष्ट्र धोरण व अंतर्गत धोरण ही वेगळी व सुटी नसून एकाच धोरणाच्या त्या दोन अविच्छेद्य बाजू आहेत. या धोरणाची आखणी नेहरूंनी सुरवातीपासून कशी केली हे येथे पहायचे आहे. लेनिन या कम्युनिस्ट पुढाऱ्याने कम्युनिझमच्या प्रसाराचा जो अनुक्रम लावला होता तो रशिया, चीन, जपान, भारत असा होता. भारत स्वतंत्र होण्याच्या सुमारास चीन हा कम्युनिस्ट होण्याच्या टप्प्यापर्यंत आला असून भारत स्वतंत्र झाल्यानंतर दोनच वर्षांत चीन कम्युनिस्ट झालाही. अर्थात जपान व भारत यांना कम्युनिझमच्या कक्षेत ओढण्याचा प्रयत्न कम्युनिस्ट राष्ट्रांकडून होणार हे त्या काळी उघड दिसू लागले. नेहरूंचा निर्धार भारतात कम्युनिस्ट अथवा फॅसिस्ट हुकुमशाही येऊ न देता भारतात लोकशाहीच टिकवावयाची व समाजवादाच्या मार्गाने भारतात आर्थिक व सांस्कृतिक प्रगती घडवून आणावयाची हा होता. भारत स्वतंत्र होताना दरिद्री अवस्थेत होता. पाचशे स्वतंत्र संस्थाने भारतात कशीबशी सामील होत होती. हैदराबाद व काश्मीर या संस्थानांचे प्रश्न अवघड झाले होते. फाळणीकाळच्या दंगलींनी अस्वस्थता फारच माजली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोनच महिन्यांत काश्मीरवर पाकिस्तानची स्वारी झाली व तिला भारताचे मित्र म्हणविणाऱ्या अँग्लो-अमेरिकनांची फूस असावी असा संशय येत होता. संरक्षणाच्या दृष्टीने भारताची शक्ती त्या वेळी फार थोडी होती. काश्मीरसाठी भारताने पाकिस्तानशी लढत रहावयाचे म्हटले असते व अमेरिकेला ते पसंत न पडून अमेरिकेने भारताचे पेट्रोल तोडले असते, तरी तेवढ्याने भारत-पाकिस्तान युद्धात भारताची परिस्थिती अवघड झाली असती. म्हणून नेहरूंनी पाकिस्तानच्या काश्मीरमधील हालचालींची तक्रार यूनोपुढे मांडून पाकिस्तानबरोबरचे भारताचे काश्मीरमधील युद्ध थांबवून घेतले. तसेच त्याच सुमारास नेहरूंनी चीनचा प्रश्नही हाती घेतला.

लाल चीनशी वागताना भारताने काही ठळक गोष्टी ध्यानात घेणे जरुरीचे होते. भारत-चीन सरहद्द पंचवीसशे मैल लांब असून या सर्व सरहद्दीवर दुर्गम अशा हिमालयापलीकडे लडाखसारखे भारताचे विस्तीर्ण प्रदेश आहेत. आम्ही तेथे पोचणे अवघड पण चीनला तेथे पोचणे अगदी सोपे अशी भारत-चीन सरहद्दीची परिस्थिती आहे. भारत-चीन सरहद्दीवरील लडाख, नेपाळ, सिक्कीम, भूतान, नेफा, तसेच ब्रह्मदेश, सयाम, मलाया इत्यादी आग्नेय आशियातील प्रदेश, पामीर, मंगोलिया, पूर्व सैबेरिया वगैरे रशियाचे अथवा

चीन-रशिया सरहद्दीवरचे प्रदेश हे सर्व चीनचे असून ते चीनने जिंकले पाहिजेत ही भूमिका चिनी कम्युनिस्ट व चिनी राष्ट्रवादी या दोघांचीही असल्याचे चीनच्या कम्युनिस्ट क्रांतीपूर्वीच जगाला कळलेले होते. चीनची लोकसंख्या चीन कम्युनिस्ट झाला तेव्हाच साठ कोटीहून अधिक असून तेथील जनतेला युद्धाचा अनुभव दीर्घकालीन होता. अशा चीनशी युद्ध करण्याचा प्रसंग यायचाच असला तर तो जितका उशीरा येईल तेवढा उशीरावर ढकलून दरम्यानचा काळ आर्थिक, सांस्कृतिक व संरक्षणविषयक सामर्थ्य वाढविण्यात घालवावा व लोकशाही मजबूत करावी अशी आपल्या धोरणाची रचना नेहरूंनी केली. युद्ध लांबणीवर टाकण्याच्या प्रयत्नाला, शक्य तर ते कायमचे टाळण्याच्या प्रयत्नाला एक विशेष अनुकूलता त्यावेळी उद्‌भवली होती. दुसरे महायुद्ध फार भयंकर झाले आणि युरोपियन, रशियन आणि अमेरिकन जनता इतकी तीव्रपणे युद्धविरोधी झाली होती की युद्ध अनुभवलेली व पाहिलेली पिढी युद्ध टाळण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला पाठिंबा देण्याला उत्सुक होती. शिवाय अमेरिकेला अ‍ॅटम बाँब साधला असून रशियालाही तो लवकरच साधेल हे उघड दिसत होते. आणि यापुढे कोणतेही लहान युद्ध हे जागतिक युद्ध होणार, ते अ‍ॅटॉमिक युद्ध होणार, त्याने दोन्ही बाजूंचा अपार विध्वंस होणार आणि विजेता व पराभूत असे वर्ग युद्धाने तर शिल्लक न रहाता सारेच सुधारलेले जग उध्वस्त होणार, युद्धाने कोणतेच प्रश्न सुटणार नाहीत हे जगाला दिसत होते. उलट मोठ्या राष्ट्रांचे शस्त्रास्त्रांचे खर्च कमी होतील तर मोठ्या राष्ट्रांची संपत्ती मागासलेल्या राष्ट्रांना त्यांच्या प्रगतीसाठी मिळेल ही शक्यता जगातल्या मोठमोठ्या मुत्सद्द्यांना मान्य झाली होती. म्हणून नेहरूंनी आंतरराष्ट्रीय शांततावादाचा प्रचार सुरू केला.

भारत सरकारने १९५० साली नियोजिन समिती स्थापन केली व पहिल्या पंचवार्षिक योजनेचा पाया घातला. नजीकच्या काळात युद्ध येता कामा नये पण दूरच्या काळी युद्ध झाले तरी तोवर आर्थिक, सांस्कृतिक व संरक्षणविषयक संघटना भक्कम पायावर उभारली गेली पाहिजे, अशा हेतुभूमिकेवर नियोजन समितीने आखलेल्या पंचवार्षिक योजनांची उभारणी करण्यात आली आहे. एका टोकाला शेती व लहान धंद्यांचा विकास, सडका, रेल्वे व वाहतुकीच्या साधनांचा विकास, शिक्षण, आरोग्य यांचा विकास अशा योजना आहेत तर दुसऱ्या टोकाला विविध उपभोग्य मालाचे लहानमोठे कारखाने, कारखान्यांची यंत्रे उत्पन्न करणारे कारखाने, शस्त्रास्त्र निर्मिणारे कारखाने स्थापण्याच्या योजना आहेत. संरक्षणबळ वाढविण्याच्या योजनाही संरक्षणखात्याने आरंभापासून हाती घेतलेल्या आहेत. मोठमोठ्या सिंचनयोजनाही पार पडल्या आहेत. देश मूळचा मागासलेला, विस्कळित आणि अनेक ऐतिहासिक दोषांनी युक्त असा असून त्याचा विकास लोकशाही मार्गाने करावा


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ८७३८८ दि. /

लागतो. यामुळे थोडीफार दिरंगाई होते, चुका होतात. पण गेल्या पंधरा वर्षांत शांतता टिकवून भारताला प्रगती करता आली व कम्युनिस्ट राष्ट्रे आणि लोकशाहीवादी राष्ट्रे या दोघांकडूनही भारताला मदत मिळू शकली आहे. हे सर्व, परराष्ट्रांशी स्नेह ठेवण्याच्या नेहरूंच्या धोरणामुळेच शक्य झाले. जगातील बड्या राष्ट्रांत कम्युनिस्ट राष्ट्रे व लोकशाही राष्ट्रे असे तट गेल्या बारा वर्षांत पडलेले असून त्या दोघांत शस्त्रास्त्रस्पर्धा चालत आली आहे. यांपैकी कोणत्याही गटात सामील न होता भारताने अलिप्त म्हणजे स्वतंत्र रहाण्याचे धोरण पत्करले. "यामुळे भारत अरक्षित राहिला व चीनचे आक्रमण झाले." अशी टीका, नेहरूंच्या कोणत्याही गटापासून स्वतंत्र म्हणजे अलिप्त रहाण्याच्या धोरणावर केली जात आहे.

पण थोडा दूरवर विचार केला तर ही टीका चुकीची असल्याचे कळून येते. भारत हा देश मागासलेला असला तरी आशियातल्या राष्ट्रांत बराच पुढारलेला आहे व त्याची प्रचंड लोकसंख्या आणि त्याचे आशियाच्या नकाशातील स्थान यामुळे भारताला एवढे महत्त्व आले आहे की, भारत जर अँग्लो-अमेरिकन अथवा कम्युनिस्ट राष्ट्रे यापैकी कोणत्याही एका गटात गेला असता तर त्या गटाचे पारडे भावी कालात फार जड होईल या भीतीने दुसऱ्या गटाने युद्ध केले असते अथवा युद्धाचे वातावरण भडकविले असते व भारताच्या सर्वांगीण विकासासाठी जी आंतरराष्ट्रीय शांतता हवी आहे ती भारताला टिकविता आली नसती. शिवाय भारताने कोणत्या गटात सामील व्हावे ? भारतात लोकशाही टिकवावयाची असल्याने तो कम्युनिस्ट राष्ट्रांच्या गटात सामील होणे शक्य नव्हते. तो अँग्लो-अमेरिकन गटात सामील झाला असता तर गेल्या चौदा वर्षांचा इतिहास सांगतो की, पाकिस्तानला भारताने काश्मीर दिले पाहिजे असा अँग्लो-अमेरिकनांचा हट्ट असून काश्मीर देऊन टाकल्या-वाचून भारताला अँग्लो-अमेरिकन गटात सामील होता आलेच नसते. पण भारत अॅंग्लो-अमेरिकनांच्या गटात सामील झाला असता व काश्मीर पाकि-स्तानला गेले असते तर त्याचा परिणाम काय झाला असता ? अमेरिकेचा नाटोपेक्षाही अधिक सामर्थ्यशाली असा तळ काश्मीरात उभारला जाऊन रशिया व चीन या दोघांनाही त्यामुळे युद्धाचा धाक उत्पन्न झाला असता व आशियात प्रत्यक्ष युद्ध नव्हे तरी युद्धाचे वातावरण तापत राहून भारताला आपल्या विकासासाठी शांततेचे वातावरण हवे होते ते मिळाले नसते. भारतावर १९६२ च्या ऑक्टोबरमध्ये चीनने अचानक आक्रमण केले हे फार मोठे संकट खरेच. पण भारत अँग्लो-अमेरिकन गटात सामील झाला असता तर काश्मीर गमावून शिवाय युद्ध अथवा युद्धाचे वातावरण अधिक लवकर आले असते व त्यामुळे भारताला थोडचाही विकासाला आजवर मिळाली ती संधी मिळाली नसती.

भारत दोन्ही गटांपासून अलिप्त राहिला त्याचे फायदे भारताला व जगाला केवढे मोठे झाले हे भारतीयांनी समजून घेतले पाहिजे. आशियात युद्धाचे वातावरण वाढावे असा चीनचा सतत प्रयत्न असून कोरिया, इंडोचीन व लाओस या तिन्ही प्रकरणी चीनच्या महत्त्वाकांक्षेमुळेच आशियात युद्ध पेटण्याचा धोका उद्‌भवला होता. युद्ध पेटले असते तर रशिया चीनला मिळणे हे अपरिहार्यच होते. त्यामुळे आशियात विध्वंस, कम्युनिझम, फॅसिझम, लष्करी हुकुमशाही यापैकी एक अथवा अनेक प्रकार आले असते व भारत हे फार मोठे व आशियात विशेष सुधारलेले राष्ट्र असल्याने त्याचा सांस्कृतिक व भौतिक विध्वंसही फार झाला असता. पण चीनला युद्धाचा धोका हवा असला तरी रशियाला युद्ध अथवा युद्धाचा धोकाही नको आहे हे नेहरूंना माहीत होते. इतकेच नव्हे तर युद्ध अथवा युद्धाचा धोका उद्‌भवल्यास आग्नेय आशियाचा विस्तीर्ण व संपन्न मुलुख चीनच्या घशात जाऊन लाल चीन शेवटी रशियालाही भारी होईल ही भीती रशियाला वाटत असल्याचे नेहरूंनी ताडले व चीनच्या आक्रमक वृत्तीला पायबंद घालून युद्ध टाळण्याच्या प्रयत्नात रशियाला सामील करण्याचे नेहरूंनी योजले. कोरिया, इंडोचीन व लाओस तिन्ही प्रकरणी चीनने जागतिक युद्धाचा धाक उत्पन्न केला असता नेहरूंनी स्वतः पुढाकार घेऊन एका बाजूने अँग्लो-फ्रेंच-अमेरिकनांना तहाच्या टेबलापाशी आणले, त्याप्रमाणे दुसऱ्या बाजूने रशियालाही तहाच्या टेबलापाशी आणले. त्यामुळे चीनच्या आक्रमक वृत्तीस पायबंद बसला. चीनचा नेहरूंवर राग असण्याचे व रशियाशी चीनचे भांडण माजण्याचे एक महत्त्वाचे कारण कोरिया, इंडोचीन व लाओस या प्रकरणी रशिया व नेहरू यांनी पश्चिमी राष्ट्रांशी सहकार्य करून चीनला पायबंद घातला हे आहे. या साऱ्या काळात जगात शांतता नांदली व शांततेचा भारताला आपला विकास साधण्याचे कामी फायदा मिळाला. भारत अँग्लो-अमेरिकनांच्या गटात गेला असता तर रशिया-चीन एकजूट वाढून युद्ध अथवा युद्धाचे वातावरण भडकणे अपरिहार्य झाले असते. उलट भारत अलिप्त राहिल्यामुळे त्याला रशियाची मैत्री करता आली व चीनला पायबंद घालून युद्ध टाळण्यासाठी रशिया व पश्चिमी राष्ट्रे या दोघांचे साहाय्य भारत मिळवू शकला.

रशियाला युद्ध नको आहे व चीनचे आशियात आक्रमण होणे हेही रशियाला नको आहे. म्हणून आशियात युद्ध टाळण्यासाठी व चीनला आवरण्यासाठी रशियाचा आपणास उपयोग होईल हे नेहरूंनी फार पूर्वी ताडले व तसा रशियाचा उपयोग त्यांनी वर सांगितल्याप्रमाणे प्रत्यक्ष करून घेतला. ही नेहरूंच्या इतिहासविषयक सूक्ष्म बुद्धिमत्तेची व दूरदर्शी मुत्सद्देगिरीची फार मोठी कामगिरी होय. नेहरूंच्या प्रतिकूल टीकाकारांना हे कळत नाही हे त्यांचेच बौद्धिक दारिद्र्य म्हटले पाहिजे. नेहरूंच्या मुत्सद्देगिरीमुळे जगाला

व भारताला जो शांतताकाळ लाभला त्याचा भारताला लोकशाही मार्गाने विकास करण्यासाठी उपयोग करून घेता आला. हिमालयावर चीनचा पराभव करण्याइतकी शक्ती भारताला वाढविता आली नाही हे खरेच. पण चीनची भारतावर मोठी स्वारी या वेळी अथवा नजीकच्या काळात होण्याचा संभव कोणास दिसला नव्हता. "चीनबद्दल आम्ही इशारा दिला होता." असे नेहरूंचे टीकाकार म्हणतात. पण स्वत. नेहरूंनी चीनच्या आक्रमणाचा संभव लक्षात घेऊन कोरिया, इंडोचीन व लाओस या प्रकरणी चीनला आवरण्यासाठी पश्चिमी राष्ट्रांचे व रशियाचेही साहाय्य मिळविले यावरून चीनबद्दल नेहरू बेदखल होते हे म्हणणे चूक ठरते. लडाखवर चीनचे आक्रमण १९५८ पासून चालू होते. त्यापासून भारताच्या अंतर्भागास धोका नव्हता. लडाखमध्ये लढण्याला चीनला अनुकूल व भारताला प्रतिकूल परिस्थिती होती. अशा स्थितीत लडाखवरील चीनच्या आक्रमणापासून परिणामी रशियालाही धोका येईल, रशिया मध्यस्थी करून अथवा चीनवर दडपण आणून लडाखबाबत काही समेट घडवील, व भारताच्या अंतर्भागास धोका येईल असे आक्रमण रशिया चीनला करू देणार नाही अशी नेहरूंची अपेक्षा होती. म्हणून चीनच्या स्वारीचा संभव त्यांना नजीक वाटला नाही. पण चीनची नेफाच्या पहाडी प्रदेशावर आसामच्या दिशेने जी स्वारी झाली तिला एका आकस्मिक घटनेने वाव मिळाला. अमेरिकेजवळच्या क्यूबा-बेटाबाबत रशिया व अमेरिका यांचे ॲटॉमिक युद्ध होण्याचा संभव ऑक्टोबर १९६२ च्या दुसऱ्या पंधरवडचात उत्पन्न झाला. तेव्हा रशिया व पश्चिमी राष्ट्रे युद्धाच्या तणातणीत गुंतली असता अथवा ॲटम बाँबनी भस्मसात होत असता, भारतावर स्वारी केली तर आपल्या आड कोणी येणार नाही हे पाहून चीनने नेफावर ता. २० ऑक्टोबर १९६२ रोजी चढाई करण्याचे धाडस केले असा माझा तर्क आहे.

वरील तर्क १९६२ च्या नोव्हेंबरच्या ५ तारखेस मी जाहीरपणे मांडला आहे. त्याला त्यानंतरच्या जे. जे. सिंगसारख्या विद्वानांनी पुष्टी दिली असून आता हा तर्क अनेक मोठ्या पत्रकारांनी मान्य केला आहे. म्हणून चीनचा हल्ला नेहरूंना अपेक्षित नव्हता ही त्यांची चूक नव्हती असे सिद्ध होते. चीनच्या शक्तीचा भारत सरकारला अदमास लागला नाही हे खरे आहे. पण युद्ध आणि आक्रमण यांसाठी हुकूमशाही मार्गाने बारा वर्षे सतत तयारी करीत असलेल्या, युद्धाच्या दीर्घकालीन भावनेत आणि परंपरेत वाढलेल्या चीनच्या आकस्मिक हल्ल्यास समर्थपणे तोंड देण्याइतकी परिपूर्ण तयारी सर्व सरहद्दीवर सतत सज्ज ठेवणे हे भारताला शक्य नव्हते. नाझी जर्मनीच्या हल्ल्यामुळे जर्मनीच्या चौपट लोकसंख्या असणाऱ्या अनेक बडचा राष्ट्रांच्या फौजांना तीन वर्षे माघार खावी लागली व चीनशी रणांगणात लढून निभाव लागणार नाही म्हणूनच अमेरिकेने कोरियातून पाय मागे घेतला. या गोष्टी

नेहरूंची कुचेष्टा व निंदा करणाऱ्यांनी विचारात घ्याव्यात. अखेर ज्याप्रमाणे जर्मनीला अनेक बड्या राष्ट्रांनी एकजूट होऊन ठोकून काढले त्याप्रमाणे चीनशीही युद्ध अपरिहार्य झाल्यास एकट्या भारताने नव्हे तर अनेक बड्या राष्ट्रांनी एकजूट होऊनच चीनला ठोकून काढावे लागेल. पण आता चीनशी युद्धप्रसंग टाळावा असे अँग्लो-अमेरिकनांनाही वाटत असून चीनला आवरण्यासाठी नेहरूंना रशियाचे साहाय्य घेण्याला अमेरिका उत्तेजन देत आहे. चीनचे भारतावर आक्रमण झाल्यानंतर रशियाने क्यूबातून माघार घेऊन तिकडचे ॲटॉमिक युद्ध टाळले व भारताला अँग्लो-अमेरिकनांची शस्त्रे मोठ्या संख्येने आली आणि पुन्हा तिसऱ्या महायुद्धाचा संभव उत्पन्न झाला, तेव्हा रशियाने चीनला भारतावरील आक्रमणापासून मागे खेचले. यावरून चीनला आवरण्यासाठी रशियावर विसंबण्याचे व भारताच्या विकासासाठी शांततेची संधी वापरण्याचे धोरण पराभूत न होता तेच धोरण शहाणपणाचे ठरले आहे असे मला वाटते. भारतावरील चीनच्या आक्रमणाबाबत आता रशियान संपूर्ण नापसंती दाखविली असून या भांडणात भारताची बाजू न्याय्य आहे अशी कबुली दिली आहे व भारताच्या लोकशाहीला धक्का न लावता भारताला विविध प्रकारचे साहाय्य देण्याचे रशियाने मान्य केले.

हे परराष्ट्रधोरण व अंतर्गत धोरण अंमलात आणताना जगापुढे व भारतापुढे नेहरूंचे जे व्यक्तित्व नांदले आहे व त्यांच्या नेतृत्वाचा जो प्रकार दिसून आला, त्यातील धीरोदात्तता ही जगाच्या आधुनिक इतिहासात काहीशी अद्वितीय आहे. भारतात त्यांच्या दूरदर्शित्वाचे आकलन फार थोड्यांना झाले असून अत्यंत कटू शब्दात प्रखर टीका नेहरूंवर होत आहे. पाकिस्तानातून शिव्या व सशस्त्र हल्ले सतत चालू असता अमेरिका त्याकडे दुर्लक्ष करून नेहरूंनीच पाकिस्तानचे समाधान करावे असा तगादा भारतामागे लावीत आहे. आयूबखान व चाउ एन् लाय या दोघांच्याही मते आजच्या तणातणीला नेहरू हे एकटे कारण आहेत. पण या सर्व हल्ल्यापुढे, निंदेपुढे, नेहरू मौन पाळून निर्धाराचे पण संयमाचे धोरण पाळतात. आक्रमक राष्ट्रांतील जनतेचा द्वेष करू नका असे स्वकीयांना सांगण्याचे मनोधैर्य नेहरूत आहे ते नेहरूंच्या परिस्थितीत आजच्या जगातल्या कोणत्याही मुत्सद्द्याला दाखविता आले नव्हते. प्रचंड संकटांचे प्रसंगी टीकेचे कठोर घाव सोसून त्यांनी स्वतःचे धैर्य राखले व राष्ट्राला धीर दिला. नेहरूंची धोरणे आक्रमणाच्या वेळी चुकीची वाटणाऱ्यांना नेहरूंची धोरणे शहाणपणाची आहेत असा पुढे प्रत्यय आला. पण टीकाकारांत होणारा बदल पाहून नेहरूंना गर्व झालेला नाही. आपल्या धोरणाचे ते फार क्वचित समर्थन करतात. ज्याने त्याने विचाराने व अवलोकनाने त्यांचे धोरण समजून घ्यावे अशी नेहरूंची अपेक्षा असते. व तेच मी वर केले आहे. मी काही नेहरूंचा अंधभक्त नाही. पण त्यांनी आजवर

केलेले लिखाण, त्यांची वेळोवेळी होणारी भाषणे यांचा अभ्यास करून त्यांच्या धोरणाचे हेतू व परिणाम यांविषयी चिंतन करीत राहिले तर त्यांतील दूरदर्शित्व, त्यांतील धीरोदात्तता व भारतीय जनतेबद्दलच नव्हे तर अखिल मानवजातीबद्दल त्यांना वाटणारी कळकळ, या गोष्टी जसजशा ध्यानात येतात तसतसा मनाला आल्हाद होत जातो. त्यांचे काही दोष जमेस धरूनसुद्धा जवाहरलाल नेहरू हे आजच्या जगातले पहिल्या रांगेतले थोर सत्पुरुष आहेत अशी माझी खात्री झाली आहे.

ज्या आमच्यासारख्यांच्या डोळ्यांपुढे त्यांचे हे सारे चरित्र घडले व ज्या आम्हांला ते गुणग्रहणाचा आनंद अनुभवीत पहाता आले ते आम्ही भाग्यवान आहोत. नेहरूंची अजून काही काळ या राष्ट्राला व जगाला गरज आहे. ईश्वर त्यांना दीर्घायुरारोग्य देवो.

लोकराज्य : नोव्हेंबर १९६३

# भारत-चीन युद्ध नेहरूंचे नेतृत्व

नेहरूंचे नेतृत्व भारताला हल्ली फार अपुरे पडत आहे हे सर्वसामान्यपणे मी प्रथमच मान्य करतो; पण ते तसे भारत-चीन युद्धामुळे दिसून आले आहे असे नव्हे. अंतर्गत आर्थिक नियोजन नेहरूंना यशस्वी करता येत नाही, यामुळे नेहरूंचे नेतृत्व अपुरे पडत आहे असे माझे म्हणणे आहे. भारत-चीन युद्धात नेहरूंच्या सैन्याला हिमालयातून खूप मार खाऊन माघार घ्यावी लागली. यावरून नेहरूंचे नेतृत्व अपुरे पडले आहे असे मला मुळीच वाटत नाही. ही सैन्याची माघार ही भारताची शक्ती कमी पडल्याचे फळ आहे, पण भारताचे परराष्ट्रधोरण काही वेगळ्या प्रकारे गेल्या पंधरा वर्षांत आखले गेले असते तर आज आपली शक्ती चीनच्या आक्रमणापुढे पुरी पडली असती असे मानण्याला काहीही आधार नाही.

नेहरूंच्या परराष्ट्र-धोरणातच नव्हे, तर त्यांच्या एकंदर नेतृत्वात जो ठळक दोष मला दिसतो तो येथे प्रथम सांगतो. हुकूमशहा नसूनही जो पुढारी चाळीस कोटी जनतेच्या राष्ट्राचे धोरण एकटयाच्या मताने चालवतो असा नेहरूंच्यासारखा पुढारी जगात दुसरा नाहीच. मागासलेल्या देशात एकाच बुद्धिमान् माणसाने साऱ्या राष्ट्राचे धोरण आखणे अपरिहार्य असेल हे मी समजू शकतो. पण अशा पुढाऱ्याने त्या धोरणाबाबत अनेक सहकाऱ्यांना इतके विश्वासात घेऊन त्यांना आपले धोरण इतके चांगले समजून दिले पाहिजे की, त्यांपैकी कोणीही लेखनात अथवा भाषणात त्या धोरणाचे सयुक्तिक विवरण करू शकेल आणि प्रसंगविशेषी नेहरू ठिकाणावर नसताना त्या धोरणाची अंमलबजावणी करू शकेल. पण नेहरूंच्या परराष्ट्र-धोरणासंबंधाने बोलायचे तर एकाही सहकाऱ्याला नेहरूंचे धोरण कधी कोणाला समजून देता आले नाही अथवा कोणाला स्वतःला समजलेही नाही.

नेहरूंच्या नेतृत्वातला आणखी एक दोष म्हणजे ज्या जनतेचे ते नेतृत्व करतात तिला अमुक उद्दिष्टासाठी अमुक कर्तव्य असे ते काहीही सांगत नाहीत. यामुळे काँग्रेसचे नेतृत्व हे निर्बुद्ध व निष्क्रिय झाले असून सत्तालोलुपांच्या हाती गेले आहे व नेहरूंना याबद्दल काहीही वाटत नसल्याने नेहरूंच्या हाती काँग्रेसचे व राष्ट्राचे नेतृत्व असेपर्यंत ही परिस्थिती बदलणे कठीण आहे. आर्थिक नियोजनाच्या बाबतीत नेहरूंना जे अपयश आले आहे त्याचे कारण

जनतेला ते प्रत्यक्ष कर्तृत्वाबाबत काही मार्गदर्शन करू शकले नाहीत हेच होय. या परिस्थितीपोटी महान संकट आहे. कोणी यासाठी नेहरूंना आज पदच्युत करून त्यांची जागा घेईल तर फार मोठी पोकळी निर्माण होईल आणि मग लोकांना काय गमावले हे लक्षात येऊन ती उणीव भरून काढण्यासाठी लोक कार्यप्रवण होतील. किंवा नेहरूंचे नेतृत्व उखडून न काढता त्यांच्यातील उणीवा भरून काढणारा कोणी तरुण पुढारी पुढे येईल तर दुधात साखर पडेल. पण असा पुढारी नुसता मुत्सद्देगिरीत निपुण असून भागणार नाही. इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व आधिभौतिक तत्त्वज्ञान यांचा व्यासंग त्याने दीर्घकाळ केला असला पाहिजे. नेहरूंची थोरवी त्यांच्या मुत्सद्देगिरीतील नैपुण्यातच केवळ नाही तर त्यांच्या विद्वत्तेत आहे. या साऱ्या मुद्द्यांवर येथे मी अधिक लिहित नाही. नेहरूंच्या नेतृत्वात अपुरेपणा नेमका कोणता आहे हे दाखविण्यापुरते हे मुद्दे मांडले. आज नेहरूंच्या जागी दुसरा कोणी यावा अथवा येईल असे मला वाटत नाही. पण त्यांच्या हाताखाली राहून त्यांच्या उणीवा भरून काढील असा पुरुष गेल्या पंधरा वर्षांत झाला नाही इतकी ही भारतभू नापीक झाली काय?

नेहरूंच्या नेतृत्वातला हा अपुरेपणा दाखविताना मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, त्यांचे नेतृत्व आज भारताला अपुरे पडत असले तरी जगातल्या कोणत्याही राष्ट्रातला एकटा एक पुढारी नेहरूंच्या एवढा बुद्धिमान, विद्वान व दूरदर्शी नाही. आज जे मोठे पुढारी बड्या राष्ट्रांतही आहेत त्यांचे नेतृत्व सामुदायिक आहे. या सर्व बड्या राष्ट्रांतल्या पुढाऱ्यांना अनुभवही नेहरूंपेक्षा अधिक आहे. पण राज्यसत्ता हाती आल्या दिवसापासून विशिष्ट सिद्धान्त दीर्घकालासाठी आखून सुसंगतपणे जगड्व्याळ राजकारणे नेहरूंनी जेवढ्या चतुराईने आखली, तेवढ्या चतुराईने दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांच्या पुढाऱ्याला आखता आलेली नाहीत, किंबहुना नेहरूंच्या परराष्ट्रधोरणावर आज जे संकट आले आहे अथवा त्या संकटाला जे विशिष्ट स्वरूप आले आहे त्याचे कारण नेहरूंच्या वाट्याला गेल्या पंधरा वर्षांत मुत्सद्देगिरीतील नैपुण्याची जी कीर्ती आली, तिजबद्दल बड्या राष्ट्रांतील व लहान राष्ट्रांतीलही मुत्सद्द्याना व पत्रकारांना दुर्दम्य मत्सर वाटू लागला हे आहे. घरांच्या, दारांच्या तयार चौकटी विकणाऱ्या दुकानातून एका उंच माणसाने एक चौकट घेतली, पण ती त्याच्या उंचीच्या मानाने ठेंगणी असल्याचे आढळून आल्यावरून 'चौकट उंच करून देता का ?' असे तो गृहस्थ दुकानदाराला विचारू लागला. तेव्हा दुकानदार म्हणतो, "आजच्या प्रमाणबध्द वस्तूंच्या जगात माणसाच्या उंचीप्रमाणे चौकटीची उंची कमी अधिक होणार नाही, चौकटीच्या उंचीच्या मापात माणसाने आपली उंची ठेवली पाहिजे."

नेहरूंच्याबाबतीत गेल्या पंधरा वर्षांत हे झाले आहे. इंग्लंडातील एक टोरी पत्र म्हणते, "ज्या राष्ट्राजवळ लष्करी सामर्थ्य नाही आणि आर्थिक

सामर्थ्यही नाही अशा राष्ट्राचा एक पुढारी गेल्या बारा वर्षांत आंतरराष्ट्रीय राजकारणातल्या बडया बडया प्रकरणात डोक्यात तुरा खोवून बडया मुत्सद्द्यासारखा मिरवला, पण आता चीनच्या एका हल्ल्यासरशी कोसळला आहे. आता तरी त्याचा दिमाख जरा उतरेल. " ( मूळ उताऱ्याचा गोषवारा ). चीनपासून अमेरिकेपर्यंत या दोन्ही टोकांच्या राष्ट्रांतील पुढाऱ्यांना, पत्रकारांना व मुत्सद्द्यांना व भारतातल्याही काही पुढाऱ्यांना, पत्रकारांना व मुत्सद्द्यांना नेहरूंबद्दल वाटणारा मत्सर वरील उताऱ्यातल्यासारखाच असून अनेकांनी वरीलसारख्या शब्दांत तो बोलूनलिहूनही दाखविला आहे. 'नेहरूंची फाजील वाढलेली उंची आता छाटली जाऊन बेतशीर होईल.' असे अनेक बडे लोक बोलले आहेत. ही नेहरूंची 'फाजील वाढलेली' उंची काय हेच मला येथे सांगावयाचे आहे.

उद्या जागतिक राजकारणातली नेहरूंची किंमत साफ उतरली तर मला त्याचे वाईट वाटणार नाही. नेहरूंनी गेल्या पंधरा वर्षांत मांडलेली तत्त्वे उपयुक्त ठरली आहेत. अनेक बडया मुत्सद्द्यांना पटली आहेत. त्यांनी नेहरूंबद्दल कृतज्ञता दाखविली पाहिजे अशी काहीही गरज नाही. पण नेहरूंनी कोणती तत्त्वे जगाला शिकवली व जगाचे आणि भारताचे त्यांनी कोणते हित साधले हे जगाने व भारताने समजून घेतले पाहिजे. नेहरूंची राजकीय तत्त्वे सामान्यतः खालीलप्रमाणे मांडता येतील.

१. आंतरराष्ट्रीय युद्ध ही आजच्या जगात प्रयोग करून पाहण्यासारखी बाब राहिलेली नाही. अपमान व आक्रमण सोसूनही युद्ध टाळावे असे नव्हे, पण युद्ध भडकविण्याच्या प्रयत्नाऐवजी युद्ध टाळण्याच्या प्रयत्नांवर अधिक भर दिला पाहिजे.

२. युद्ध टाळायचे म्हटले म्हणजे आंतरराष्ट्रीय तणातणी ऊर्फ कोल्ड वार वाढू नये यासाठी राष्ट्राराष्ट्रांनी एकमेकांविषयी विद्वेषाची नव्हे तर स्नेहाची भाषा वापरली पाहिजे.

३. लष्करी साहाय्याच्या करारांनी जगाची विभागणी दोन मुख्य गटात होऊन त्यांचे वैर वाढत जाते म्हणून असे करार शक्य तो टाळावेत.

४. आंतरराष्ट्रीय वाटाघाटींनी शांतता स्थापणे, युद्धे व यादवी टाळणे, थबकविणे, या गोष्टी यूनोमार्फत केल्या पाहिजेत. दोन राष्ट्रांतले अथवा गटांतले भांडण हा त्या दोन राष्ट्रांमधला अथवा गटांमधला प्रश्न आहे, असे यूनोने न मानता तो जागतिक प्रश्न आहे असे मानून यूनोने ते भांडण तोडले पाहिजे.

५. सामान्यतः त्या त्या देशात अंतर्गत राजवटी व समाजघटना कशाही असोत, भिन्न भिन्न राजवटींच्या व समाजघटकांच्या देशांनी आंतरराष्ट्रीय शांततेने जगले पाहिजे.

६. भारताने लोकशाही निष्ठा सोडता कामा नये.

७. जगातला शस्त्रास्त्रांवरील खर्च कमी करून पुढारलेल्या राष्ट्रांनी मागासलेल्या राष्ट्रांना आर्थिक साहाय्य आणि शिक्षण, आरोग्य, उत्पादन इत्यादींबाबत मार्गदर्शन व सहाय्य केले पाहिजे.

८. लष्करी करारात सामील होणाऱ्या मागासलेल्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यावर दडपण येते; त्यांचा आत्मविश्वास व स्वावलंबनाची ईर्षा हे गुण कमी होतात, तेथे प्रतिगामी राजवटी बलवान् होतात. म्हणून मागासलेल्या राष्ट्रांनी लष्करी सहाय्याच्या करारात सापडू नये. मात्र आपल्या स्वातंत्र्याशी सुसंगत अशा प्रकारे परराष्ट्रांकडून आर्थिक साहाय्य जरूर घ्यावे.

परराष्ट्रधोरण हे नेहरूंनी जागतिक दृष्टीने आखले असले तरी भारताचे हित हेच त्यांच्या हेतूचे केंद्र होते आणि मुख्यतः आशियात शांतता राहावी म्हणजे भारताला शांततेच्या वातावरणाचा लाभ मिळेल असा नेहरूंचा दृष्टिकोन होता. या धोरणानुसार वागताना चीनच्या विस्तारवादास पायबंद घालण्यातच नेहरूंचे जास्तीत जास्त प्रयास खर्च झाले आणि नेहरूंच्या या प्रयत्नास जास्तीत जास्त अडथळा अमेरिकेने केला.

काश्मीरच्या मुख्य खोऱ्यात बड्या राष्ट्रांचा तळ आल्यास भारताच्या दाराशी युद्ध येईल, हे संकट टाळण्याच्या दृष्टीनेच काश्मीर प्रकरण नेहरूंनी हाताळले, याहून काश्मीर प्रकरणाच्या तपशीलात मी जात नाही. खरोखर अहेतुकपणे का होईना, नेहरूंनी काश्मीरचा वायव्य भाग सोडल्यामुळे गिलगीट येथे अमेरिकेला लढाऊ विमानतळ स्थापता आला व अमेरिकेची इच्छा असती तर त्यात अमेरिकेला समाधान मानता आले असते. कारण चीन व रशिया या दोन्ही राष्ट्रांविरुद्ध या विमानतळाचा उपयोग होऊ शकतो. पण अमेरिका भारताशी सूडबुद्धीने वागली. भारताने अमेरिकेच्या लष्करी साहाय्याच्या करारात जाण्याचे नाकारले व लष्करी साहाय्याचे करार हे प्रतिगामी व राष्ट्रीय स्वातंत्र्य नष्ट करणारे आहेत असा प्रचार नेहरूंनी केला. याचा परिणाम असा झाला की, दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या बहुतेक राष्ट्रांनी अमेरिकेच्या लष्करी साहाय्याच्या करारात जाण्याचे नाकारले. ( याला पाकिस्तान हाच मोठा अपवाद होय. ) याची अमेरिकेस चीड येऊन अमेरिकन मुत्सद्दी, सरकार व पत्रकार यांनी पाकिस्तान व भारत यांच्या काश्मीरबाबतच्या भांडणात सतत पाकिस्तानचीच बाजू घेतली व पाकिस्तानच्या विद्वेषभावनेस सतत खतपाणी घालून पोसले.

यामुळे गेल्या पंधरा वर्षांत पाकिस्तानकडून झालेल्या छळास युद्ध न करता तोंड देणे या एकाच कार्यात भारताला कितीतरी नुकसान व बेअब्रू सोसावी लागली आहे. अमेरिकेने भारताशी केलेल्या वैराचेच हे व्यक्त स्वरूप होते. अमेरिकेची शस्त्रे पाकिस्तानला सतत मिळत राहिली नसती तर हा सारा

इतिहास फार वेगळा झाला असता. लाल चीनला यूनोत घ्या ही मागणी भारताने १९५० पासून केली. तिचा हेतू यूनोच्या आंतरराष्ट्रीय न्यायासनासमोर जगातील इतर राष्ट्रांच्या बरोबरीने चीनला स्थान दिल्यास चीनला त्याची गाऱ्हाणी तेथे मांडता येतील व त्याचबरोबर चीनबद्दलची गाऱ्हाणी तेथे मांडता येऊन जगातील राष्ट्रांसमोर चीनचा जाब मागता येईल हा होता. या शब्दांत नेहरू बोलू शकले असते तर चीनची मैत्री ठेवणे त्यांना अशक्य झाले असते व आजचे युद्ध पूर्वीच भारतावर कोसळले असते. म्हणून नेहरू स्पष्ट बोलले नाहीत. चीनला यूनोत घेण्याला जास्तीतजास्त विरोध अमेरिकेनेच केला. रशियाला चीनच्या विस्तारवादाचा धाक वाटतो ही गोष्ट नेहरूंनी सर्वांआधी हेरली व कोरिया, इंडोचीन व लाओस या तीन प्रकरणी पश्चिमी राष्ट्रे व रशिया यांना एकत्र आणून महायुद्धाचा संभव या तीनही प्रकरणी टाळला. या तीनही प्रकरणांत चीनच्या विस्तारी धोरणास पायबंद घालणे हेच सर्वांचे मुख्य उद्दिष्ट होते.आणि या तीनही प्रकरणी चीन व रशिया यांच्याशी युद्धप्रसंग टाळण्यासाठी पश्चिमी राष्ट्रांना नेहरूंचे मार्गदर्शन स्वीकारावे लागले, शस्त्रास्त्रकरारांचा उपयोग झाला नाही व चीनशी लढणे अनिष्ट वाटूनच समेट पत्करावा लागला. नेहरूंच्यासारख्या एका मागासलेल्या राष्ट्राच्या पुढाऱ्याच्या बुद्धिमत्तेमुळे अमेरिकेसारख्या बलाढ्य व धनाढ्य राष्ट्रास अशा प्रकारे पुन:पुन्हा नमावे लागले याचा डूख अमेरिकेतील बड्या पत्रकारांनी व काही मुत्सद्द्यांनी धरला आहे.

अरब राष्ट्रांच्या प्रदेशात लष्करी साहाय्याच्या करारांचा फजितवाडा उडाला आणि ब्रिटन व फ्रान्स यांनीच इजिप्तवर स्वारी केल्यामुळे अमेरिकेच्या लष्करी सहाय्याच्या करारांची जास्तीतजास्त फजिती झाली. अमेरिकेच्या नीतीचा हा सारा पराभव नेहरूंमुळे झाला असे मानून अमेरिका सतत चिडत राहिली. त्यामुळे पाकिस्तानला काश्मीर प्रकरणी सतत उत्तेजन देऊन भारताच्या पाठीतली ही जखम अमेरिकेने सतत वाहती ठेवली.

मला आजच्या आंतरराष्ट्रीय जगात अमेरिका हे राष्ट्र जास्तीतजास्त आवडते. त्यांचा फटकळपणा, प्रांजळपणा, उदार व सहनशील दृष्टी, संशोधन वृत्ती हे त्यांचे गुण मोठे आहेत. पण नेहरूंची तीक्ष्ण बुद्धिमत्ता त्यांना सहन झाली नाही, आणि एखाद्या जुन्या काळच्या पराक्रमी राजाला एखाद्या गरिबाची सुंदर व स्वाभिमानी मुलगी हवी असता " मी तुझ्या जनानखान्यात येणार नाही, " असे तिने बाणेदारपणाने उत्तर दिले असता, तो राजा जसा त्या मुलीवर डूख धरतो तसा डूख अमेरिकेतल्या लक्षावधी खपाच्या काही वृत्तपत्रांनी नेहरूंवर गेल्या बारा वर्षांत सतत धरला असून चीनची भारतावर स्वारी नेफा भागातून होताच त्यांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या.

शां. ५

चीनच्या नेफा भागातील आक्रमणासंबंधाने नेहरूंचे मत जगजाहीर झालेच आहे. पण नेहरूंच्या मताचा विचार न करता आपण स्वतंत्रपणे या बाबत विचार करणेच योग्य होईल. हे आक्रमण हा नेहरूंच्या परराष्ट्रधोरणाचा पराभव मुळीच नव्हे. नेहरूंना अथवा दुसऱ्या कोणालाही त्याची कल्पना नव्हती हे खरे, पण जे म्हणतात की 'आम्ही हे आधीच बोललो होतो' त्यांनी इतरही कितीतरी भाकिते केली होती. ती त्यांची सारी चुकली आणि चीनच्या भारतावरील स्वारीचे भविष्य त्यांनी केले होते ते मोठेसे माहीतगारीने अथवा साधार तर्काने केले होते असे मुळीच नव्हे. तो अनमानधपका होता.

नेफाच्या बाजूने चीन चढाई करणार नाही असे नेहरूंना वाटले. याचे कारण ती स्वारी अंगलट येईल हे चीनला ठाऊक असावे असे नेहरूंना वाटले. त्यांचा तो अंदाज खराही होता. पण चीनला नेफाकडून भारतावर चढाई करावीशी वाटण्याला एक आगंतुक कारण घडले. क्यूबा प्रकरणी अमेरिका व रशिया यांचे हैड्रोजनयुद्ध ऑक्टोबर २० पासून चारपाच दिवसात केव्हाही भडकणार असा संभव निर्माण झाला, तेव्हा उध्वस्त होणाऱ्या युरोप-अमेरिकेचा आणि उध्वस्त न होणाऱ्या आशिया-आफ्रिका खंडाचा वारसा आपणांस मिळणार, या लोभाने चीनच्या तोंडास पाणी सुटले व त्याने नेफात चढाई केली. पण नंतर रशियाने केनेडींपुढे लोटांगण घालून युद्ध टाळले व अमेरिकेचे हात भारतास साहाय्य करण्याला मोकळे राहिले. यामुळे चीनचा डाव हुकलाच आहे.

अमेरिकेच्याही अलीकडे लक्षात आले आहे की, लष्करी साहाय्याच्या करारात सामील न झालेल्या भारताने लोकशाही निष्ठा शाबूत ठेवली असून, अमेरिकेची लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य शाबूत रहायचे असेल तर भारताची लोकशाही व राष्ट्रीय स्वातंत्र्य शाबूत राहिले पाहिजे. अमेरिकेच्या लष्करी साहाय्याच्या कराराचीही या भारत-चीन युद्धात जास्तीतजास्त फजिती झाली आहे. पाकिस्तान-अमेरिका लष्करी साहाय्याचा करार कम्युनिस्ट राष्ट्रांच्या आक्रमणास पायबंद घालण्यासाठी करण्यात आला आणि आज एका बलाढ्य कम्युनिस्ट राष्ट्राचे आक्रमण भारतावर झाले असून भारत निष्ठेने लढत आहे, तर कम्युनिस्ट आक्रमणास पायबंद घालण्याची जास्तीतजास्त चांगली पर्वणी आली असता, गेली आठ वर्षे अमेरिकेने अब्जावधी डॉलर खर्चून जो कुलुंगी प्राणी कम्युनिस्ट राष्ट्राचा चावा घेण्यासाठी पोसला तो कम्युनिस्ट राष्ट्रांशी प्राणपणाने लढणाऱ्या भारताचाच चावा घेत आहे. आपले लष्करी साहाय्याच्या कराराचे धोरण फसले की यशस्वी झाले हे अमेरिकेने स्वतःच पाहावे.

नेहरूंना यापुढें आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान राहणार नसले तर नेहरूंचेही त्यावाचून काही खोळंबलेलें नाही. अमेरिकेच्या लक्षात अमेरिकेच्या चुका येतील व त्या अमेरिका दुरुस्त करील तर अमेरिकेचे धन, बळ व गुण जगाच्या व परिणामी अमेरिकेच्या हिताला कारण होतील.

भारताला सर्वांची मदत हवी आहे. आजवर भारताने आंतरराष्ट्रीय शांतता व लोकशाही यांची जी सेवा केली आहे आणि आजही ज्या निष्ठेने भारत लोकशाहीचा बचाव करू पहात आहे, त्यात अमेरिकेला व ब्रिटनला स्वतःचे व जगाचे हित आहे असे वाटत असेल तरच त्या राष्ट्रांनी भारताला मदत करावी. "अशी मदत न आल्यास मी कम्युनिझमला शरण जाऊन लोकशाहीचे बलिदान करीन." असे नेहरू कधीही म्हणणार नाहीत एवढे खास.

आजचे चीनचे आक्रमण अनपेक्षित असले तरी ते परिणामी भारताला हितकर ठरेल असेच मला वाटते. जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर हल्ला करून अमेरिकन आरमाराचा अपार विध्वंस केला त्याने अमेरिकेला जाग आली. भारतालाही चीनच्या आजच्या आक्रमणाने जाग आली आहे. लडाख-मध्यें आम्ही भूप्रदेशाच्या अडचणीमुळे लढू शकत नव्हतो व फक्त आमची अब्रू वाहून चालली होती. लोकशाही राष्ट्रात प्रत्यक्ष युद्ध आल्यावाचून युद्ध-भावना निर्मिता येत नाही. पश्चिमी राष्ट्रे व रशिया यांच्यामध्ये बर्लिनवर युद्ध माजावें यासाठी चीन रशियाला चिथावणी देत होता. तसे युद्ध माजले असता चीनची स्वारी भारतावर होण्यात सर्वनाशाचा धोका होता. चीनशी लढण्याची जय्यत तयारी नेहरूंनी केली नाही म्हणून शेंबडी पोरेही आज नेहरूंना वेडावीत आहेत. पण गेली पस्तीस वर्षे घनघोर रणकंदनाच्या भट्टीत तयार झालेल्या व गेल्या तेरा वर्षांत हुकुमशाहीने अर्थसंघटना व युद्धसंघटना उभारलेल्या चीनशी लढण्यासाठी कोठे , किती वर्षे, केवढी व किती खर्चाची युद्धसंघटना सिद्ध ठेवायची होती आणि भारतासारख्या मागासलेल्या राष्ट्रात लोकशाही शाबूत ठेवून हे काम कसे करावयाचे होते, या प्रश्नांचे बौद्धिक आकलनच 'आम्ही हे आधीच बोललो होतो' म्हणणाऱ्या दीडशहाण्यांना झालेले नाही.

चीनशी लढायला तयारी कोणती हवी हे कळायला चीनचा हल्ला आमच्या मर्मप्रदेशावर होणे हाच मार्ग होता. रूसो-अमेरिकन युद्ध माजल्यावर चीनचा हल्ला आमच्या मर्मप्रदेशावर झाला असता, तर आम्हाला अक्कल शिकण्या-पूर्वीच सर्वनाश पत्करावा लागला असता. रूसो-अमेरिकन युद्ध माजल्या-वाचून भारताच्या ममप्रदेशावर हल्ला करण्याइतका वेडेपणा चीन करणार नाही हे उघड होते. शेवटी भारताला अनुकूल असा अकल्पित योगायोग जुळून आला. क्यूबावर रूसो-अमेरिकन युद्ध भडकणार असे चाऊला वाटले. व त्याने भारताच्या मर्मस्थानावर चढाई केली. त्यात भारताला माघार



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थलम
अनुक्रम........................ दि: ...

घ्यावी लागली. पण इकडे क्रुश्चेवने केनडीपुढे नमते घेऊन युद्ध टाळले व भारताच्या पराभवात जागतिक लोकशाहीवर संकट येणार हे पाहून अमेरिकेने व ब्रिटनने भारताला भरपूर सहाय्य देण्याचे ठरविले. आता भारतात लोकशाहीच्या दिमाखाखाली माजलेला ऐदीपणा, खाबूपणा या आक्रमणाच्या धक्याने कोसळण्याची आशा उत्पन्न झाली आहे.

हल्लीचा शस्त्रविराम पुन्हा मोडेल की काय हे सांगता येत नाही. पण आसामात चीनने अधिक चढाई केल्यास आसामातील ब्रिटनची अफाट संपत्ती आणि पुढे अमेरिकेच्या लष्करी सहाय्याच्या करारातील पाकिस्तानचा प्रदेश यांना धोका दिसल्यास अँग्लो-अमेरिकन्स युद्धात पडतील आणि रशियाने क्यूबात टाळलेले हायड्रोजन युद्ध रशियाला चीनसाठी पत्करावे लागेल, म्हणून रशियाच चीनला आवरील. चीनला विजय पचणार नाही. फायद्याचा होणार नाही. पुढे चीनला अंतर्गत संकट येते की काय या प्रश्नाची चर्चा मी येथे करीत नाही.

तिबेटवर चीनने स्वारी केली तेव्हाच आम्ही चीनला अडवायला हवे होते असे बोलणारे लोक ' उचलली जीभ लावली टाळचाला ' या पद्धतीने बेजबाबदारपणे बोलतात. भौगोलिक दृष्टचा तिबेटला आम्ही पोचूच शकत नाही. आणि चीनशी युद्ध टाळण्यासाठीच अँग्लो-अमेरिकनांनी कोरिया, इंडोचिन व लाओस या तिन्ही प्रकरणी नेहरूंच्या आड उभे राहून समेट केले व त्यांनी आपली अब्रू बचावली. अशा स्थितीत तिबेटबाबत चीनविरुद्ध बोलून कोणाची मदत आम्ही मिळवू शकलो असतो ? तरीही तिबेटी निर्वासितांना लोकशाही निष्ठेसाठी आश्रय देऊन आम्ही धोका पत्करला. आता हिमालयही आम्हांला लढविण्याला अवघड असला तरी चीनला जास्त अवघड आहे. चीनचे बळ निःसंशयच एवढे मोठे आहे, की आम्ही पश्चिमी राष्ट्रांची मदत चीनचे आक्रमण परतविण्यासाठी घेणे हे केव्हाही अपरिहार्यच ठरले असते. पण प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यावाचून अँग्लो-अमेरिकनांना आम्हाला मदत करण्याची गरज पडली नसती. लष्करी साहाय्याच्या कराराची व्यर्थता त्यांना पटली नसती. ' तुमचे अलिप्तता-धोरण शक्यतोवर सोडू नका, तरीही आम्ही मदत देतो, म्हणजे मोठे युद्ध टळेल ' असे आज बडे पश्चिमी पत्रकार बोलत आहेत, तसे ते बोलत नसते , आणि भारताची सुस्ती उतरण्याला एक धक्का हवा होता तो मिळाला नसता.

आजवरच्या नेहरूंच्या धोरणामुळे युद्ध टळून लोकशाही दृढमूल झाली, आर्थिक विकास झाला, अमेरिकन सरकारचे मत भारताच्या धोरणाविषयी अधिक अनुकूल झाले आहे. अशा वेळी हे युद्ध आले ही पर्वणी आहे. यात नेहरूंचे अपयश नाही. त्यांचे धोरणच रास्त असल्याचे जगाला आज अधिक पटू लागले आहे.

चित्रमयजगत : जानेवारी १९६३

# थोर संत व यशस्वी मुत्सद्दी

" नेहरूंचे यशःशरीर १९६२ च्या ऑक्टोबरात चीनने भारतावर आक्रमण करून भारतीय सैन्याचा फडशा पाडला तेव्हाच मेले. २७ मे १९६४ रोजी मेले ते फक्त त्यांचे भौतिक शरीर." असे एका नामवंत समाजवादी लेखकाने नेहरूंवरील मृत्युलेखात लिहिले आहे. हे लिहिणे साफ साफ चुकीचे आहे. त्या लेखकाच्या ठिकाणी चालू इतिहास समजून घेण्याची पात्रता तरी नाही अथवा राजकीय आकसाने नेहरूंपुरती त्याच्या बुद्धीला काजळी आली आहे. यांपैकी काहीतरी या लेखकाच्या बाबतीत खरे मानले पाहिजे.

हिमालयावरील चीनचे आक्रमण केवढेही मोठे मानले तरी त्याहीपेक्षा फारच फार मोठ्या संकटांपासून नेहरूंनी जगाचा, आशियाचा, भारताचा निदान दोनदा बचाव केला. कोरिया, इंडोचीन व लाओस या तिन्ही प्रकरणी नेहरूंनीच महायुद्ध टाळले. त्यासाठी रशियाचीही मदत मिळविली. अँग्लो-फ्रेंच-अमेरिकन्स ही राष्ट्रे मोठ्या युद्धाला, ॲटॉमिक युद्धाला तयार नव्हती. वरील तीन प्रसंगी लहान युद्धे थांबविली गेली नसती तर तिसरे महायुद्ध झाले असते. अथवा झाले नसते तरी आग्नेय आशिया चिनी कम्युनिझमच्या उदरात गडप झाला असता. कारण कोरिया अथवा इंडोचीन या प्रदेशात अँग्लो-फ्रेंच-अमेरिकन्स स्वतः लढू शकत नाहीत व स्थानिक माणसे तेथे कम्युनिझमविरुद्ध कडव्या देशभक्तीने लढू इच्छित नाहीत असा अनुभव गेल्या चौदा वर्षांत सतत आला आहे.

कोरियात अमेरिकेला विजय मिळालेला नसतानाही "मी रणांगणातून सैन्य मागे घेतो, मला राष्ट्रपतीपदासाठी निवडून द्या" असे आयसेनहोवर अमेरिकन मतदारांना १९५२ च्या निवडणुकीत म्हणाला होता. "मी रणांगणातून पळ काढतो, मला राष्ट्रपती करा" असे मतदारांना सांगणारा सेनापती जगाच्या इतिहासात कोणी ऐकला आहे काय? मला आयसेनहोअरचा उपहास करावयाचा नसून चालू इतिहासाचे गांभीर्य व मर्म वाचकांच्या लक्षात आणावयाचे आहे.

कोरिया, इंडोचीन व लाओस येथे गेली १५ वर्षे झडप घालू पहाणारा जो वाघ जंगलात दडून बसला आहे तो लाल चीनच आहे. कोरिया व इंडोचीन ही दोन द्विपकल्पे त्याच्या पोटात गेली तर तो आग्नेय आशियाचा व नंतर

भारताचा आणि बाकीच्या आशियाचा स्वामी होतो, अथवा या सर्व विस्तीर्ण प्रदेशात कम्युनिझम भडकवितो, अथवा जगात तिसरे महायुद्ध माजवितो हे संभव नेहरूंना १९५० पूर्वीच दिसले होते. यांपैकी एक, दोन अथवा तिन्ही संभव रशियाला हवे असते तर नेहरूंच्या युद्ध थांबविण्याच्या सूचनेस रशियाने पाठिंबा न देता चीनलाच मदत केली असती.

रशिया व चीन यांची त्या त्या वेळी एकजूट झाली असती तर अँग्लो-फ्रेंचा-अमेरिकनांना युद्ध करून अथवा न करूनही आशियात कम्युनिझमचा भडका टाळता आला नसता. पण नेहरूंनी कोरिया व इंडोचीन यांतीय युद्धे थांबविण्यास रशियाचा पाठिंबा मिळविला; चीनच्या आक्रमणास पायबंद घालण्यासाठीच रशियाचे हे साहाय्य त्यांनी मिळविले होते. या कार्यासाठी रशियाचे असे साहाय्य मिळेल हे त्यांनी १९४९–५० सालीच हेरले यात नेहरूंची दूरदृष्टी दिसून येते.

पश्चिमी राष्ट्रे व भारतातील कितीतरी मुत्सद्दी हे सर्वजण नेहरूंना सांगत होते की, " चीन व रशिया ही कम्युनिस्ट राष्ट्रे एक होऊन भारताला व आशियाला खाणार, तेव्हा पश्चिमी राष्ट्रांशी शस्त्रास्त्र-साहाय्याचे करार करा व आपल्या बचावाची तयारी करून ठेवा. " पण नेहरूंचे विचार अगदी वेगळ्या दिशेने वहात होते. रशियाला तिसरे महायुद्ध नको आहे हा नेहरूंचा ठाम अंदाज. युरोप-अमेरिकेतील लोकांनाही युद्ध नको आहे, अशी त्यांची खात्री. म्हणून रशिया हा चीनशी एकजूट होऊन व आशियात कम्युनिझम भडकविण्यासाठी चीनला साहाय्य देऊन तिसऱ्या महायुद्धाचा धोका पत्करण्यापेक्षा चीनच्या आक्रमणाला मागे खेचण्याला रशिया साहाय्य करील, हे नेहरूंनी अंदाजले. भारतासारख्या आशियातल्या मोठ्या राष्ट्राने अमेरिकेचे शस्त्रास्त्र-सहाय्य घेण्याचे व आशियात रशियाला धोका वाटेल अशी परिस्थिती निर्मिण्याचे नाकारले, तर उलट रशियाही चीनला पायबंद घालण्यास साहाय्य देऊन भारताला रशियाची व चीनचीही भीती वाटू नये, यासाठी भारताशी मैत्री करील व भारताला साहाय्य करील, असा अंदाज नेहरूंनी बांधला व तो शंभर टक्के खरा ठरला.

उलट अँग्लो-अमेरिकनांनी पाकिस्तानला कोणत्याही कम्युनिस्ट राष्ट्राचा धाक नसतानाही सतत शस्त्रे पुरविली व काश्मीरच्या लोभाने सतत पंधरा वर्षे भारताचा छळ चालविला असता रशिया काश्मीरप्रश्नावर सतत भारताच्या बाजूस राहिला आहे.

भारताला व आशियाला चीनपासून धोका उत्पन्न झाल्यास अँग्लो-अमेरिकनांपेक्षा रशियाच तो धोका अधिक खात्रीने टाळू शकेल व टाळू इच्छिल असा नेहरूंचा अंदाज असावा. हिमालयावरील चीनच्या आक्रमणाच्या वेळी हा अंदाज चुकला खरा. पण क्यूबावर अमेरिका व रशिया यांचे अ‍ॅटॉमिक युद्ध

उद्भवण्याचा दृढ संभव १९६२ च्या ऑक्टोबरमध्ये अगदी अनपेक्षितपणे उद्भवला. तेव्हा आशियात आपणांस कोणी दाबता राहणार नाही अशा अंदाजाने चीनने भारतावर आक्रमण केले. नंतर तिकडून रशिया व अमेरिका मोकळे होताच चीनला माघार घ्यावी लागली. पुढे याच कारणासाठी चीनचे रशियाशी आता हाडवैर सुरू झाले आहे आणि चीनचे आक्रमणाचे धोरण चुकले व ते त्यालाच फार महाग पडले हे सिद्ध झाले आहे.

नेहरूंनी निदान दोन वेळा महायुद्धापासून व कम्युनिझमपासून भारताला व आशियाला वाचविले. या टळलेल्या संकटांच्या मानाने हिमालयावरील पराभव फार मोठा खास नव्हे व तेही आक्रमण हटले आहे. ज्यांना हे पटत नाही त्यांची दृष्टी संकुचित व बुद्धी हेकट आहे याहून अधिक काय बोलायचे ?

चीनच्या आक्रमणाची भारताने उपेक्षा केली हा आरोप खोटा आहे. चीन बलाढ्य आहे व त्या मानाने भारत फार दुबळा आहे हे ऐतिहासिक सत्य आहे. त्याला नेहरू जबाबदार नाहीत. "चीनशी आपण लढू शकणार नाही, चीनचा प्रश्न राजकीय मुत्सद्देगिरीने सोडविला पाहिजे," असे जनरल थिमय्याच बोलले होते. याहून अधिक युक्तिवाद मी येथे करू इच्छित नाही. या राजकीय मुत्सद्देगिरीचा मार्ग पश्चिमी राष्ट्रांशी शस्त्रास्त्र-साहाय्याचे करार करणे हा नव्हे. कारण अशा करारानेच रशिया बिथरेल व युद्ध जवळ येईल असे नेहरूंना का वाटले हे वर दिले आहे. त्याचा पर्याय म्हणूनच रशियाशी व चीनशी मैत्री करण्याचे त्यांनी ठरविले. पैकी रशियाशी केलेली मैत्री कशी फायदेशीर ठरली हे वर सांगितलेच आहे.

चीनशी मैत्री ठेवून चीनला यूनोत घेण्याचा आग्रह नेहरूंनी १९५० सालीच धरला. नेहरूंच्या या भूमिकेची भारतातही थट्टा झाली. पण आज या वेळी माझ्या टेबलावर जो ६ जून १९६४ चा लंडन 'इकॉनॉमिस्ट' आहे तो काय सांगतो पहा. लाओसमधील आजच्या संकटावर लिहिताना 'इकॉनॉमिस्ट' म्हणतो, "चीन जगाविषयी अज्ञानी आहे व जग चीनविषयी अज्ञानी आहे हेच आताचे व आजवरचे संकट होय." नेहरूंना हे संकट टाळायचे होते.

चीनशी लढण्याचा मन्सुबा आज बलाढ्य अशा पश्चिमी राष्ट्रांचा मुळीच नसून चीनशी बोलावे कसे या चिंतेत ही राष्ट्रे आज आहेत. मग भारताने चीनशी लढण्याची तयारी केली नाही म्हणून नेहरूंचे 'यश:शरीर' मेले कसे ? चीनला जगाची ओळख व्हावी, जगाला चीनची ओळख व्हावी, चीनच्या अडचणी जगाने सोडवाव्या, चीनला आक्रमणशीलतेपासून जगाने परावृत्त करावे, चीनशी लढणे अशक्य आहे तर युद्धच टाळावे ही राजकीय मुत्सद्देगिरी नेहरूंनी अवलंबिली. यूनोची मदत घेऊन काश्मीरबाबत पाकिस्तानशी युद्ध टाळले आणि लोकशाही मार्गाने भारतासाठी प्रगतिप्रयत्नाला संधी मिळविली याहून दुसरे काय करणे अधिक शहाणपणाचे ठरले असते ?

चीनशी आम्ही एकटचाने लढू शकत नव्हतो, पण पूर्वी जर्मनीशी एकेकटे कोण कोण लढू शकले ? आणि युद्ध टाळण्याचा प्रयत्न चूक कसा ? दुसरे महायुद्ध टाळायलाच हवे होते असे त्या युद्धात विजय मिळाल्यानंतरही चर्चिल म्हणतो. मग नेहरूंनी युद्ध टाळण्याचे प्रयत्न केले यात चूक काय झाली ? त्यात त्यांना अनेकदा यश मिळाले व हिमालयावर आक्रमण झाले पण तेही थांबले. मग नेहरूंचे ' यशःशरीर ' तेथे मेले कसे ? दोनदा टळलेल्या सर्व-भक्षक महायुद्धापेक्षा हे थांबलेले आक्रमण अधिक भयंकर होते काय ? आज अमेरिकन सैनिक रोज लाओस व दक्षिण व्हिएतनाममध्ये हताशपणे मरत आहेत, हे काय होत आहेत ?

राजकीय मुत्सद्दी म्हणून नेहरू परराष्ट्रधोरणात यशस्वीच झाले आहेत. पण याहीपेक्षा त्यांचे यश त्यांनी जगाला निर्वैराचा व शांततेचा संदेश दिला व ( भारतीयांपेक्षाही ) जगाच्या लक्षात तो संदेश अधिक भरला यात नेहरूंचे यश मोठे आहे. नेहरू हे हॅरो व केंब्रिजच्या शिक्षणामुळे मोठे झाले. हे खरे नव्हे. " मला बुद्धाच्या शिकवणुकीचे वेड लहानपणापासून आहे " असे नेहरूंनी ' डिस्कव्हरी 'मध्ये परोपरीने लिहिले आहे. बुद्धाची शिकवण संन्यासमार्गाची नसून कर्मयोगाचीच असली पाहिजे असे तेथे नेहरूंनी म्हटले आहे. गांधींच्याकडे नेहरू आकर्षिले गेले ते त्यांना गांधीत बुद्धदर्शन झाले म्हणून. गांधींची निर्वैरवृत्ती नेहरूंच्या अंतःकरणापर्यंत भिडली होती. त्यांचे व जगाचे भाग्य हे की, बुद्धाचा निर्वैरत्वाचा संदेश जगाला व्यवहारोपयोगी वाटण्याची वेळ अॅटमयुगाने आणली. नेहरूंसारखा बुद्धानुयायी संत हा जगाला राजकीय मुत्सद्दी म्हणून उपयोगी पडला व स्वदेशालाही त्याने महान संकटा-तून वाचविले.

१९४९ साली नेहरू अमेरिकेस गेले तेव्हा त्यांनी अमेरिकेला व जगाला सहजीवनाचा सिद्धान्त सांगितला. त्या वेळी रशिया बर्लिनवर युद्ध माजवु पहात होता, मॉस्को रेडिओ नेहरूंवर शिव्या ओकत होता आणि हिंदी कम्युनिस्ट नेहरूंचा ' चँग-कै-शेक ' करण्यासाठी येथे आगी लावीत होते. त्यानंतरच्या पंधरा वर्षांत रशियाने व अमेरिकेने सहजीवनाचे तत्त्व मान्य केले व नेहरूंचा शांततावाद हा प्रामाणिक श्रद्धेचा असून तोच जगाला तारक आहे, अशी कबुली या दोघांनी दिली हे नेहरूंचे धवल यश आहे. चीनने ते अमान्य केले म्हणून नेहरूंचे ' यशःशरीर ' मेले नाही.

निर्वैर भावना हाच नेहरूंच्या लोकशाही निष्ठेचा आधार आहे. त्यांची लोकशाही निष्ठा ही नुसती तांत्रिक नव्हे. " जगाला फॅसिझम व कम्युनिझम यांपैकी काहीतरी पत्करावे लागले तर मी कम्युनिझम पत्करीन. " असे नेहरूंनी १९३३ साली हिटलर अधिकारावर आल्यावेळी म्हटले आहे. ( ब्रीचर, पृ. १८८ ). पण परिस्थितीनुसार कम्युनिझममध्ये आपण फरक

केला पाहिजे असे त्याच निवेदनात नेहरूंनी म्हटले आहे. स्टालिनच्या जुलमी हुकूमशाहीचा त्यांनी नेहमी निषेध केला, पण रशियाच्या विशिष्ट परिस्थितीचा तो परिणाम असून रशियात व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांत शिक्षणप्रसार व आर्थिक सुबत्ता वाढल्यावर कोणत्यातरी स्वरूपाची लोकशाही तेथे अवतरेलच असा अंदाज नेहरूंनी अनेकदा सांगितला. हा त्यांचा अंदाज खरा ठरत आहे.

इतिहासाचा अर्थ लावण्याची कम्युनिस्टांची पद्धती नेहरूंना चिंतनीय वाटली. राज्यसंस्थेचे ध्येय लोककल्याण हे असून ते साधण्यासाठी प्रातिनिधिक सरकारने नियोजन व नियंत्रण यांवर अर्थसंघटना आधारली पाहिजे, हा कम्युनिस्टांचा सिद्धान्त त्यांनी स्वीकारला आणि लोकशाही मार्गाने ही गोष्ट घडविली पाहिजे असा आग्रह धरला. ३५ कोटी लोकसंख्येच्या मागासलेल्या, जाती, धर्म, पंथ यांनी फाटलेल्या व फुटलेल्या राष्ट्रात हा प्रयोग करू पहाण्यात अपूर्व धाडस होते. पण नेहरूंची लोकशाहीनिष्ठा तांत्रिक नसून बुद्ध व गांधी यांचे निर्वैर व व्यक्तिस्वातंत्र्याचे माहात्म्य या निष्ठांवर आधारलेली होती. म्हणून निर्भयपणे व अचलतेने त्यांनी हे धाडस केले. "आम्हांला मदत करा नाहीतर येथे कम्युनिझम येईल," असा पाश्चात्य राष्ट्रांना धाक घातला नाही. कम्युनिस्ट राष्ट्रांशी स्नेह ठेवताना "तुमची हुकुमशाही आम्हांला नको" असे स्पष्ट बजावले. भारतात लोकशाही कायम रहावी म्हणून विरोधी पक्षांना व काँग्रेसलाही विविध मूर्खपणाचा व आततायीपणाचा धांगडधिंगा नेहरूंनी घालू दिला. आणि महान् संकटकालीही घणमणायचे नाही, डळमळायचे नाही, अशी आपल्या उदाहरणाने लोकांना सवय लावली. नेहरूंच्या मृत्यूनंतर विस्कटाविस्कट तावडतोब सुरू होईल अशा अर्थाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भाकिते खोटी ठरली आहेत. हे नेहरूंनी लोकशाहीनिष्ठा जनमनावर बिंबवली याचे यश आहे.

नेहरूंच्या शांतिधोरणाचा गौरव करून द गॉल म्हणतो, "मी नेहरूंची स्मृती जागृत ठेवण्यासाठी झटेन." याचा अर्थ नेहरूंचे क्रियाशील अलिप्ततावादाचे धोरण आपण पुढे चालवू असे द गॉलचे हे आश्वासन आहे. आग्नेय आशियात त्याने हे धोरण अवलंबिलेही आहे. फ्रेंच मंत्रिमंडळाच्या बैठकीत नेहरूंच्या मृत्यूसंबंधाने बोलताना फ्रेंच परराष्ट्र मंत्र्यांनी 'भारतासारख्या आतून अनेक कारणांनी चिराळलेल्या राष्ट्रास नेहरूंनी एकजूट केले ही ही त्यांची थोरवी होय," असे उद्‌गार काढले आहेत. दूरच्या माणसांना नेहरूंचे हे यश दिसते व आम्ही त्यांचे यश:शरीर मेले आहे असे म्हणतो ! ९ कोटी मैलांवरून पृथ्वीला सूर्यप्रकाश मिळतो, पण सूर्याभोवती जवळपास अंधारच आहे असे सांगतात तसेच हे असेल.

कम्युनिझम व गांधीवाद यांचा अभेद्य रांधा हे नेहरूंच्या विचारांचे, भावनांचे, वर्तनांचे व शिकवणीचे स्वरूप आहे. कॉपीबुकातील नीतिवचने

निर्बुद्धपणे पढणाऱ्यांची नेहमी थट्टा होते आणि म्हणून प्रौढपणी 'शहाणी' माणसे नीतिविचारांना फाटा देऊन व्यवहाराच्या गरजेनुसार वागतात. पण नेहरूंचे असे नव्हते. त्यांच्या मनात व व्यवहारात 'वसुधैव कुटुंब' ही वृत्ती होती म्हणून यूनोची प्रतिष्ठा त्यांनी वाढविली. सॉलोमन ट्रोन या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाकडून १९५० साली भारताच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी करवून पहिल्या पंचवार्षिक योजनेचा नेहरूंनी पाया घातला. मिहालनोविस-सारख्या कम्युनिस्ट अर्थपद्धतीवर निष्ठा असलेल्याचे नियोजनाच्या आखणीत साहाय्य घेतले, जगातील दोन्ही टोकांच्या राष्ट्रांना आपल्या लोकशाही निष्ठेची, शांततावादाची व स्नेहाची खात्री पटवून भारताला सहाय्य करण्या-नेच जगांत शांतता नांदेल, हा विचार त्यांच्या मनात आपोआप निर्माण होण्याची परिस्थिती निर्मिली. या गोष्टी खरोखर पंधरा वर्षांपूर्वी असंभाव्य वाटल्या असत्या, त्या आज खऱ्या घडल्या आहेत. पण तरीही नेहरूंचे यशः-शरीर मेले असे आम्ही म्हणतो. याचे कारण 'अतिपरिचयादवज्ञा' हेच असले पाहिजे.

नेहरूंचे हे सारे यश त्यांच्या केवळ मुत्सद्दगिरीचे नव्हे. गांधींच्या व बुद्धाच्या शिकवणुकीवर त्यांची जिवंत निष्ठा होती व त्यांचे मन नेहमी संस्कारक्षम होते. लिंकनच्या हाताची प्रतिमा ते नेहमी आपल्यासमोर ठेवीत. भगवत्गीतेतील स्थितप्रज्ञलक्षणे रोज वाचीत. रॉबर्ट स्फ्रॉस्टची खरोखरीच स्फुरणदायी अशी कविता* त्यांनी आपल्या टेबलावरील पॅडवर आपल्या हाताने लिहून समोर ठेवली होती. यावरून लहान मुलांच्या मनावर बिंबवण्यासाठी कॉपीबुकात नीतितत्त्वे असतात पण प्रौढपणी ती तत्त्वे विसरायची असतात, हे जे आपले व्यवहार-धोरण असते त्याहून नेहरू वेगळे होते हे स्पष्ट दिसते. प्रौढांनीही लहान-मुलांप्रमाणे नीतितत्त्वे मनाला लावून घतली पाहिजेत असे त्यांचे मत होते व तसे ते आयुष्यभर वागत राहिले.

नेहरूंची विद्वत्ता अफाट होती, त्यांचे इतिहासाचे ज्ञान अगाध होते, पण या सर्वांपेक्षा 'अद्वेष्टा सर्वभूतानाम् मैत्रः करुण एव च' ही गीतेतल्या भगवद्-भक्यांची लक्षणे नेहरूंत संपूर्णपणे होती. ही नेहरूंची थोरवी होय. नेहरू हे तत्त्वज्ञ असले तरी त्यांच्या वृत्तीत सगुण भक्ती अगदी ओथंबलेली होती. ही गोष्ट त्यांचे 'मृत्युपत्र' वाचून कळते. 'मृत्युपत्र' हे नाव त्या पत्राला देणे हे चूकच आहे. त्यात एक अतिउदात्त इच्छा आहे. त्यातली गंगाभक्ती वाचून

---

* "The woods are lovely dark and deep
But I have promises to keep
And miles to go before I sleep
And miles to go before I sleep"

मला अगदी हसू आले. गंगा हे एक वाहते पाणी असून प्रतिक्षणी जुने जलबिंदू वाहून जाऊन नवे तेथे येतात व व्यवहाराच्या सोयीसाठी आपण त्या प्रवाहाला गंगा म्हणतो. हा तत्त्वविचार असून तो नेहरूंना कळत होता. पण सगुणभक्ती जाणूनबुजून भ्रमावर आधारलेली असून अंतःकरणातील मानवी सद्‌-गुणांना टिकविण्यासाठी ही भक्ती वाणवून घ्यावी लागते हे भक्तिशास्त्र होय. ही भक्ती भारताबाबत, मानवजातीबाबत त्यांनी बाणवून घेतली होती, म्हणूनच मुलांना पाहून नेहरूंना आल्हाद होई, जगात कोठेही दुःख व अन्याय दिसला की ते तळमळत, वैऱ्याचाही द्वेष करू नये, वैऱ्यावरही अन्याय करू नये म्हणून जपत. आपल्या चुकांचे प्रखर आत्मनिरीक्षण करीत. कष्ट करणाऱ्यांवर प्रेम करीत. म्हणूनच शेतकऱ्यांची शेती आपल्या औदार्याने पिकविणाऱ्या गंगेवर नेहरूंनी मनःपूत प्रेम केले व ज्या शेतीत शेतकरी कष्ट करतात त्या शेतात माझी रक्षा पडो असे लिहून ठेवले. हा महापुरुष मातेची प्रतिमा पाहून प्रेमभराने ओथंबणाऱ्या बालकासारखा अथवा शिळेच्या विठ्ठलमूर्तीत खऱ्या पांडुरंगाचा भ्रम होऊन आनंदाने नाचू लागणाऱ्या नामयासारखा भाबड्या अंतःकरणाचा होता असा प्रत्यय त्या मृत्युपत्रात येतो. ‘ पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत ’ या वचनात जी अंतःकरणप्रवृत्ती आहे तीत कायमचे राहाण्याचा नेहरूंचा स्वभाव होता. ही त्यांची थोरवी मला फार वर्षे आकर्षक वाटली आहे.

पण म्हणून ते नुसतेच स्वप्नरंजनी होते, त्यांची सर्व तत्त्वे फसली व हिमालयावर त्यांचे यशःशरीर मेले असे म्हणणे हे साफ खोटे आहे. ते सज्जनांनी म्हटले असले तरी सुप्त मनातल्या आकसाचे अथवा आकसाने बधिर झालेल्या बुद्धीचे लक्षण आहे. माझ्या दृष्टीने नेहरूंचे भौतिक शरीर मेले, पण त्यांचे यशःशरीर व तत्त्वज्ञान अधिक तेजाने झळकत असून त्यांचे तेज वाढतच जाईल.

चित्रमयजगत : जुलै १९६४

# चीन मागे हटला तो कशा मुळे ? (एक तर्क)

आमच्या तर्काप्रमाणे पाहता अमेरिकेच्या भीतीने चीन मागे हटला हे खरे नाही असे म्हणावे लागते. नेफावर चीनचे आक्रमण होऊन भारताची सैन्ये नामोहरण झाली तेव्हा अँग्लो-अमेरिकनांनी शस्त्रास्त्रांची बरीच मदत तातडीने पाठविली हे खरेच आहे. चीन जर आसामात आला असता तर आसामात ब्रिटनचे असलेले प्रचंड भांडवल व ईभ्रत संकटात येऊन पूर्व पाकिस्तानाला म्हणजे अमेरिकेलाही धोका आला असता. म्हणून अँग्लो-अमेरिकनांनी चीनशी युद्ध सुरूही केले असते. अशा युद्धात रशिया चीनच्या बाजूने गेला असता तर चीन मागे हटलाच नसता. ते युद्ध निकालीच झाले असते व जयापजय कोणाचाही झाला असता तरी साऱ्या आशियात आजच्या दक्षिण व्हिएतनाममधल्यासारखी म्हणजे कम्युनिझममिश्र अराजकाची परिस्थिती माजली असती. तेव्हा अमेरिकेच्या भीतीने चीन नेफातून मागे हटला हा तर्क निर्मूल ठरतो व रशियाची मदत मिळण्याचा संभव चीनला दिसला नाही या घटनेत चीनच्या पीछेहाटीचे कारण शोधावे लागते. शिवाय चीन नेफात येऊन आसामच्या सरहद्दीवरच थांबला असता व आसामात आपणास शिरायचे नाही असे त्याने जाहीर केले असते तर अँग्लो-अमेरिकनांनी चीनशी युद्ध केलेच नसते हे चीनला माहीत होते. कारण अमेरिकेचा मित्र जो चँग कैशेक त्याचे मत लडाख व नेफा हे चीनचेच प्रदेश आहेत असे आहे. आणि लडाखमधून चीनला मागे हटविण्यासाठी अमेरिका भारताला मदत देणार नाही असे 'टाइम्स ऑफ इंडिया'चा खास माहीतगार जो एन्. जे. एन्. त्याने अनेकदा सांगितले आहे. तेव्हा नेफातून अमेरिकेच्या भीतीने चीनने माघार घेतली हा तर्क सर्वथैव निराधार ठरतो. आज अमेरिकेच्या भीतीने दक्षिण व्हिएतनाममधून चीन अथवा त्या भागातील कम्युनिस्ट माघार घेत नाहीत हा अनुभव जगाला येतच आहे. कोरिया व इंडोचीन येथे अनुक्रमे पंधरा व अकरा वर्षांपूर्वी चीनने युद्ध थांबविण्यास संमती दिली याचे कारणही अमेरिकेची भीती हे नसून रशियाचा पाठिंबा चीनच्या आक्रमणाच्या धोरणास मिळाला नाही हेच होते.

वरील विवेचनाच्या प्रकाशात चीन नेफातून मागे का हटला याचा विचार करू. कोरिया व इंडोचीन या दोन्ही ठिकाणच्या कम्युनिस्ट आक्रमणास चीनचा पाठिंबा होता, पण रशियाचा पाठिंबा नव्हता म्हणून चीनने त्या

दोन्ही ठिकाणची आक्रमणे थांबविण्यास संमती दिली. नेफावरील चीनच्या आक्रमणाच्या सुमारास रशिया व अमेरिका यांचे क्यूबावर ॲटॉमिक युद्ध माजून युरोप-अमेरिकेची होळी पेटणार व आपणास आशियात मोकाट रान मिळणार असे पाहून लाल चीनने नेफावर चढाई केली. पण रशियाने क्यूबातून चटकन् माघार घेऊन ॲटॉमिक युद्ध थांबविले. दरम्यान चीनला रशियाने पाठिंबा दिला व भारताने तडजोड करावी असे 'प्रावदा'ने म्हटलेही होते. रशियाने हाच पाठिंबा टिकविला असता व फक्त आसामात जाण्यास चीनला बंदी केली असती तर महायुद्ध टळले असते व चीन नेफातच राहिला असता. पण येथे त्यावेळचे भारतातले वातावरण वाचकांनी आठवावे. ९ नोव्हेंबरच्या सुमारास मेनन पदच्युत झाले व अमेरिकन शस्त्रास्त्रकरारात जाण्यास नेहरू तयार झाले नाहीत तर नेहरूंचा पाडाव होणार, नेहरूंचा पाडाव झाला की भारत अमेरिकेच्या शस्त्रास्त्रकरारात सामील होऊन काश्मिरात अमेरिकेचा लढाऊ तळ येणार व मग आशियात युद्ध व कम्युनिझम माजविण्याच्या चीनच्या धोरणास पाठिंबा दिल्यावाचून रशियाला गत्यंतर रहाणार नाही ही भीती क्रुश्चेव्हपुढे उभी राहिली. म्हणून नेहरू व त्यांचे धोरण यांना अधिकारावर शाबूत ठेवण्यासाठी क्रुश्चेवने माओला मागे खेचले असे सरळ अनुमान निघते. गेल्या पंधरा वर्षांतील चीनच्या आक्रमक धोरणास पायबंद बसला तो रशियाने घातला आहे, अमेरिकेच्या भीतीने घातलेला नाही. नेहरूंच्या दूरदृष्टीची थोरवी ती ही, की रशियाला युद्ध नको आहे आणि आशियात जर भारताने शांततेचे वातावरण टिकविले तर चीनला आक्रमणाच्या साहसात रशिया अटकाव करील हे नेहरूंनी अठरा वर्षांपूर्वीच ओळखले व तसे धोरण अवलंबले. चीन मागे हटला तो यामुळे.

अमेरिका व रशिया या दोघांशी मैत्री ठेवणे व कोणाशीही शस्त्रास्त्रसाहाय्याचे करार न करणे हे नेहरूंच्या या धोरणाचे मुख्य अंग होते. त्यामुळे साऱ्या आशियाचा दक्षिण व्हिएटनाम झाला नाही व अमेरिकेची फार मोठी फजिती टळली हा नेहरूंचा अमेरिकेवर उपकार झाला. पण अमेरिका हट्टी व गर्विष्ट आहे. भारत काश्मीर देत नाही म्हणून तिने पाकिस्तानच्या हाती शस्त्रे देऊन भारताला सतत १८ वर्षे रक्तबंबाळ केले आहे. आता पाकिस्तान चीनशी मैत्री करून भारताची संकटे वाढवीत आहे तर अमेरिका चॉकलेट चघळून गंमत पहात आहे. खरोखर भारताने जर यावेळी पाकिस्तानशी युद्ध सुरू केले तर अमेरिका पाकिस्तानची बाजू घेईल. त्यामुळे रशियाला चीनशी मैत्री करून अमेरिकेशी लढावे लागेल व मग रणदिवे, कोसिजिन व माओ साऱ्या भारतात दक्षिण व्हिएतनाम निर्माण करतील व ॲंग्लो-अमेरिकनांच्या



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम .............. दि: ..............

हातात आशियाची राखुंडी येईल. पण अमेरिकेला एवढी महाग अक्कल पुरविण्यासाठी भारताची राखुंडी शास्त्री करू इच्छित नाहीत! ज्यांना हे कळत नाही ते निर्बुद्ध होत.

नवशक्ती : ८ एप्रिल १९६५